The Saraswathi Mahal Series No. 37

# त्रिस्थळि यात्रेच्या लावण्या

(शरभेंद्र भूपाल कृत)

आणि

# शरभेंद्र तीर्थावळी

(श्री शिवकृत)

१८५१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२८७

Madras Government Oriental Series.

No. LXIX

REFBK-0021384

PRINTED BY

TAPOVANAM PRESS, THIRUPPALATHURAI.

ग्रंथ क्र. २१५४ ता. १०/११/६३
मा.१०१
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
मा.१०१
२९३८४
ता. २२९२

Madras Government Oriental Series :

PUBLISHED UNDER THE AUTHORITY
OF THE
GOVERNMENT OF MADRAS

GENERAL EDITOR:

SRI T. CHANDRASEKHARAN, M.A., L.T.
Curator, Government Oriental Manuscripts Library,
Madras.

★

REFBK-0021384

REFBK-0021384

No. LXIX

# त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या

आणि

# शरभेंद्र तीर्थावळी

Tanjore Saraswathi Mahal Series No. 37

# TRISTHALLĪ YĀTRĒCHYĀ LĀVANYA

(BY KING SERFOJI)

and

# SARABĒNDRA THĒĒRTHAVALLI

(BY SIVA)

★

critically edited with Introduction and Synopsis in English

BY

SRI A. KRISHNASWAMI MAHADICK RAO SAHIB. B. A.,
(Editor of Pratapa Simhendra Vijaya Prabandha, Lok Geet, Goph, Sri Sarabendra Vaidya Ratnavalli etc.,)

★

Published by

Sri S. GOPALAN. B. A., B. L.,
HONRY, SECRETARY FOR THE ADMINISTRATIVE COMMITTEE,
T. M. S. S. M. LIBRARY,
TANJORE.

1951

PRICE Rs. 3—8—0

तंजावर सरस्वती महाल ग्रंथमाला नं. ३७.

# त्रिस्थळी यात्रेच्या लावण्या

(शरभेंद्र भूपाल कृत)

आणि

# शरभेंद्र तीर्थावळी

(श्री शिवकृत)

★

संपादक

**A. कृष्णस्वामी महाडिक् राव साहेब्. बी. ए.,**

(प्रतापसिंहेंद्र विजय प्रबन्ध, लोक गीत, श्री शरभेंद्र वैद्य रत्नावळीं इ. प्रकाशनांचे संपादक)

★

प्रकाशक

**S. गोपालन् बी. ए., बी. एल्.,**

सन्माननीय चिट्णीस, सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर.

सन्. १९५२.

किम्मत्. रू. ३—८—०

# PREFACE

This publication contains a detailed description of the pilgrimage of Serfoji Raja II (1798 to 1832) of Tanjore to all the sacred shrines of our country. The shrines of Northern India are described in the first part in Marathi songs, in the style of the traditional religious folk-music of the Marathas known as "LAVANI"; and in the second, those of South India are described in Marathi verse. They form an eloquent testimony to the sincere and reasoned faith and devotion of the great Scholar-king, Serfoji.

The first part is a high-class composition in folk music and gives detailed information about the origin and history according to tradition, of the shrines of Northern India. The second contains fourteen chapters and is a regular manual giving detailed information about the sacred shrines of the South. It mentions, by the way, the several acts of piety performed by King Serfoji.

It must be pointed out that these accounts are likely to help historical research, in as much as names and details now forgotten or obsolete, find a place in them, and they are likey to help the student in tracing the history of places with the help of local traditions and Sthalapuranams.

Serfoji has done a great service to the Marathi-speaking world by introducing to them the numerous

sacred shrines of the South and North India, and by enabling tourists and pilgrims to take an intelligent interest in the religious and historical associations of those places.

The Editor of these two works, Sri A. Krishnaswami Mahadick Rao Saheb, B. A., has added to the usefulness of the work by giving a summary in English of the descriptions of the shrines in the works in Marathi. The book is therefore likely to be useful to non-Marathi-speaking public as well. Our thanks are due to him for his valuable services.

We are grateful to the Government of Madras for their timely grants that have helped us to publish this and other valuable works.

Saraswathi Mahal Library,
Tanjore,
1st February 1952.

**S. GOPALAN,**
*Honorary Secretary.*

# GENERAL INTRODUCTION

## TO THE

# Madras Government Oriental Series.

The Government of Madras took up for consideration the question of publication of the various manuscripts in different languages on subjects like Philosophy, Medicine, Science, etc., early in May 1948. Important manuscript libraries in the Madras Presidency were requested to send a list of unpublished manuscripts with them for favour of being considered by the Government for publication. The Honorary Secretary of the Tanjore Maharaja Serfoji's Sarasvathi Mahal Library, Tanjore, alone complied with this request. This list as well as a similar list of unpublished manuscripts in the Government Oriental Manuscripts Library, were carefully examined and a tentative selection of manuscripts suitable for publication was made. The Government in their Memorandum No. 34913/48-10 Education, dated 4-4-1949, constituted an Expert Committee with the Curator of the Government Oriental Manuscripts Library, Madras, as the Secretary, for the final selection of manuscripts suitable for printing and for estimating the cost of publication.

The following are members of the Committee:

1. Sri T. M. Narayanaswami Pillai, M A., B L.,
2. ,, R. P. Sethu Pillai, B.A., B.L.,
3. ,, C. M. Ramachandra Chettiar, B A., B L.,
4. Sri R. Krishnamoorthy, (Kalki)
5. Dr. N. Venkataramanayya, M.A., PH D.,
6. Sri M. Ramanuja Rao Naidu, M A., L.T.,
7. ,, V. Prabhakara Sastri,
8. ,, N. Venkata Rao, M A,
9. ,, H. Sesha Ayyangar,
10. ,, Masthi Venkatesa Ayyangar, M A.,
11. ,, M. Mariappa Bhat, M.A, L.T.,
12. Dr. C. Achyuta Menon, B.A., PH.D.,
13. ,, C. Kunhan Raja, M.A., D. PHIL.,
14. ,, A. Sankaran, M.A, PH.D., L T.,
15. Sri P S. Rama Sastri,
16. ,, S K. Ramanatha Sastri,
17. Dr. M. Abdul Haq, M.A., D. Phil. (Oxon),
18. Afzul-ul-Ulma Hakim Khader Ahamed,
19. Sri P. D. Joshi,
20. ,, S Gopalan. B.A., B.L.,
21. ,, T. Chandrasekharan, M.A., L.T.

The members of the Committee formed into Sub-Committees for the various languages, Sanskrit, Tamil, Telugu, Kannada, Malayalam, Marathi and Islamic Languages. They met during the month of May, 1949, at Madras and Tanjore to examine the manuscripts and make a selection. The recommendations of the Committee were accepted by the Government in G. O. No. Mis. 2745 Education, dated

31--8—1949 and they decided to call these publications as the **"Madras Government Oriental Series,"** and appointed the Curator, Government Oriental Manuscripts Library, Madras, as the General Editor of the publications.

The following manuscripts have been taken up for publication during the current year:

## "A" From the Government Oriental Manuscripts Library, Madras.

### TAMIL

1. Kappal Sattiram
2. Anubhava Vaidya Murai
3. Attanakolahalam
4. Upadesa Kandam
5. Colan Purva Pattayam
6. Konga Desa Rajakkal
7. Sivajnana Dipam
8. Sadasiva Rupam, with commentary.

### TELUGU.

1. Sangitaratnakaramu
2. Aushadha Yogamulu
3. Vaidya Nighantuvu
4. Dhanurvidya Vilasamu
5 Yoga Darsana Vishayamu
6. Khadga Lakshana Siromani.

## SANSKRIT.

1. Vishanarayaniyam
2. Bhargava Nadika
3. Hariharacaturangam
4. Brahmasutravrtti—Mitaksara
5. Nyayasiddhanta Thattvamrtam.

## MALAYALAM.

1. Garbha Cikitsa
2. a. Vastulakshanam
   b. Silpasastram
   c. Silpavishayam
3. Mahasaram
4. Kanakkusaram
5. Kriyakramam

## KANNADA.

1. Lokopakara
2. Rattamata
3. Asvasastram
4. a. Aushadhagalu
   b. Vaidyavishaya
5. Sangitaratnakara
6. Supasastra.

## ISLAMIC LANGUAGES.

1. Jamil-Al-Ashya
2. Tibb-E-Faridi
3. Tahqiq-Al-Buhran
4. Safinat-Al-Najat.

# "B" From the Tanjore Maharaja Serfoji's Sarasvathi Mahal Library, Tanjore.

## TAMIL.

1. Sarabhendravaidya Murai (Diabetes)
2. Do. (E N. & T.)
3. Konkanarsarakku Vaippu
4. Tiruccirrambalakovaiyar with Padavurai
5. Sarabhendra Vaidya Murai— (Anæmia & Jaundice)
6. Talasamudram
7. Bharatam
8. a. Pandikeli Vilasa Natakam
   b Pururava Cakravarti Natakam
   c. Madana Sundara Vilasa Natakam
9 Percy Macqueen's Collection in the Madras University Library on Folklore
10. Ramaiyan Ammanai
11. Sarabhendra Vaidya Murai — (Asthma, Cough and other lung diseases)

## TELUGU.

1. Kamandakanitisaramu
2. Taladasapranapradipika
3. Raghunatha Nayakabhyudayamu
4. Rajagopala Vilasamu
5. Ramayanamu by Katta Varadaraju

## MAHRATHI.

1. Natyasastrasangraha
2. a. Folk Songs

b. Dora Dharun Veni Paddhati
c. Asvasa Catula Dumani
3. *Pratapasimhendra Vijaya Prabandha*
4. a. Sarabhendra Tirthavali
b. Lavani
5. Devendra Kuravanji
6. Bhakta Vilasa
7. Sloka Baddha Ramayana

## SANSKRIT.

1. Asvasastra with Tricolour Illustrations
2 Rajamrganka
3. Ananda Kandam
4. Ayurvedamahodadhi
5 Gita Govinda Abhinaya
6 a. Colacampu
b. Sahendra Vilasam
7. Dharmakutam-Sundara Kanda
8. Jatakasara
9. Vishnutattvanirnaya Vyakhya
10. Sangita Darpanam
11. Bijapallavam

It is hoped that the publication of most of the important manuscripts will be completed within the next four years.

Some of the manuscripts taken up for publication are represented by single copies in the Library and consequently the mistakes that are found in them could not be corrected by comparing them

with other copies The editors have however, tried their best to suggest correct readings. The wrong readings are given in round brackets and correct readings have been suggested in square brackets. When different readings are found, they have been given in the foot-notes except in the case of a few books, in which the correct readings have been given in the foot-note or incorporated in the text itself.

The Government of Madras have to be thanked for financing the entire scheme of publication although there is a drive for economy in all the departments. My thanks are due to the members of the Expert Committee who spared no pains in Selecting the manuscripts for publication. I have also to thank the various editors, who are experts in their own field, for readily consenting to edit the manuscripts and see them through the press. The various presses that have co-operated in printing the manuscripts in the best manner possible also deserve my thanks for the patience exhibited by them in carrying out the corrections made in the proofs.

MADRAS,
1951.

T. CHANDRASEKHARAN,
*General Editor.*

# FOREWORD.

This publication contains two Mahrathi works (1) Thristhalliyatra by Maharaja Serfoji and (2) Sarabendra Thirthavalli by Siva Kavi. The former relates to the pilgrimage undertaken by Serfoji to Kasi, Prayag and other holy places of the North, while the latter deals with a similar pilgrimage made by Raja Serfoji to several shrines within his dominions and those lying just on the outskirts of the Tanjore District.

They are excellent pieces of poetry and contain soul-stirring ballads and songs. An account of the same is given in brief in English at the end of the texts as Appendices. A short account of the achivements of the Tanjore Mahratta Rulers with special reference to Raja Serfoji's personal contribution is also added to enliven the reader's interest.

The art of composing Mahrathi Lavanis or ballads has nearly disappeared from Tanjore and even the practice of singing them during important Mahrathi feasts and ceremonies is fast dying out, and to those who still love and cherish the ancient forms of ballad-singing, this little publication, it is hoped, will be of some use.

Owing to difficulties in getting presses suitable for printing Mahrathi books, these works had to be tossed from one press to another and the readers will find that the two works contained herein are printed in two different presses and then bound together.

I am grateful to the Government of Madras, the Curator of the Madras Government Oriental Manuscript's Library, the Honorary Secretary and the Mahrathi Pandit of this library for their valuable support in editing this book.

Tanjore
8—3—52 } **A. Krishnaswamy Mahadick.**

# त्रिस्थळि यात्रेच्या लावण्या

★

श्री शरभेंद्रभूप कृत

# श्रीमन्त महाराज राजेश्री छत्रपती शरभेंद्रभूपाल कृत

## ॥ त्रिस्थळियात्रेच्या लावण्या ॥

—:⊱⊰:—

### १. ॥ लावणी तंजनगराचि ॥

सांगत शरभेंद्राचा त्रिस्थळियात्रावृत्तांत ॥ सज्जनहो तुह्मि होउनि सावध ऐका निश्चित ॥ ध्रु ॥ चोळदेश बहुरसाळ सुखकर सुंदर भूवर ॥ कावेरी ते वाहे जेथें पंचनदक्षेत्र ॥ कावेरीचे दक्षिणतीरि दो कोसावर ॥ शोभे येक गडाकिल्ला नादर तंजावर शाहर ॥ छंद ॥ ब्रहदीश्वरतो आहे जेथें ॥ चन्द्रमौळि करी स्थितीतें ॥ अणीक देव ते संख्यातीत ॥ करिति जन हित ॥ २ ॥ चोळदेशधणि भूपशिखामणी त्या तंजानगरीं ॥ छत्रपती महाराज शरभजी राजा राज्यकरी ॥ ज्याचि थोरी काय वदूं श्रीशरभ अवतारी ॥ संपत्संतति भूषित करुणासागर जो भारी ॥ छंद ॥ अनेक छत्रे आणि गोपुरें ॥ बांधविलीकीं बहूत थोर ॥ ज्याचा ऐसा धर्म अपार ॥ मिरवे भूवरते ॥ ३ ॥ ऐसा तो शरभेंद्र देऊनि राज्य स्वसुताला ॥ काशीयात्रा करुं म्हणूनी वेगें चालिगला ॥ जातां मार्गी ह्मणति सर्वहिं काळहस्ति ज्याला ॥ त्या क्षेत्रांत राहुनि राजा बागीं राहिला । छंद ॥ नानादेशीलोक मिळाले ॥ भूपा पाहति भरोनि डोळे ॥ सांग तथिल नवल सोहळे ॥ चन्द्रमौळिभक्त ॥

### २. ॥ लावणी पंचनदेश्वराचि ॥

दोनिभागते होउनि वेढी कावेरी ज्याला ॥ पंचनदाख्य क्षेत्र तें जगीं तारक पतितांला ॥ ध्रु ॥ शैलादि ह्मणणार ब्राह्मण करितां जप जेथें ॥ शिव तेंइन शशिकिरण गौरीकुच वृषवदनोद्भूत ॥ च्यारि नद्या निज गंगा याहीं अभिषेची त्यातें ॥ करोनि अपणासमान लावी मर्कट वदनातें

॥ छंद ॥ हे सख्यारे तो नंदिकेश जाण ॥ हे सख्यारे आहेता नद्या मणून ॥ हे सख्यारे पंचनद असे अभिधान ॥ अलें त्याला ॥ पंच ॥ १ ॥ घोर तपा विप्रानें जेथें जपतां नियमानें ॥ मातृगणेशा मध्दे झाली जपसिद्धी मणुन ॥ जप्येश्वरहिं मणती अणि शिवशर्मा ब्राह्मणें ॥ सूर्यग्रहणीं न दिलें दान देतो मणउन ॥ छंद ॥ हे सख्यारे तो क्षयी करुनि शिवनती ॥ हे सख्यारे सुख पावला मणुनि मागुती ॥ हे सख्यारे प्रणतार्तिहर असे मणति ॥ शंकराला ॥ पंचनदाख्य ॥ २ ॥ अगस्त्यऋषिने कावेरीला नेतां सिंधुस ॥ समग्र अंशे टेउनि जेथें नेला तल्लेश ॥ तिजसाटी तो सागर अला त्याहो क्षेत्रास ॥ अद्यापी तो आहे उत्तरभागीं देवास ॥ छंद ॥ हे सख्यारे दुष्प्रवृत्ति पितर वधुन ॥ हे सख्यारे श्रीपंचनदा येउन ॥ हे सख्यारे कावेरिचे जलबिंदुनें ॥ मुक्त झाला ॥ पंचनदाख्य क्षेत्र ॥ ३ ॥ पूर्वी श्रीशिवदास ब्राह्मण मुक्तीछिकडुन । काशिस जातां हेरंडाभिध पक्षी येऊन ॥ उचलुनि नेतां सोडउनी शिव बोले वचन ॥ पंचनदाशी जा मी तारक उपदेशा करेन ॥ छंद ॥ हे सख्यारे ते क्षणी विप्र परतला ॥ हे सख्यारे श्री पंचनदा पावला ॥ हे सख्यारे तारकोपदेश तो भला । शिवें दिधला ॥ पंचनदा ॥ ४ ॥ दुर्वासाने पुत्र व्हावया सुरथ राज्याला ॥ देवाच्या दक्षिणोत्तरीं कैलास स्थापियला ॥ अल्पायू तो सुचरित जेथें पुसुनि वसिष्टाला ॥ येउनि करितां तप तैं आपण यम तेथें आला ॥ छंद ॥ हे सख्यारे घालिता पाश त्यावरी ॥ हे सख्यारे भिति तो शिवा अंतरीं ॥ हे सख्यारे नंदिकेश तैं संहरी ॥ त्या यमाला ॥ पंचनदा ॥ ५ ॥ धर्मशातु तो जननीजनकाच्याहो आज्ञेन ॥ धनुष्कोटीमाजि अस्थि टाकाया जाण ॥ जाता राहि पंचनदीं तो रात्रे संपूर्ण ॥ स्वप्नी त्याचा पिता येउनी सांगे वचन ॥ छंद ॥ हे मुलारे यास्थळा अस्थि अणितां ॥ हे मुलारे लाभली अह्मा मुक्तता ॥ हे मुलारे येथें टाकि ऐस सांगता ॥ तेंवि केला ॥ पंचनदाख्य ॥ ६ ॥ मंदमती विट विप्रानें हो पंचनदक्षेत्रीं ॥ चौर्यासाटीं जागरणानें

नेली शिवरात्री ॥ मद्य पिवोनि मधु नामक तो देवा साभोरि ॥ शिवरात्री तो मदांध होउनि नाचे चौंपारी ॥ छंद ॥ हे सख्यारे दोघांशि घडालि मुक्ति ॥ हे सख्यारे त्या स्थळीं असो भक्ति ॥ हे सख्यारे सांगतो शरभ भूपती ॥ सज्जनाला ॥ पंचनदाख्य क्षेत्र तें जगीं तारक पतितांलां ॥

## ३. ॥ लावणी वृत्धाचलाची ॥

असे क्षेत्र धरणीवरि ज्याचें वृत्धाचल नावें ॥ आगम त्याच्या सांगन तेथें संती लय घ्यावें ॥ ध्रु ॥ माहाप्रळयीं वटपत्रावरि करितां हरि शयन ॥ झाला नाभीकमळापासुनि ब्रह्मा उत्पन्न ॥ सृष्टिकराया जलतें आधि निर्मियले तेणें ॥ तै विष्णुच्या कानापासुनि झाले भीषण ॥ छंद ॥ मधु कैटभ दोवे असुर ॥ ब्रह्मदेवाच्या संहार ॥ चिंतुनी धांवती क्रूर ॥ ते क्षणी हरिनें शीघ्र ॥ हणिनां त्यांशी मेद तयांचें झांकील सर्व ॥ आगम ॥ १ ॥ या मेदानें भूमि करावी तरि हें पातळ ॥ कवण उपायें आतां दृढता याला येयील ॥ ब्रह्मा ऐसें चिंतिन असतां झालें नवल ॥ सकल जगाशी कारण ईश्वर झाला अचल ॥ छंद ॥ मग त्याला चिकटोनी ॥ झालें तें दृढवाणी ॥ केलि तेणें ह अवनी ॥ यासाटि लोक मेदिनी ॥ मणती सर्वाहिं या पृथ्वीला ऐसे समजावें ॥ आगम ॥ २ ॥ ब्रह्माने तै करितां नेमें श्रीसांब ध्यान ॥ झाला शिव तो भक्तपरायण त्याला प्रसन्न ॥ ह्मणे माग तूं इष्ट तुला जें ते तुज देयीन ॥ छंद ॥ शिव तुझिया चिन्हातें ॥ जे पाहति जन येथें ॥ सकलेष्ट त्यांशि देत ॥ येथेंच ऐस शाश्वत ॥ ब्रह्मगिरतें ऐकुनि तथें राहे शिवदेव ॥ आगम ॥ ३ ॥ यापृथ्वीच्या सृष्टीलाही झाला जो मूळ ॥ अनादि जो श्रीगिरीश त्याला येणें स्थल दिधलें ॥ यास्तव वृत्धाचल मणवोनी नांव तया आलें ॥ नाथ शर्मा अनवधेशी सांगे चांगलें ॥ छंद ॥ ऐकुनि कथा ऐशी ॥ जाउनी त्या स्थलाशी ॥ ह गया हैचि काशी ॥ धरोनि भक्ति तैशी ॥ स्तवी तया तें भूप शरभजी वंदुनि दृढ भावें ॥ आगम ॥ ४ ॥

## ४. ॥ लावणी तिरतणीचि महात्म्य ॥

जयाशी तिरतणी ॥ मणिजे द्राविडानीं ॥ तत्कथा श्रवणी ॥ धराजी शिराणी ॥ जी ॥ कोंणे दिवशीं षण्मुखकदनी ॥ पद्माभिध असुरा वधुनी ॥ मग वल्ली सहिताचि धरणी ॥ विहराया आला रिझुनी ॥ १ ॥ जों कांचीपुराशी ॥ आहे दक्षिणेशी ॥ निरखोनि त्या स्थळाशी ॥ पुसे वल्लि त्याशी ॥ जी ॥ अति सुंदर हा गिरि कवण ॥ मज विनवा प्रीती करुन ॥ अस मणतां बोले वचन ॥ वल्लिप्रति षडानन ॥ जी ॥ २ ॥ त्या विश्वकर्म्यानें ॥ इंद्राचे आज्ञेनें ॥ हा गिरी मनानें ॥ वरी तीर्थ तीनें ॥ री ॥ अणि उत्पलत्या माझारी ॥ प्रति दिवसीं व्हावि कुसरी ॥ हें रचिलें यास्तव सुंदरीं ॥ जगीं मणवी उत्पलगिरी ॥ ३ ॥ भक्तानुग्रहार्थ ॥ राहातों मीं येथें ॥ करोनी स्नानातें ॥ पाहाती जे मातें ॥ री ॥ पुरविन मीं त्याचें अभीष्ट ॥ मम वाक्य ऐका स्पष्ट ॥ नकरिति जे दर्शन पापिष्ट ॥ जाणावे ते नर भ्रष्ट ॥ ४ ॥ यांपरी बोलोनी ॥ शिवलिंग स्थापोनी ॥ तयातें पूजोनी ॥ राहे तेथ धणी ॥ री ॥ प्रतिदिवशी पूजी सुरनाथ ॥ शिव-तनया वल्लिसहित ॥ करि पूजा शरभ नरनाथ ॥ वेधुनियां त्यागिरितें ॥ ५ ॥

## ५. ॥ लावणी मंगळागिरीची ॥

अतां सांगतों मंगळगिरिचें अद्भुत आख्यान ॥ ज्याच्या श्रवणमात्रें होती पतित पावन ॥ ध्रु ॥ कृतयुगिं नमुचीनामक राक्षस होउनि प्रबळ ॥ देवां मर्दितां तजविज करुनी देव सकळ ॥ श्रीविष्णुचि स्तुती करितां तें घननीळ ॥ प्रसन्न होउनि बोले वधितों असुरा तात्काळ ॥ छंद ॥ येरीती बोलुनि होउनि नरहरि ॥ निजसुदर्शनातें सोडी असुरावरी ॥ तें पाटीलागुनि असुरातें संहारी ॥ तेंव्हां इंद्रादिक देवानी केले स्तवन ॥ १ ॥ तेंव्हां त्याचे स्तोत्रें होउनि आनंद पूर्ण ॥ बोले स्वर्गाहुनी आणा अमृत जलदीनें ॥

देवानीं ते अणितां अमृतमोदें घेऊन ॥ प्राशुनि निम्मे बाकी देवां देउनी प्रितीनें ॥ छंद ॥ मणे कृतयुगीं हें मम पूजाविधान ॥ अणि त्रेतायुगीं कीजे घृतेंकडुन ॥ द्वापरि करवा मजला दुग्धपान ॥ कलियुगीं मी करितों निम्मे पानक प्राशन ॥ २ ॥ येणेंरीती चौयुगींहीं करीत पुजन ॥ येथे राहा मणउनि राहे बिलरूपें ऊडुन ॥ मणती कृतयुगीं त्याडोंगरा तोताद्री मणुन ॥ त्रेतायुगीं मुक्तीगिरी मणती सज्जन ॥ छंद ॥ अणि द्वापारीं त्या मणताती धर्माद्री ॥ कलियुगीं मणती त्याला मंगळगिरी ॥ शरभेंद्रें तेथें पूजीला नरहरी ॥ ३ ॥ ज्याचे श्रवणमात्रें हाती पतीत पावन ॥

## ६. ॥ लावणी कृष्णमहात्म ॥

पिटाळी ॥ब्रह्महत्येस ॥ माहात्म्य कृष्णेचें ऐसें ॥ ध्रु ॥ इंद्रें वृत्रातें मारूनि ॥ सोडिली हत्या वांटोनी ॥ तेनद्या स्त्रि भू वृक्षानीं ॥ घेतिली हत्या चवघांनीं ॥ छंद ॥ नद्या महिमा विरहित झाल्या ॥ तेंव्हां अवघ्या त्या घाबिरल्या ॥ विष्णुला तैं शरण गेल्याजी ॥ विष्णुतें सांगे नद्यांस ॥ १ ॥ बृहस्पती तो राशींत ॥ राहतो वर्षपर्यंत ॥ तेंव्हां ते गंगा तुमचे-येथें ॥ क्रमें राहिल खचित ॥ छंद ॥ तेव्हा करितो स्नान जे जन ॥ फळ लाभे गंगास्नानें ॥ द्यात तयांला त्यास शतगुणजी ॥ ऐकतां झाला संतोष ॥ २ ॥ माहात्म्य ॥ कन्याराशींत इंद्रानें ॥ गुरुला अतिचार आणून ॥ करितां कृष्णेचें स्नान सोडिलें त्याला हत्येनें ॥ छंद ॥ एका कवण्यांही रीती ॥ कन्येशी जै गुरूयेती ॥ तै जे कृष्णा स्नान करिती जी ॥ नेणती ते पापलेश ॥ ३ ॥ महात्म्य ॥ शूर सेनाचा लोक ॥ राजा द्रमिळ नामक ॥ पुराण श्रवणार्थ देख ॥ नेमिला ब्राह्मण येक ॥ छंद ॥ पंडितभेद आपल्या स्त्रीनें ॥ करितां प्रयाश्चित्त पुसून ॥ त्यानें करीतां कृष्णास्नानजी ॥ लाभली मुक्ती तयास ॥ माहात्म्य ॥ ४ ॥ तयाची स्त्री त्या पापानें ॥ जन्मली विंचू होऊन ॥ लाभली जन्म बहुसान ॥ सुकर

देह अवसान ॥ छंद ॥ ब्राह्मण कृष्णास्नान करोनि ॥ जातां तज्जल योगेंकडुनि ॥ मुक्त झाली चपलाराणीजी ॥ शरब्जी सांगे सकळांस ॥ ॥ माहात्म्य ॥

## ७. ॥ लावणी गोदावरीची ॥

गोदावरि ते वृध्द गंगा ऐकावें चतुरी ॥ जिच्या जलकण योगें झाली अहल्यानारी ॥ ध्रु ॥ पूर्वी गौतम ऋषिची कांता इंद्रे भोगियली ॥ तव्हां पतिच्या शापेकडुनी ते धोंडा झाली ॥ व्यसनें मग त्या ऋषिनें तीर्थयात्रा साधीली ॥ श्रीकेदारापासुनि शिवक्षेत्रें सेविली ॥ छंद ॥ मग काशीला येउन ॥ गंगेंत स्नान करून ॥ घेतां विश्वेश्वरदर्शन ॥ प्रसन्न होउनि विश्वेश्वर ते बोले वैखरी ॥ जिच्या जल ॥ १ ॥ जाय गौतमा वारे येथुनि पश्चिम प्रांती ॥ आहे त्र्यंबक नामक डोंगर तो हिं निश्चिति ॥ वृध्दगंगा आहेवा हे त्याच पर्वती ॥ तेथें सिंहराशीमाजि असतां ग्रीष्पती ॥ छंद ॥ करुनी वृध्दगंगास्नान ॥ घेता त्र्यंबक दर्शन ॥ होय तव कामना पूर्ण ॥ ऐसे मणता गौतमऋषि तैं आला झडकरी ॥ जिच्या जल ॥ २ ॥ करुनी गंगास्नान त्र्यंबकेश्वर दर्शन । तपहीं करितां त्र्यंबकेश झाला प्रसन्न ॥ माथां होती गंगा बहुत दिवसापासून ॥ तेंव्हां भूमीवरतें तिजला तेणें सोडियलें ॥ छंद ॥ मग सिंधुसंगमास ॥ धांवता उदक लेश ॥ लागता अहल्येस ॥ आली सुंदररूपा लाभुनी पती शेजारी ॥ ३ ॥ जीच्या जल ॥ तेंव्हां ब्रह्मादीकीं केलें बहुत स्तवन ॥ तेंवीं ईश्वर प्रीतीसाटी वृध्दगंगेनें ॥ तप करीता तो त्र्यंबकेश्वर बोले वचन ॥ गंगे तुझा तपें तुजला झालों प्रसन्न ॥ छंद ॥ श्रीवाराणासि माझारी ॥ जेंवि त्या गंगचे तीरी ॥ तेवीं मी तुझ शेजारी राहिन तुजला वृध्दगंगा मणती भूवरी ॥ जिच्या जल ॥ ४ ॥ अणीक तुझी कनिष्ट भगिनी मणती गंगेला ॥ गंगेमाजि मिसळुनि तुजला अभिषेकु मजला ॥ करिती जन जे यारीतीनें तारिन मी त्यांला ॥ तुझे स्नानें लोक होयिल पापा निराळा ॥ छंद ॥ तीर्थ श्राध्दांतें करुन ॥ जे

तुझ्या उदकानें ॥ करिती पितृ तर्पण ॥ पितर तयांचे जाती तृप्त होऊनि अंतरी ॥ ५ ॥ सिंहराशीं बृहस्पती येतां नेमानें ॥ करिता स्नान ब्रह्महत्या जायिल तत्क्षण ॥ अदृश्य होतां देव तिजला वर हा देऊन ॥ झाली समुद्रगामीनी ते सात भागानें ॥ छंद ॥ अणि गोदा आपण ॥ प्रवरा नदी संगानें ॥ गोदावरी अभिधान ॥ जे लाभली वंदो तिजला शरभावतारी ॥ जिच्यां जल ॥ ६ ॥

## ८. ॥ लावणी उपमाका ॥

शाहिरा ऐक महीवर ॥ अनकापल्ली समीप आहे उपमाका क्षेत्र ॥ ध्रु ॥ प्रधान वस्तूचे ठांयी ॥ पूर्वी हा प्रपंच लीन झाला लवलायी ॥ मग ते प्रधान वस्तुहीं ॥ लक्ष्मी पतीचे ठायीं दडलें ऐका चतुराथी ॥ छंद ॥ मग प्रळयी लक्ष्मीकांत ॥ निजता स्वर्ण कढायींत ॥ झाला ब्रम्हा नाभि पद्मांत ॥ अगर थोर ॥ १ ॥ अनकापल्ली ॥ प्रणव उपदेशकरुन ॥ ह्मणे विष्णु ब्रह्मदेवा प्रपंच निर्माण ॥ करीबा आतां संपूर्ण ॥ ऐशी आज्ञा करुनि पावला तो अंतर्धान ॥ छंद ॥ मग ब्रह्मा चवदा भुवनें ॥ निर्मुनि सप्तलोकीं आपण ॥ असतां गेला वेद घेऊन ॥ सोमक असुर ॥ २ ॥ अनकापल्ली ॥ तेक्षणी ब्रह्मा श्रीपतीतें ॥ स्तोत्रें रिझउनि विनवी त्याशी असुराचें चरित ॥ विष्णु ते सांगे ब्रह्मयातें ॥ गरुडाचळ येक आहे सागर तीरीं कोसांत ॥ छंद ॥ तप तुं करि त्याजवरी ॥ अणि बंधुरसरोवरतीरीं ॥ करि मूळमंत्र जप लौकरी ॥ वधिन असूर ॥ ३ ॥ विष्णूची ऐकोनी वाणी ॥ ब्रह्मा तप करी शंभर वर्ष तेथे राहोनी ॥ मग तिमिंगिळ मासा होवोनी ॥ आला असुरा जिंकुनि विष्णु वेद घेवोनी ॥ छंद ॥ मग तेथ हयग्रीवास ॥ स्तवन करीतो ब्रह्मा ऐसें ॥ तुंचि कपटनाटकास ॥ सूत्रधार ॥ ४ ॥ अनकापल्ली ॥ तें वदे हयग्रीव वचन ॥ फाल्गुन शुद्ध एकादशी जे स्नान ॥ करिती सुखी ते जन ॥ उपमाका या क्षेत्रा मणती ऐसें सांगुन ॥ छंद ॥ तो पावला अंतर्धान ॥ शरभेंद्र पुस हे अभिधान ॥ का दिधलें सांग शोधुन ॥ सहाशास्त्रें ॥ अनकापल्ली ॥

## ९. ॥ लावणी सिंहाचल माहात्म्य ॥

फार थोर तें क्षितिवरि ऐका सिंहाचल क्षेत्र ॥ सुर नर किन्नर मुनिवर जेथें जपती वरमंत्र ॥ ध्रु ॥ पूर्वी सनकादिक मुनि भावें वैकुंठा गेले ॥ जयविजयांनी निरोध करितां द्वारीं राहियले ॥ तेंव्हां गरुडारुढ होउनि विष्णु निघाले ॥ पाहुनि ऋषिते जयविजयांशी कोपें बोलियेले ॥ छंद ॥ हे जडांनो मद्भक्तजनी थोर ॥ हे जडानों मांडिलां अनादर ॥ हे जडांनों त्यासाटी व्हाल असुर ॥ अगुणपात्र ॥ १ ॥ सुरनरकिन्नर ॥ महाविष्णु वदतां तयापरी ते क्षणि भूवर ॥ हिरण्याक्ष अणि हिरण्यकशिपू झाले ते असुर ॥ हिरण्याक्ष भूनिमित्त वधिला वराह अवतारें ॥ हिरण्यकशिपू तप करुनि तैं लाभे बहु वर ॥ छंद ॥ हे सख्यारे प्रल्हाद पुत्र त्याला ॥ हे सख्यारे श्रीविष्णुभक्त झाला ॥ हे सख्यारे तैं कथि दैत्य त्याला ॥ असुर शास्त्र ॥ २ ॥ सुर नर किन्नर ॥ बहुताहिं यत्नें पढवी त्याला अपुला सिद्धांत ॥ परि तो गर्जे माधव नृहर मणउनि हरिभक्त ॥ तेंव्हां कोपुनि असुर सुताला टाकुनि सिंधूंत ॥ दहाकोसाचा दगड उचलुनी टाकी त्यावरतें ॥ छंद ॥ हे सख्यारे हरि भक्ति थोर बापा ॥ हे सख्यारे हरि करी भक्त जोपा ॥ हे सख्यारे जाला दगड ताफा ॥ पहा चित्र ॥ ३ ॥ सुर नरकिन्नर ॥ कांठा येता बाळ नरहरी अवतरुनी त्यासी ॥ बोले बापा भिउ नको मी आहें पाठीशी ॥ आजिपासुनी सिंहाचल हें नाव असो याशी ॥ निर्झररूपें नद्या वाहती येथें दिननीशी ॥ छंद ॥ हे सख्यारे जो तुझा पिता दैत्य ॥ हे सख्यारे सज्जना सळी नित्य ॥ हे सख्यारे त्यास मी वधिन सत्य ॥ विनाशस्त्रें ॥ ४ ॥ सुर नरकिन्नर ॥ भक्तपरायण अहो बळी मग अवतरुनी स्तंभी ॥ श्रीनरहरि तो दिनावसानीं निशिचे आरंभीं ॥ दरवाजीं त्या दैत्या अडवे घेउनियां बोंबी ॥ नखाकडुनी चिरोनि झडकरी वारी सज्जनंभी ॥ छंद ॥ हे सख्यारे तत्समयीं तो निर्भय ॥ हे सख्यारे प्रल्हाद विनवि काय ॥ हे सख्यारे तूं देव बापमाय ॥

इष्टमित्र ॥ ५ ॥ सुर नरकिन्नर ॥ प्रल्हादाचि स्तुति यापरी ऐकुनि तो शांत ॥ होउनि सिंहाचलासि आला मग लक्ष्मीकांत ॥ शाश्वत तेथें नांदे अपुल्या भक्तां सुखवीत ॥ तें स्थल पाहुनि सेउनि विभवें त्या श्रीनरहरीते ॥ छंद ॥ हे सख्यारे भोंसलें कुलाब्दि चंद्र ॥ हे सख्यारे सवाई सुगुण सांद्र ॥ हे सख्यारे भूपती शरभेंद्र ॥ करी स्तोत्र ॥ ६ ॥ सुर नरकिन्नर ॥

## १०. ॥ लावणी श्री कूर्म ॥

श्रीकूर्मनाथ प्रगटलारे या भूवर ॥ अता सांगन ऐका तेचिकथा विस्तारें ॥ ध्रु ॥ पहा श्वेतगिरिवरी असे श्वेतनरनाथ ॥ त्याचि राणी करी एकादशी व्रत ॥ नृप कामातुर ते दिनींच होतां बहुत ॥ मनिं चिंतियलें त्यानी ते कूर्माते ॥ छंद ॥ मग राजा गंगापूर पाहिला जी जी ॥ तवं धांवत धांवत गिरी चढला जी जी ॥ तेथें पुसे कारण वृद्ध विप्राला जी जी ॥ मग मणतां तेणें हे कूर्मलीला जी जी ॥ मग पाहिन मणुनी त्या श्रीकूर्माला जी जी ॥ अत्युग्र तै तप करी भूप निर्धारें ॥ १ ॥ अता सांगन ॥ श्रीकूर्मनाथ प्रगटला चक्रतीर्थांत ॥ नृप पाहुनि त्याला झालाहा थकित ॥ मग श्वेतपर्वता जवळि सुधांकुंडातें ॥ निर्मुनि राहे तेथें कूर्मनाथ ॥ छंद ॥ मग सुधाकुंडा भिल्लटी तै तृषेणें आली जी जी ॥ त्या उदकाची गोडी तीनें भिल्ला विनवीली जी जी ॥ त्या भिल्लानें तेथें कूर्ममूर्ति देखीली जी जी ॥ मग कूर्मे भिल्लराजा-सरिसें आज्ञा दीधली जी जी ॥ पहा उभयतानी कूर्म आज्ञा माथां वंदिली जी जी ॥ बांधानि घाट देऊळ वसविलें नगर ॥ २ ॥ अतां सांगन ॥ पहा शुचिचित्त विप्र चंडाल स्त्री गमन ॥ नकळत घडतां झाला व्यसनें दीन ॥ टाकोनि अन्नपानहीं फिरतां वणवण ॥ पडला सुधाकुंडातटी मूर्छेनें ॥ छंद ॥ घेवोनि कूर्म नैवेद्य काकमुखांत जी जी ॥ जातां निसटुनि द्विजमुखीं पडेहो शीत जी जी ॥ द्विज चतुर्भुज मग पाहे अपणातें जी जी ॥ मग इंद्र जाणवी प्रसाद महिमें तें जी जी ॥ इंद्रासरिसें प्रणाम

करूनी त्या श्रीकूर्माते जी जी ॥ बैसोनि चालिला द्विज विमानावर ॥ ३ ॥ अता सागन ॥ ऐशापरीं भक्त बहुतेक जाहले मुक्त ॥ श्रीकूर्मनाथ महिमाहो अगणित ॥ आणीक देव राहोनि त्यास भोंवतें ॥ ते देती भक्तजनांला वांछित ॥ छंद ॥ तो ऐक सुंदरेश्वर पश्चिमेस जी जी ॥ करि उत्तरभार्गी कोटीश्वर वास जी जी ॥ कर्पूरेश्वर पूर्वदिशीं विलसे जी जी ॥ तो भैरवेश धणि दक्षिणादिशेस जी जी ॥ श्रीकूर्मपुराणी ज्याची महिमा आसे विशेषे जी जी ॥ तो कूर्मनाथ स्तवियलाहो शरभ धरणींद्र ॥ ४ ॥ अता सांगन ऐका तेचि कथा विस्तारें ॥

## ११. ॥ लावणी जगन्नाथ ॥

जैमिनिनी पुरुषोत्तम सुकथा शौनकादिकां जे कथिली ॥ तेचि कथा क्षणमात्र परिसतां सकल पाप संधा टाली ॥ ध्रु ॥ सृष्टिकरूं भागुनी कमलभु मुक्तिप्रद विष्णुस्तवन ॥ करितां मग तो प्रसन्न होउनि रमांकांत बोल वचन ॥ सहज मुक्ति तरि जनांशि नघडे अनाद्यविद्या योगाने ॥ मुक्ति घडाव्या सुलभ उपायाहिं ऐक अतां तुजला कथिन ॥ उत्कलदेशीं नीलगिरि असे पूर्व सिंधुतीरा जवळी ॥ १ ॥ तेचिकथा ॥ तेथें रोहिणिकुंड ते असे न्यग्रोधा पश्चिमप्रांतीं ॥ तेथें पाहति जे जन मजला देयिन मी त्यांला मुक्ती ॥ यापरि बोलुनि अदृश्य होतां ब्रम्हदेव चाले झटिति ॥ रोहिणकुंडापाशीं येउनि निर्ग्रंसनी झाला चिंतीं ॥ रोहिणकुंडां बुडना भगवत्सरूपतां काका घडली ॥ २ ॥ तेचि कथा ॥ येउनि तैं यमधर्म विनवितां काम नसे मजला मणुन ॥ निजपतिचें इंगीत जाणुनी बोलियलं तेंव्हां श्रीनें ॥ शंकाकृति पुरुषोत्तमाख्य हे क्षेत्र पांच कोसहें पूर्ण ॥ येथें श्रीपुरुषोत्तम दर्शन जे करिती येउनि सुजन ॥ जाण यमा हें सत्य ते क्षणी मुक्ति वधू त्यांला कवळी ॥ ३ ॥ तेचि कथा ॥ कमळनयन छेदुनि शिव तो पीडीयला हत्येकडुन ॥ मग या क्षेत्रीं सुटतां हत्या कपाल तें

टाकी तूर्ण ॥ कपालनामक तीर्थ तें असे त्यास्तळांत झालें मणुनी ॥ कपालमोचन नामें ईश्वर ज्यास्थळांत आहे अजुण ॥ यापरि यमधर्माशि सांगुनी मग ब्रह्माप्रति बोलियली ॥ ४ ॥ तेचि कथा ॥ ऐक कृतयुगीं इंद्रद्युम्न क्षितिपति तो येयिल येथें ॥ अश्वमेध बहु करोनि करवीदारुमाजि भगवंतातें ॥ आणिकहीं बलभद्र सुभद्रा सुदर्शनाच्या मूर्तितें ॥ त्यांचे स्थापन तुजकडुनी तो करविलरे येथें खाचित ॥ ऐकुनि तें यम ब्रह्मदेवहीं चालियले येकेकाळीं ॥ ५ ॥ तेचि कथा ॥ तेंविं कृतयुगीं अवंति नगरीं सूर्यकुळीं जो संभवला ॥ इंद्रद्युम्न क्षितिपति तो श्रीपति दर्शन लोलुप झाला ॥ तेंव्हां वृद्ध ब्राह्मणवचनें नील गिरीप्रति चालियला ॥ दर्शन भुवनेश्वरादिकांचें नारदमुनि सरिसें केला ॥ विप्र वदे तैं मुक्ति विष्णुची सिंधुसैकतीं दडाली ॥ ६ ॥ तेचि कथा ॥ नारद ऋषिच्या वचनें राजा सहस्त्रऽश्वमेधाहिं करुनी ॥ अवभृथाचे अधले रांती च्यारि मूर्ति पाहे स्वप्नीं ॥ भूप सांगतां स्वप्न तें क्षणी भृत्य बोलती येवोनी ॥ वृक्ष येक जलधींतुनि आला लहऱ्याच्या वेगें कडुनी ॥ स्कंध च्यारि अति सुगंधयुक्त तो कोटि सूर्यसा झळझळी ॥ ७ ॥ तेचि कथा ॥ नारद ऋषिच्या वचनें भगवद्रोमरूपसें समजोनी ॥ वाजतगाजत अणितां बोले वृध्दशिल्पि तैं येवोनी ॥ मूर्ति मी निर्मीन राजा या जेंविं पाहिल्यातां स्वप्नीं ॥ ऐकुनि भूपति गोंजुनि कोंजीं वाद्य वाजवि निशिदीनीं ॥ सोवळाचे दिनि भूप मूर्तिचे दर्शन घे प्रातकाळीं ॥ ८ ॥ तेचि कथा ॥ दोनिकडें बलभद्र सुभद्रा सुदर्शनातें पाहुन ॥ इंद्रद्युम्न ध्यान करीतां पुरुषोत्तम बोले वचन ॥ पूजितसे विश्वावसु नामक शबर अह्माला बहुदिन ॥ तत्कुलजाचे हाते देयीं लेप योग्य रंगाकडुन ॥ आलय वटतरू पाशीं बांधुनि करी स्थापना येवेळीं ॥ ९ ॥ तेचि कथा ॥ यापरि भगवद्वाक्य ऐकुनी तेंवि करीतो भुमिपती ॥ ज्याच्या ऐका प्रसादमहिमा सेविति जे तेचि सुकृती ॥ ज्यासि नसे उछिष्ट दोषहीं घेउं जाय नीचा हातीं ॥ ज्यासि भोग मणताति तो पहा देत शीघ्र भुक्ति मुक्ति ॥

शांडिल्याभिध विप्रवराला या भोगें मुक्ति घडली ॥ १० ॥ तेचि कथा ॥ ज्येष्टमास सितदशमी पासुनि त्या पुनवे तागाईत ॥ जेष्टपंचक नामक सद्व्रत हें कीजे नियमें तेथें ॥ त्या येकादशि दिवसी केल्या उपवासहीं निश्चल चित्त ॥ यावज्जीवहीं केल्यां जें फलं तें फलकी त्यस्ला घडतें ॥ धन्य धन्य शरभेंद्र ज्यास हे जगन्नाथ यात्रा घडली ॥ ११ ॥ तेचि कथा ॥

## १२. ॥ लावणी जगन्नाथ माहात्म्य ॥

उत्कलदेशाभीतरीं शोभे पूर्वसिंधुतीरावरतें ॥ प्रसित्ध भूवरि पुण्य पुरीते जगन्नाथ राहे जेथें ॥ ध्रु ॥ भाविकं की तेथील लोक ते लवकल्मष नेणति कोणी ॥ घालुनियां कौपिन वागती शुद्धमनें जेथे रमणी ॥ आणि नसे उछिष्ट ज्या स्थळीं हे समान सर्वहि वर्णीं ॥ भेदबुद्धि टाकोनि सेविती सर्व तुल्य भगवच्चरणीं ॥ बहुतहुमी काय सर्वही जन तेथिल भगवद्भक्त ॥ प्रसित्ध भूवरी ॥ १ ॥ ज्या स्थळिं इंद्रद्युम्न तीर्थकीं असे नसे ज्याला समता ॥ ज्याचे तीरीं येउनि पंडे दाउनियां केवल ममता ॥ आवआव गोपाल आकडेकडेकडे ऐसें मणतां ॥ कासव सहपरिवारें येंउनि भक्षितकीं लाडू देतां ॥ नवलतरीहें काय कौतुकें मिखतसे लक्ष्मीकांत ॥ प्रसित्ध भूवरी ॥ २ ॥ दोनिकडे बलराम सुभुद्रा शोभति ते बंधुभगिनी ॥ त्यामाझांरी उभा राहुनी दावितसे कौतुकें भुवनी ॥ भक्तजनांवरि कारि साउली पुढें हात ते लांबउनी ॥ ज्याच्या महिमा बहुत पुराणीं वर्णितिकीं व्यासादिमुनी ॥ छत्रपती महाराज शरभजी तद्भजनीं झाला निरत ॥ ३ ॥ प्रसिद्ध भूवरी ॥

## १३. ॥ लावणी शीतांकुंडाची ॥

वशिष्ट सांगे ऋषिश्वरांप्रति कथा अद्भुत ॥ शीताकुंड तीर्थ महिमा ऐका प्रशस्त ॥ ध्रु ॥ भारद्वाजाश्रमी आहे तीर्थ पावन ॥ ज्या शेजारी राम लक्ष्मण भरत शत्रुघ्न ॥ यानामाचि च्यारी तीर्थें आहेत जूडून ॥

ज्याचे पूर्वदिशे आहे दुर्गा आपण ॥ छंद ॥ आणि दक्षणेस वित्रमानदी वाहे ॥ ते पश्चीमेस गोत्रानदी आहे ॥ आणि उत्तरेसहिं वाहे गंगा पाहे ॥ सदाजल तापताहे त्या श्रीतीर्थांत ॥ १ ॥ शीताकुंड ॥ श्रावणादि फाल्गुणांत आधीक पोळनें ॥ बाकिं च्यारि महिन्यामाजि असे नेमस्त ॥ तेथें करूनी स्नान दिधल्यां पितरा उदकातें ॥ मकरस्नान गयाव्रजनादिकं सुकृत येतें ॥ छंद ॥ अस मणतां त्यासि ऋषिश्वर पुसति ॥ तीर्थास कांहो शीताकुंड मणति ॥ उदकास लाभली उष्णता कां अति ॥ याचे कारण निरोपोंत अह्मा समस्त ॥ २ ॥ शीताकुंड ॥ लंकेमाजि करितां अग्नी प्रवेश सीतेनें ॥ झाला अग्नी उदकापरि तोचे महिमेनें ॥ सर्वेच भरद्वाजाश्रमिं करितां स्नान ॥ त्या जळांत प्रगटला अग्नी आपण ॥ छंद ॥ हा प्रशस्त आगम ऐकोनि पुराण ॥ श्रमेंद्र तेथें करोनियां स्नान ॥ पितृतर्पण तीर्थविधींहि करुन ॥ ३ ॥ शीताकुंड ॥

## १४. ॥ लावणी प्रयागाची ॥

क्षेत्रते पवित्र जागिं गाजे ॥ गंगा यमुना संगम जेथे लोकोत्तर साजे ॥ध्रु॥ येउनि अतिपावन यमुना ॥ मिळणेसाटीं गंगेचों तें करिता प्रार्थना ॥ ह्मणे ते तुजेशीं मीळना ॥ प्रसिद्ध तुझें नांव ह्मोय तें माझें होईना ॥ छंद ॥ ह्मणे यमुना अमुच्या संगा ॥ पासुन हिं मणती गंगा ॥ मग मिनल्या विमल तरंगा ॥ श्रवण कींजे ॥ १ ॥ गंगा यमुना ॥ अप्सरा पाहुनि दधीचीनें ॥ मोहे त्यजितां रेत भासिलें मारवानोनें ॥ जाहला निजबींडच मणून ॥ घांडा ज्याचा जाठराग्नी पेट भडकून ॥ छंद ॥ त्यासि सरस्वतिनें निश्चित ॥ ठउनि याचि संगमांत ॥ नदीरूपें येउनि गुप्त ॥ आहे आजे ॥ २ ॥ गंगा यमुना ॥ अकार सरस्वति न चक ॥ उकार यमुना मकार गंगा समजा निःशंक ॥ संगम प्रणवरूप ऐक ॥ वटवृक्षादि सोमेश्वरापर्यंत देख ॥ छंद ॥ मूळ मध्यांत वेणी ॥ यालागि मणति त्रिवेणी ॥ स्नानें लाभति जेथें प्राणी ॥ दिव्य तेज ॥ ३ ॥ गंगा यमुना ॥ संध्यादि निज

धर्मानुष्टानें ॥ यज्ञफलाची प्राप्ति होते ज्या स्थळीं संपूर्ण ॥ त्यामुळे प्रयाग अभिधान ॥ तीर्थराजहि मणती भुक्ती मुक्ती देण्यानें ॥ छंद ॥ अणि अश्वमेध ब्रह्यानें ॥ जेथें केले दाहा पूर्ण ॥ तो दशाश्वमेध मणऊन ॥ घाट गाजे ॥ ४ ॥ गंगा यमुना ॥ वेणिमाधवादिक रूपें ॥ जेथें विष्णु वासकरीतो येउनि अपाप ॥ आणि जो प्रळयीं निर्लेप ॥ अक्षयवटें तो दर्शन मात्रें करितो निष्पाप ॥ छंद ॥ आहे शूलटंकेश्वर ॥ आणि संध्यावट थोर ॥ तेवि माधव संकटहर ॥ चतुर्भुज ॥ ५ ॥ गंगायमुना ॥ चन्द्राचे राजयक्ष्म दुखणें ॥ परिहराया ईश्वर राहे सोमेश्वर मणुन ॥ राहती इंद्रादिक सुमन ॥ भरद्वाजादिक ऋषी तीर्थें येऊन ॥ छंद ॥ अवश्य मुंडन करउनि घ्यावें ॥ अणिक सुवासिनीहीं भावें ॥ तेथें वेणी दान करावें ॥ सकळ साजे ॥ ६ ॥ गंगा यमुना ॥ पेसुकृत लवकेल्यानें जेथें ॥ वटबीजानें वृक्षापरी अपार वाढते ॥ करोंनि स्नान त्रिवेणींत ॥ वेणीमाधव सोमेश्वर आणि भरद्वाजऋषीते ॥ छंद ॥ वासुकि अक्षय वट ॥ शेष प्रयाग, चांगट ॥ स्तविती तयांशी नीट ॥ शरभ राजे ॥ ७ ॥ गंगा यमुना संगम जेथे लोकोत्तर साजे ॥

## १५. ॥ लावणी यमुनाउत्पातिचे ॥

ऐक यमुनेची उत्पत्ति ॥ जिचे मज्जने घडे मुक्ति ॥ ध्रु ॥ मनु मणऊनि सूर्याला ॥ त्वाष्टिचे ठायीं सुत झाला ॥ पुत्र उबगतां सवंतीलां ॥ रवंती वाटली संज्ञेला ॥ छंद ॥ पुत्र अपणा व्हावा मणुनी ॥ संज्ञा बहुविध तप आचरुनी ॥ ब्रह्मवराने झाली गर्भिणिजी ॥ मुखावरि टवटवि कांती ॥ १ ॥ जिचे मज्जने ॥ पहा ते असतां नेमानें ॥ गेली त्रिवळी हरपून ॥ स्वयें काजळ लेऊन ॥ खुलती कोरदार नयन ॥ छंद ॥ ऐशीं खुलता गर्भचिन्ह ॥ पाहोनियां ते सूर्यानें ॥ रागाभरतां ते भयान जी ॥ जाहली गर्भातें टाकिती ॥ २ ॥ जिचे मज्जने ॥ कठीण पातळ समपणें ॥ गर्भ भूवरी पडे पूर्ण ॥ पाहा त्यालाहीं सूर्यानें ॥ पाहिलें महाउग्र दिठिनें

॥ छंद ॥ तेणें गर्भ काळा झाला ॥ खबर गेली तें देवाला ॥ ब्रह्म आणि विष्णु आला जी ॥ तेंव्हां त्या गर्भा पाहाती ॥ ३ ॥ जिचे मज्जने ॥ पहा त्यांपैकी कठीण ॥ भाग घेतला ब्रह्मानें ॥ भाग पातळ मागून ॥ घेतला विष्णु आपण ॥ छंद ॥ कठीण भाग पुत्र झाला ॥ धर्म मणोनि नांम तयाला ॥ ठेउनि लोकपालहिं केला जी ॥ अशी धर्माची उत्पति ॥ ४ ॥ जिचे मज्जनें ॥ तयानें सज्जन पोषण ॥ करावें दुष्टा शिक्षण ॥ असा अधिकार ब्रह्मानें ॥ दीधला लोकीं संपूर्ण ॥ छंद ॥ पातळ गर्भें झाली कन्या ॥ पतितजनांला जे शरण्या ॥ यमुना ते हे लोकमान्या जी ॥ विष्णु तिज योजी जनहितीं ॥ ५ ॥ जिचे मज्जनें ॥ येउनि माता आणी पिता ॥ करावें निजकार्य आतां ॥ मणूनी दोघेहीं जातां ॥ भेटि जाहली अवचीता ॥ छंद ॥ तेंव्हां अस्ताचलापाशी ॥ कुशलप्रश्न उभयतांशी ॥ होतां धर्म खिन्न मानशीं जी ॥ होउनी यमुनेशी प्रार्थी ॥ ६ ॥ जिचे मज्जनें ॥ धर्म तें बोले विनयानें ॥ यमुनेग माझी तूं बहिण ॥ तुजमाजि करिती जे स्नान ॥ करि तूं त्यासचि पावन ॥ छंद ॥ येवढी गोष्टी भावाचीतां ॥ चालवावी ऐसें मणतां ॥ बोले यमुना मधुरवार्ता जी ॥ चालवीतें विनंती ॥ ७ ॥ जिचे मज्जनें ॥ अणिक जे करोनि स्नान ॥ करिती तुजलागि तर्पण ॥ असोत ते पापी पूर्ण ॥ शीघ्र मी त्यासि तारीन ॥ छंद ॥ बोलुनि ऐसें ते निघाली ॥ प्रवाहरूपा अंगिकारिली ॥ उदयाचला जाती झाली जी ॥ यमुनेचि ऐशी उत्पत्ती ॥ ८ ॥ जिचे मज्जनें ॥ कार्तिक शुद्ध बीजेस ॥ धर्म येतसे यमुनेस ॥ मणोनी उत्तम तो दिवस ॥ लाभला शरभेंद्र भूपास ॥ छंद ॥ जीचे दक्षिण उत्तर तीरीं ॥ कळिंदपर्वता शेजारीं ॥ प्रयागींहीं स्नान भारी जी ॥ अशी हे यमुनेची कीर्ती ॥ ९ ॥ जिचे मज्जनें घडे मुक्ति ॥

## १६. ॥ लावणी वाराणशीची ॥

भूमंडळीं अति पावन हे वाराणासि नगरी ॥ अगाध अद्भुत महिमा

जीचा नवर्णवे चतुरीं ॥ ध्रु ॥ जीच्या संगे अगाध महिमा लाभें गंगेला ॥ जेथें विश्वेश्वर प्रभू तो तारी पतितांला ॥ दर्शनमात्रें धुंडिविनायक करि यात्रा सफला ॥ आज्ञा करतो भैरव जेथें रक्षि सुजनाशा ॥ छंद ॥ ज्याला भुवनी अन्न मिळना ॥ वाढी त्याला बहू पक्वान्ना ॥ जीला मणती अन्नपूर्णा ॥ राहे ते गौरी ॥ १ ॥ अगाध अद्भुत ॥ वदुं काय मी विचित्र तेथिल महिमा अपार ॥ करोनि गंगास्नान घेउनी पूजा संभार ॥ तरुणी कारिती नित्यहिं यात्रा सुंदर सखवार ॥ ज्याची समता नपवे रंभा कोण अहे इतर ॥ छंद ॥ बुंगी घेउनि फिरती मार्गी ॥ मुख तयांची पाहुनि वेगीं ॥ चंद्र दडोनी वागे स्वर्गीं ॥ लाजुनि अंतरी ॥ २ ॥ अगाध अद्भुत ॥ जीच्या स्मरणें जाती पापें ऐक सयेबाई ॥ अणीकहीं पुरुषार्थ चारिते लाभति लवलायी ॥ तेथें श्रीमहराज शरभजी राजा सवाई ॥ अर्पी बहुधन वास करोनि विप्रांचे पायीं ॥ छंद ॥ जीच्या महिमा सकल पुराणी ॥ व्यासे कथिला अनुपम वाणी ॥ तेथ योजिली प्राकृत वाणी ॥ मानावी थोरी ॥ ३ ॥ अगाध अद्भुत ॥

## १७. ॥ लावणी काशीची ॥

जगिं काशि म्हणोनी अहे भला येक गांव ॥ जिवलगा ऐक तो भला मुक्तिचा ठावरे ॥ ध्रु ॥ ब्रह्मांड जैं महाप्रलईं गेले बूडून ॥ तैं शिवें त्रिशूलीं केलें याचे धारणरे ॥ नव्हे भूमि भूपरि दिसे ब्रह्म निर्गुण ॥ यामुळे मणातिंकी तया काशि मणूनरे ॥ अहे असि वरुणेच्या मध्यभागीं तो गांव ॥ म्हणुनीं अलें त्या वाराणसि नांवरे ॥ जिवलगा ऐक ॥ श्रीसांबशिवाचें जेंकि विहार कानन ॥ यामुळें मणति जनहें आनंदकाननरे ॥ अणि सदा ज्यास्थळीं शंभु करी शयन ॥ मणउनी नांवहीं अले महास्मशानरे ॥ यास्थळा न सोडी कदापिहीं शिवदेव ॥ अविमुक्त मणति यामुळें जाण हा भावरे ॥ २ ॥ जिवलगा ऐक ॥ अणि चहुंकडे तो रुद्र करीतो

वास ॥ यामुळें मणति जन तया रुद्रावासरे ॥ विश्वेश त्यास्थळीं असुनि करी उपदेश ॥ मणउनी राहती तेथें सुर नरेशरे ॥ ते जाण मुक्त जे घेति तयाचें नांवं ॥ अशि कथा जाणवी जना शरब्जी रावरे ॥ ३ ॥ जिवलगा ॥

## १८. ॥ लावणी धुंडिविनायकाची ॥

काशी क्षेत्रा रक्षिति जेकीं होउनि आवरण ॥ त्या गणपतिचीं नांवें ऐका महिमाहिं कथिन ॥ ध्रु ॥ भक्तमनोरथ पुरविन मणउनि धुंडी जो प्रबळ ॥ धुंडी विनायक मणउनि त्याला नांव जगीं आलें ॥ प्रथम तयाचें दर्शन घ्यावें तरि यात्रा सफल ॥ अंती तारक उपदेश बरा त्याला लाभेल ॥ यापरि विश्ववेश्वर तो सांगे महिमा स्वमुखानें ॥ त्या गणपतिचीं ॥ १ ॥ अर्कवासरीं दर्शन मात्रें तापत्रय वारी ॥ अर्काविनायक मणउनि त्याला नाम दिलें चतुरीं ॥ दुर्गविनायक मणवी तो जागें जो दुर्गतिसारी ॥ भिमचंडविनायक दर्शन करितां भयहारी ॥ विघ्नें सकलहिं वारी देहळि गणपति जलदीनें ॥ त्या गण ॥ २ ॥ उद्दंडाभिध गणपति वारी उदंडाहिं दुरितें ॥ पाशपाणि विनायक परिहारि निजभक्त ध्वांत ॥ खड्गविनायक झडकरि वारि माहा विघ्नानें ॥ सिद्धि विनायक भक्तमनोरथ सिद्धिप्रद सतत ॥ अष्टदिशेशी अष्टगणपती पहिलें आवरण ॥ त्या गणपति ॥ ३ ॥ विघ्न-कळंक क्षयकर जाणा तो लंबोदर ॥ कूटदंत विनायक सकळहीं करि दुरितें दूर ॥ सालटंकविनायक कूष्मांडाभिध गणथोर ॥ पाताळीं जो राहुनि दावी मस्तक भूवर ॥ मुंडविनायक मणती त्याला यास्तव मनिजन ॥ त्या गणपति ॥ ४ ॥ गाणापत्य पदातें भजती ज्याच्या पूजेनें ॥ विकट विनायक नाम तयाचें ऐका भक्तीनें ॥ राजपुत्र विनायक देतो गतराज्याहिं फिरुन ॥ प्रणवविनायक निजभजकांला दे स्वर्गस्थान ॥ अष्टदिशेशी अष्टगणपती दुसरें आवरण ॥ त्या गण ॥ ५ ॥ वक्रतुंडविनायक भजतां कारि पातक शांती ॥ एकदंताविनायक भजनें उपद्रव जाती ॥ मर्कट सिंह

गजाचीं वदनें ज्याला शोभती ॥ त्रिमुखविनायक मणउनि त्याला जन सारे मणती ॥ पंचास्यविनायक नांवें मिरवे तो गोजिर वाणें ॥ त्या गणपति ॥ ६ ॥ हेरंबविनायक रक्षी भक्तां जेंवि सुता माये ॥ विघ्नराज विनायक विघ्नें वारूनि दे अभय ॥ वरदविनायक भक्तजनांशी वरदायक सदय ॥ मोदकप्रिय विनायक बहु दोंदिल तो होय ॥ अष्टदिशेशी अष्ट गणपती तिसरें आवरण ॥ त्या गण ॥ ७ ॥ अभयदगणपति सर्वजनांचें भय सत्वर वारी ॥ सिंहतुंदविनायक सर्वोपद्रव संहारी ॥ कुणिताक्षविनायक काशीवासी दुष्टतिं प्रहरी ॥ शीघ्रमनोरथ पुरवी क्षिप्र प्रसादगण भारी ॥ चिंतामणि विनायक भक्तां चिंतामणि रत्न ॥ त्या गण ॥ ८ ॥ काशी दूषक दुर्जन पापें लिहिजों दांतानें ॥ दंतहस्त विनायक मणुनि त्याचें अभिधान ॥ जो काशी तें संरक्षीतो प्रचंड गजवदन ॥ रिझवी झणि उद्दंडमुंड विनायक वरदानें ॥ अष्टदिशेशी अष्टगणपति चवथें आवरण ॥ त्या गण ॥ ९ ॥ स्थूलदंत विनायक संतां दे स्थूल सिद्धि ॥ तीर्थद्रोहक दुर्जन मानस जें विरते युद्धि ॥ तैशापरि तो कलिप्रयगजानन त्यांशी बोधी ॥ द्वितुंदविनायक लक्ष्मीदायक मणती शुभ बुद्धि ॥ चतुर्दंत गजानन परिहरी विघ्नें बहुसान ॥ त्या गणपति ॥ १० ॥ ज्येष्टविनायक भजता होतो सीमंत तनय ॥ देतो भजकां गजगणपति तो गजांत ऐश्वर्य ॥ कालविनायक भजकां नघडे कालाचें भय ॥ श्रीनागेश विनायक देतो नागलोक सदय ॥ अष्टदिशेशी अष्टगणपती पांचवें आवरण ॥ त्या गणप ॥ ११ ॥ विघ्न निवारण करितो श्रीमणिकर्णिविनायक ॥ भजनां होतो भक्तजनां जो आशा पूरक ॥ त्याला आशागणपति ऐसें मणती मुनिलोक ॥ सृष्टिविनायक तो उत्पत्ति स्थिति लय सूचक ॥ यक्षविनायक करितो झडकरि विघ्नाद्रिरदन ॥ त्या गण ॥ १२ ॥ शाश्वत जो निज भक्तजनांला ठेवी सुखरूप ॥ तो गजकर्णविनायक मणउनि जाणावा साफ ॥ चित्रटंक विनायक अणि तो स्थूल जंघ गणप ॥ श्रीमन्मंगळ

गणपति जाणा तो सुंदररूप ॥ अष्टदिशेशी अष्टगणपति साहवे आवरण ॥ त्या गण ॥ १३ ॥ ज्ञानविनायक अमुक्त गणपति मोदगजानन ॥ प्रमोदगणपति सुरमुख गणपति दुर्मुख गण जाण ॥ श्रीगणनाथ विनायक अठवा द्वारपाळ सुगुण ॥ हे छप्पन्न गणाधिप करिती काशीरक्षण ॥ अष्टदिशेशी अष्टगणपती सातवे आवरण ॥ त्या गणप ॥ १४ ॥ या खेरीजहिं भगीरथ गणाध्येक्ष असे तेथें ॥ हरिश्चंद्रविनायक आणि तो कपर्दिगणनाथ ॥ बिंदुविनायक इत्यादिक जे वसती काशींत ॥ वंदि तयांशि शरब्जी सवायी राजा शिवभक्त ॥ दर्शनमात्रें भजकां देती यात्राफल पूर्ण ॥ त्या गणपति ॥ १५ ॥

## १९. ॥ लावणी मणिकर्णिकेची ॥

ऐका श्रीमणिकर्णिकेचा आगम सांगन ॥ जीचे स्मरणें पापें जाती नाहीं अनुमान ॥ ध्रु ॥ उमेसवें स्वछंद असावें मणउनि शंकरें ॥ निज नेत्रानें वामभागीं पाहतां सत्वर ॥ विष्णु मणउनी सवेंच तेथुनि झाला ऐक वीर ॥ तेण निर्मुनि निज चक्रानें तीर्थ ऐक थोर ॥ छंद ॥ विचित्र तप त्यापाशीं करितां ॥ शंकर येउनि हालवि माथा ॥ तीर्थीं कर्णीकामणि खचिता ॥ पडली निसटून ॥ १ ॥ जीचे स्मरणे पाप ॥ यास्तव मणि-कर्णीका मणती जाणा शब्दार्थ चक्राकडुनी झालें यास्तव तें चक्रतीर्थ ॥ श्रीशिव कर्णीकेच्या योगें उत्तम अत्यंत ॥ अणिक जीचे स्नानें लाभति मुख्य पुरुषार्थ ॥ छंद ॥ जीचिया उद्देशें हो जातां ॥ अपाय घडल्यांही अर्धचीतां ॥ त्याला लाभे शिवरूपता ॥ जाणा अन्यून ॥ २ ॥ जीचे स्मर ॥ तीर्थी माजी ऐशी गंगा येकचि मणून ॥ भगीरथानें आणियली ते बहु श्रमेकडुन ॥ कपिलदग्ध निजपितरांला हो तारुनि तर्पणें ॥ निरोप देतां काशी क्षेत्रापाशी येउनें ॥ छंद ॥ श्रीमणिकर्णीकेंत मिळाली ॥ यास्तव ते अति पावन झाली ॥ शरभेंद्राची भक्ति चांगली ॥ तेथे अनुदिन ॥ ३ ॥ जीचे स्मरणे पापें जाती नाहीं अनुमान ॥

## २०. ॥ लावणी पंचगंगेची ॥

पंचगंगेचा हो अतां सांगन विस्तार ॥ कथा बहु सुंदर ते ऐका सादर ॥ ध्रु ॥ पूर्वी वेदशिरा नामक होता ब्राह्मण ॥ शुचीचित्त अप्सरेशी बोले मोहुन ॥ तेव्हां शुक्रोदय होतां पाहून ॥ म्हणे घे होय तुला कन्या सुगुण ॥ छंद ॥ तंव अप्सरेनें रेत स्वीकारीतां ॥ पहा झाली तिजला अनुपम सुता ॥ मग कन्या टाकुनी चाले स्वर्ग कांता ॥ धूतपापा नांव ठेवी कन्येशि विप्र ॥ १ ॥ कथा बहु सुंदर ॥ धूतपापा उपवर होतां विप्रानें ॥ पुशीयेलें वर तुजला मानला कवण ॥ ह्मणे कन्या ज्याला बहुमानीती जन ॥ जोकीं सकळां सुखकर त्याला वरीन ॥ छंद ॥ हे ऐकुनि बोले वेदशिराविप्र ॥ तप करितां लाभे तुजला ऐसा वर ॥ मग धूतपापा करुनी तप उग्र ॥ ब्रह्मवरानें झाली जगीं अति पवित्र ॥ २ ॥ कथा बहुसुंदर ॥ धर्म येउनि तिजपाशीं इछीतां तिजला ॥ धूतपापा मणे विचारी माज्या पित्याला ॥ जुलुम करितां धूतपापा शापी धर्माला ॥ जल होशी मणतां राग आला तयाला ॥ छंद ॥ मग शाप दीधला होशी तूंहीं शिला ॥ हें ऐकुनि धांवत वेदशिरा आला ॥ अहा धर्म शाप अचुक झोंबला ॥ बरें असो तुं चंद्रकांत होशी सुंदर ॥ ३ ॥ कथा बहु सुंदर ॥ ह्मणे विप्र धर्म वर तुज योग्य पाहें ॥ तुझा शापें नदरूप कांशींत वाहे ॥ तुजपासूनी किरणानदी होणारी आहे ॥ तीच्या रूपें त्यानदाशी मीळोनी राहें ॥ छंद ॥ मग धूतपामा किरणा नदी झाली ॥ पहा धर्मनदांशी कांशींत मिळाली ॥ तेथें गंगा यमुना सरस्वतीशी आली ॥ यास्तव तेथें पंचगंगा मणती थोर ॥ ४ ॥ कथा बहू सुंदर ॥ त्या श्रीपंचगंगे माजी जे स्नान करिती ॥ बिंदुमाधवाचे दर्शन जे जन घेती ॥ पांचभौतिक देहाशी ते कधींहीं नयेती ॥ आणि कार्तिक स्नानाची ते ऐका प्रशस्ती ॥ छंद ॥ श्रीप्रयागीं ते मकर संपूर्ण ॥ घडे स्नान केलें फलें येकेस्नान ॥ हे ऐस तेथिल महात्म्य ऐकून ॥ करोनि निघे पहिलें स्नान राजा शरभेंद्र ॥ ५ ॥ कथा बहु सुंदर ॥

## २१. ॥ लावणी दशाश्वमेध ॥

काशीक्षेत्री आहे पावन दशाश्वमेध घाट ॥ देतो विवरूनि तुह्माशि आतां शब्दार्थनीट ॥ ध्रु ॥ श्रीशिव आपण मंदरगिरिवारि करोनियां वास ॥ दिवोदास मन शोधायाशी धाडी ब्रह्मास ॥ तेणें काशीमाजी घेवुनी वृद्धद्विजवेष ॥ दिवोदासापांशी येतां बहुत आयासें ॥ छंद ॥ दिवोदास त्या विप्रा पूजुनि ॥ कुशळ प्रश्नहिं करितां नमुनी ॥ विप्र वदे विश्रांति पाउनी ॥ धरोनि कपट ॥ १ ॥ देतों विवरुनी ॥ तुझ्या सहाये दशाश्वमेध येथें करीन ॥ मणतां ऐसें अंगिकारिलें दिवोदासानें ॥ रुद्रसराचे कांठीं केलें दशाश्वमेध मणुन ॥ दशाश्वमेधिक नांव अलें त्या तीर्थालागून ॥ छंद ॥ दशाश्वमेधेश्वर स्थापिला ॥ ब्रह्मेश्वरहीं दुजा वसविला ॥ ब्रह्मा आपण तेथें राहिला ॥ होउनि संतुष्ट ॥ २ ॥ देतो विवरुनी ॥ कांहीं दिवसा नंतर तेथें श्रीगंगा आली ॥ रुद्रसरोवर नामक तीर्थी संगे मिळाली ॥ दशाश्वमेधीं स्नान करोनि मध्यान्हकाळीं ॥ दशाश्वमेधेश्वरा सेवितां मुक्ति कवळी ॥ छंद ॥ जेष्टमासिंहो यात्रा सुंदर ॥ करितां लाभे सुकृत अपार ॥ तेथ भक्ति करि श्रीशरभेंद्र ॥ भूपति धर्मिष्ट ॥ ३ ॥ देतो विवरुनि ॥

## २२. ॥ लावणी बिंदुमाधवाची ॥

अतां परिसिजे कथा सुजनहो ॥ सावन तूह्मा ॥ बहुत खुषीनें ॥ बिंदुमाधव ॥ कथा सरस ॥ अणा मनास ॥ ध्रु ॥ उमाकांत कार्याचेठांयीं होउनि नियुक्त ॥ माधव आला श्रीकाशीला ॥ निवासहीं मग रचिला तेथें ॥ पंचगंगा ॥ शुचितरंगा ॥ श्रीपंचगंगा ॥ जयें ठांयि शुचि वाहे ॥ स्थीर ॥ फार ॥ नीर ॥ अग्नीबिंदुऋषि ॥ स्तवि तयास ॥ बहु दिवस ॥ १ ॥ तुझें ईष्ट मी करीन आतां मणता देवानें ॥ ऋषी मणेजें ॥ येथें राहिजे ॥ आतां दया क्षणि करिजे ॥ पूर्ण ॥ बरेंह्मणें ॥ आणि फिरून ॥ तो बरें मणे ॥ तुझें नांव मजशी योजून ॥ अनुदीन ॥ मला स्तवीती ॥ जगीं अशेष ॥ पहा सशेष ॥ २ ॥ अणिक तुझ्या नावें बिंदुतीर्थहिं

मणून ॥ होयिल आतां ॥ येथ तत्वता ॥ तयांत स्नानाहिं करितां ॥ जाण मुक्ति घडे ॥ दुरित दडे ॥ ते मुक्ति घडे ॥ असे भूप शरभेंद्र अन्य ॥ मान्य ॥ धन्य ॥ भूप ऐकुनी करी तयास ॥ स्तुती विशेष ॥ ३ ॥

## २३. ॥ लावणी दंडपाणीची ॥

स्थिर मन ॥ ऐकांवजी अतां दंडपाणि आख्यान सांगेन ॥ ध्रु ॥ गंधमादन पर्वतीं यक्ष दंपती ॥ ते कनककुंडला पूर्णभद्र नांदती ॥ सुंदर रूप तारुण्य असे संपत्ती ॥ तें व्यर्थ मानिती नमे पोटिं संतती ॥ छंद ॥ पतिलागि कनककुंडला ॥ बोले संतान नाहि वंशाला ॥ काहिं करा यत्न चांगला ॥ शिवभक्तांला सर्वहीं येयिल मीळून ॥ १ ॥ तप करितां तैं सुभद्र सांब कृपेनें ॥ क्षणी कनककुंडला पहा झालि गर्भीण ॥ मग पुत्र जाहला हरिकेश मणून ॥ श्रीशिवा वेगळें दुजें काहिं तो नेणे ॥ छंद ॥ सुभद्र त्याशि दवावी ॥ जै अक्षराभ्यास करवी ॥ हरिकेश शंकरा सेवी ॥ काशीस चालिला अणी घर सोडून ॥ २ ॥ तप करितां श्रीकाशींत हरिकेशानें ॥ अला सांब ते क्षणी वृषारुढ होऊन ॥ म्हणे दुष्ट निग्रह करि शिष्ट पोषण ॥ जन मणती तुजला दंडपाणि मणुन ॥ छंद ॥ जे तुझे दर्शन घेती ॥ तयांशि देत मी मुक्ती ॥ हा वर दिधला प्रीती ॥ स्तवि तयातें शरभेंद्र चोळ भूरमण ॥ ३ ॥

## २४. ॥ लावणी काळभैरवाची ॥

शिवतनय सकल गुणानिलय भक्तजन सदय देत वर अभय काळभैरव ॥ विनवितों अतां आख्यान तेंचि ऐकांव जी ॥ ध्रु ॥ सुरनिकर अणिक ऋषिप्रवर सकळ अति चतुर मव्यवर सदर मेरु गिरिवर ॥ पाहा करुनि बसुनि ऋषि पुसति कोण सुर थोर जी ॥ तंव मणे कमलसंभव सकळ देवांत प्रबळ जग सकळ मीचि निर्धार ॥ पहाविष्णु कोपुनी मणे मीचि सरदार जी ॥ छंद ॥ गलबला थोर करीताहो ब्रह्मा विष्णु ॥

मग वेदांशि पूसती हो ब्रम्हा विष्णु ॥ ते शंभु थोर मणतीहो ब्रह्मा विष्णु ॥ हे कथा श्रवण करितां देव उभयतां हास्य मांडितां कोपला शिव ॥ १ ॥ विनवितों आतां ॥ तेक्षणी क्रोध ठेवणी पुरुष निर्मुनी त्यास पाहुनी ह्मणे दयाळ ॥ दुष्टांशि कालसा गमशी मणुनि तूं कालरे ॥ जग भरण करिशि वहु सुगुण मणुनि अनुगुनाचे भैरव अभिधान असो निश्चल ॥ त्याशि असा वर देउनी गमे सुरपाळ जी ॥ छंद ॥ तें पहा काल भैरवानें हो कोपावेशें ॥ करंगुळीच्या नखाग्रेनें हो कोपावेशें ॥ केलं ब्रह्मा शिरछेदन हो कोपावेशें ॥ हत्येशि उग्ररूपेंशि निर्मुनी तिजाशि भैरवापाशि पाटवी देव ॥ २ ॥ विनवितों आतां ॥ घेउनी कपाल हिंडतां भूवनि शंभु तो येउनि तें कृपा करूनि बोले वचन ॥ जांई अतां शीघ्र काशीला होय मोचनरे ॥ त्या स्थळा नाथ तूं मला वर असा त्याला देउनि चालिला ईश तत्क्षण ॥ मग कालभैरव राहे तेविं होऊन जी ॥ छंद ॥ जे घेती भैरवदर्शन ते मुक्त होती ॥ जे करिती त्याचें ध्यानें ते मुक्त होती ॥ जे करिताति वंदन ते मुक्त होती ॥ ऐकुनी ख्याति पुराणी शरभ नृपमणी भैरवचरणी धरी दृढभाव ॥ ३ ॥ विनवितों अतां आख्यान तेंचि ऐकांव जी ॥

## २५. ॥ लावणी ज्ञाणवापीची ॥

ज्ञानवापीचा विस्तार ॥ विनवितों परिसा सादर ॥ ध्रु ॥ भूवरी फिरतां ईशान ॥ खुषीनें काशीस येउन ॥ विश्वेशलिंग पाहून ॥ करावा अभिषेक मणुन ॥ छंद ॥ त्रिशूलानें कुंड कल्पुन ॥ त्या उदकें अभिषेकाहिं करून ॥ करिता विश्वेश्वर पूजन री ॥ प्रसन्न झाला ईश्वर ॥ १ ॥ विनवितों ॥ म्हणे मी झालों संतुष्ट ॥ माध तूं आतां निजइष्ट ॥ यापरी मणतां वरिष्ठें ॥ वदे तें ईशान स्पष्ट ॥ छंद ॥ स्वामी तुझ्या अभिषेकार्थ ॥ त्रिशूलें हें रचिलें तीर्थ ॥ उत्तम आसो त्रिलोकांत री ॥ दर्शनें करो पवित्र ॥ २ ॥ विनवितों ॥ तथास्तु मणुनी शंकर ॥ होउनी तीर्थांत नीर ॥ करोनी अज्ञान दूर ॥ दे जना ज्ञान विस्तार ॥ छंद ॥ यासाटी ज्ञानोद

तीर्थ ॥ मणती त्याशी सुज्ञ जनांत ॥ अणीक ऐकावे निश्चित री ॥ सांगतो इतिहास थोर ॥ ३ ॥ विनवितों ॥ कोणियक राजपुरुषानें ॥ काशीचा पठ लिहुन ॥ धाडितां माल्यकेतूनें ॥ दिला राणीला प्रीतीनें ॥ छंद ॥ तीनें चित्र पाहतां पाहतां ॥ ज्ञानवापी ते अवचीतां ॥ तीच्या नजरेशी पडतां री ॥ आटवे प्राचीन सारें ॥ ४ ॥ विनवितों ॥ परि ज्ञानवापीचे दर्शनें ॥ जाहलें मला पूर्वज्ञान ॥ मणतां राजा भक्तीनें ॥ स्त्रीसवें काशीस येउन ॥ छंद ॥ तेथें सोपान बांधून ॥ सेवा कारितां दोघेजण ॥ मुक्त झाले त्या सुकृतानें री ॥ हे कथा जाणे शरभेंद्र ॥ ५ ॥ विनवितों ॥

## २६. ॥ लावणी लोलार्कादि द्वादशादित्यांची ॥

लोलार्कादि द्वादशादित्यांचा उद्भव ॥ सविस्तारें सांगन आतां भावें एकावें ॥ ध्रु ॥ दिवोदास राज याचें मनशोधन ॥ करायाशी आला सूर्य ईश्वराज्ञेनें ॥ काशी माजि राहे नानावेष घेऊन ॥ याचनाहीं करी दिवो-दासा भेटून ॥ छंद ॥ मग नाडळतो छिद्र झाला खिन्न ॥ अहा ऐसें केंवि स्वामीपाशी जाणें ॥ मणऊनी तेणें काशींतचि ठाणें ॥ बारा भागें केलें तेंचि ऐकांवी नावें ॥ १ ॥ सविस्तार ॥ श्रीलोलार्क उतरार्क हे दोघे जण ॥ सांबादित्य अणी द्रुपदादित्य मणुन ॥ अरुणादित्य वृद्धादित्य ऐशीं अभिधानें ॥ छंद ॥ केशवादित्य आणि विमलादित्य ॥ ते यमादित्य जाण गंगादित्य ॥ यानांवें राहे काशी माजि सत्य ॥ दुष्ट निग्रह शिष्ट रक्षणें करी स्वभावे ॥ २ ॥ सविस्तारें ॥ लोलार्क तो राहे असी संगमापशी ॥ तेथें स्नान करितां रथसप्तमी दिवसीं ॥ मुक्तिवडे अणी दर रविवारीं त्याशी ॥ निरखीती जे जे दुख नघडे त्यांशी ॥ छंद ॥ ते मार्गशीर्ष षष्ठी हो सप्तमी ॥ रविवारें मिनल्यां कीजे यात्रा नेमी ॥ हे कथा ऐकुनि राजा गजगामी ॥ करी यात्रा शरभेंद्र तो शुद्ध भावें ॥ ३ ॥ सविस्तारें सांगन आतां भावें ऐकावें ॥

## २७. ॥ लावणी चतुःषष्टियोगिनीची ॥

सर्व कष्टहर चतुःषष्टि योगिनी आख्यान ॥ अतां विनविंतें ऐकाजी सादर होऊन ॥ ध्रु ॥ ईश्वरकार्याविषयीं केवळ नियुक्त होऊन ॥ चौसष्टि योगिनी निघाल्या मंदरगिरिहुन ॥ काशी क्षेत्रीं फिरती नाना वेष घेऊन ॥ पहा करिती दिवोदास छिद्रान्वेषण ॥ नाढळतां लव छिद्रहिं तेथाचि राहति लज्जेनें ॥ १ ॥ आतां विनविते ॥ त्यांची नावें गजाननादी मृगलोचनांत ॥ या चौसष्टि योगिनि वसती काशी क्षेत्रांत ॥ त्रिकाळीं हे जपतां घडे जय युद्धांत ॥ दुष्टग्रहादिक बाधा नघडे किंचित ॥ बाळांशीहो होइळ सत्वर अरिष्ट निरसन ॥ २ ॥ आतांविनविंते ॥ अणिक शारदा नवरात्रीं जी यांचे पूजन ॥ नित्यनेमें करावेंजी तेंवि हावन ॥ तेणें त्यांचे सकल मनोरथ होतील पूर्ण ॥ काशि खंडीं नांवें कथिळीं विस्तारें कडुन ॥ शरभक्ष्मापति सेवी त्यांशी दृढभक्तीनें ॥ ३ ॥ अतांविनविंतें ॥

## २८. ॥ लावणी दुर्गामाहात्म्याची ॥

माहात्म्य थोर दुर्गेच मी विनवीन ॥ तें होय ऐकतां भुक्ति मुक्ति साधन ॥ ध्रु ॥ होता पूर्वी येक दुर्ग मणुनि असुर ॥ तप करूनी झाला सुरांसुरा शिरजोर ॥ पहा देवांनी तैं पूजियला ईश्वर ॥ परदेवतेशी आज्ञापी झडकर ॥ छंद ॥ निज शरीरा पासून ॥ पाहा शक्तीतें भागून ॥ बहु युवतीशीं निर्मून ॥ केली दुर्गासुरावरी चाले देवीनें ॥ १ ॥ तें होय ऐकतां ॥ मग दुर्गासुरहीं आला फौजबंदीनें ॥ पहा युद्ध करीतो देवीशी मायेनें ॥ क्षणि देवीनें तैं केलें असुरदमन ॥ स्तुति करूनी देवहीं पावले स्वस्थान ॥ छंद ॥ मग शक्तीशी समवेत ॥ निज भक्तानुग्रहार्थ ॥ परदेवता काशींत ॥ ते असीपाशि राहिली तीर्थ कल्पुन ॥ २ ॥ तें होय ऐकतां ॥ अले दुर्गा नांव असुरवधेकडून ॥ पहा चतुर्दशी अष्टमी दो दीन ॥ तो भौमवासरहीं दुर्गेशी प्रिय जाण ॥ अणि शारदा नवरात्रीं नेमानें ॥ छंद ॥

स्नान करोनी तीर्थांत ॥ जे कारिताहो यात्रेतें ॥ ते पावती वांछीत ॥ करि ऐशी यात्रा शरभभूप गुणसदन ॥ ३ ॥ तें होय ऐकतां भुक्ति मुक्ति साधन ॥

## २९. ॥ लावणी विश्वेशाविर्भाव ॥

अतां विश्वेशाविर्भाव ॥ विनवितों परिसा सद्भावें ॥ ध्रु ॥ विश्वेश भक्त पोषण ॥ कराया मंदरगिरिहुन ॥ पार्वती समवेत जाण ॥ वृषभारूढ होऊन ॥ छंद ॥ चैत्र शुक्ल त्रयोदशी ॥ दिवसीं पाउनि वाराणसी ॥ त्रिलोचन मंदिराशि जी ॥ चालिला तो शर्वदेव ॥ १ ॥ विनवितों ॥ कार्तीक शुक्ल प्रतिपदा ॥ सौम्य वासरीं अनुराधा ॥ युक्तदिवशीं शिवसाधा ॥ हराया भक्ता भव बाधा ॥ छंद ॥ तेथुनि मुक्तिमंटपास ॥ येउनि बसतां शिव उल्लासं ॥ वाजविती सुर वाद्य विशेषजी ॥ सुस्वरें गाती गंधर्व ॥ २ ॥ विनवितो ॥ पाहा ब्रह्मादिक सुरवरें ॥ करितां पूजा उपच्यारें ॥ तेथुनी सहपरिवारें ॥ भूषवी मंटप शृंगार ॥ छंद ॥ तेथें प्राङ्मुख तो बैसून ॥ ज्योतिर्मय लिंग कल्पुन ॥ बोले शंभू तो आपण जी ॥ मीचि हें ऐसें समजावें ॥ ३ ॥ विनवितों ॥ अणीक उचलोनि हात ॥ वदे हा शिवलिंग येथें ॥ आणि मणिकर्णीका तीर्थ ॥ तेविं श्रीकाशी जगांत ॥ छंद ॥ जाणा तीनी सत्य मणुन ॥ त्या लिंगांत झाला लीन ॥ परीसोनि हे आख्यान जी ॥ शरळजी पूजी दृढभावें ॥ ४ ॥ विनवितों परीसा सद्भावें ॥

## ३०. ॥ लावणी मुक्तिमंटपाची ॥

पार्वती सहित उमापती प्रति पूसती जें रमारमण ॥ तें सांगति शंभू मुक्तिमंटपाख्यान ॥ ध्रु ॥ येथ मानंद मणून येक ब्रह्मामण होय उत्पन्न तो महावंशीं ॥ परि विवेकशून्य भोगी परदारेशी ॥ वैष्णव वेषघेऊन धनाशेकडुन शैव दूषण करी दिननीशी ॥ तेंवि शैव होउनी

निंदी वैष्णवांशी ॥ छंद ॥ चंडाल येतां काशीस ॥ सर्वत्र तीर्थ यात्रेस ॥ नेउनी त्यास ॥ द्रव्य अशेष घेईल दान ॥ १ ॥ तें सांगति शंभू ॥ प्रबळ विप्र सकळ मणुनि चंडाल लोटितां त्याशी ॥ तो जाइल वेगें सोडुनि वाराणसी ॥ अंतर पाहुनी चोर मार्गि सकळत्र मारितां त्याशी ॥ मग कुक्कुट जन्में येउनि या क्षेत्राशी ॥ छंद ॥ राहोनि याचि मंडपांत ॥ मद्भक्तजनां पाहात ॥ नाम ऐकत पाउनी अंत ॥ मुक्ति लाभणें ॥ २ ॥ तें सांगति शंभू ॥ तूं पोटि धरी हे गोष्टि मणति या साटि मुक्तिमंटप ॥ अणि कुक्कुट मंटप मणताति आपाप ॥ भक्तिने येथ येऊन बसुनि दृढमनें करिति जे जप ॥ जे स्मरती हे सुचरित्र होति निष्पाप ॥ छंद ॥ यापरी वदे श्रीरुद्र ॥ ऐकुनी तेंचि अवनींद्र ॥ सकल गुणसांद्र ॥ शरभेंद्र करी-तत्ध्यान ॥ ३ ॥ तें सांगति शंभू मुक्तिमंटपाख्यान ॥

## ३१. ॥ लावणी त्रिलोचन माहात्म्य ॥

भक्तांशि तारि काशींत वास जो करुन ॥ त्या त्रिलोचनाचा महिमा मी वर्णीन ॥ ध्रु ॥ येक खपुत्र दंपती बहुत खुषीनें ॥ त्या त्रिलोचनाच्या प्रासादीं बैसून ॥ पहा घेती ते त्रिकाळी शिवदर्शन ॥ चाऱ्यासाटी फिरतां घडे प्रदक्षण ॥ छंद ॥ नेतां ससाण्यानें त्या दोघां उपायें ॥ पहा खपुत्रानें डसला त्याचा पाय ॥ तो व्याकुल दोघां सुटका होय ॥ अयोध्येशी ते दंपति गेलि उडून ॥ १ ॥ त्या त्रिलोचना ॥ मग पावतां ते अंत त्यांत तो नर ॥ झाला परिमळालय नामक विद्याधर ॥ तो काशींत राहोनि शैवशेखर ॥ त्या त्रिलोचना तें सेवि निरंतर ॥ छंद ॥ रत्नदीपनामक नागराज उदरी ॥ रत्नावळि नामें जन्मली खपुत्री ॥ ते प्रभावती कलावती सहचरीं ॥ पाहा खेळतां ते करी ईश्वर ध्यान ॥ २ ॥ त्या त्रिलोचना ॥ त्या गडिणीशी ते चैत्र तृतीये दिवशीं ॥ त्या त्रिलोचना तें पूजी दिननिशी ॥ वदे स्वप्नांत ईश्वर दुसरे दिवशीं ॥ वरि पूर्वील

पती परिमळालयाशी ॥ छंद ॥ तो माझ्या भक्त परिमळालय ॥ जाण पूर्व जन्मीं तुझा पती होय ॥ तो खपुत्र तुं कपोती निश्चय ॥ अणि सांगे तो वृत्तांत पार्वतीरमण ॥ ३ ॥ त्या त्रिलोचना ॥ पहा तिसऱ्या जन्मांत या तुझ्या गडिणी ॥ वैधव्यदशा पावल्या त्यास वरोनि ॥ झाल्या मर्कटी कदळी फळें चोरोनी ॥ मज शेजारी मग वृक्षावरि राहोनी ॥ छंद ॥ त्या सुकृतें झाल्या नागकन्या जाण ॥ तुह्मि वरा त्यांतें मणतां त्रिलोचनें ॥ त्या आनंदल्या तया तें वरून ॥ ज्यासि पूजी श्रीशरभेंद्र भूप भक्तीनें ॥ त्या त्रिलोचनाचा महिमा मी वर्णीन ॥

## ३२. ॥ लावणी काशी केदार महात्म्य ॥

जी वर्णीन काशी केदार सुकथा ॥ जे श्रोतयाशी लावी सत्पथा ॥ ध्रु ॥ उज्जईनी माजी वशिष्ट मणून ॥ होता ब्रह्मच्यारी शांभव होऊन ॥ तो शिव क्षेत्रें सकलहिं फिरून ॥ अलां काशी क्षेत्रा विरक्त होऊन ॥ छंद ॥ काशीमाहात्य ऐकुन ॥ हिरण्यगर्भापासुन ॥ शिवदीक्षाहीं घेउन ॥ तो तेथचि राहुनि साधी परमार्था ॥ १ ॥ जो श्रोतयां ॥ तो हिरण्यगर्भ ऋषि विमलचित्त ॥ पाहुंजातां हिमवत्केदार लिंगातें ॥ पाहा अर्ध्या मार्गीं पावतां अंत ॥ श्रीकेदारेश प्रगटला तेथें ॥ छंद ॥ मग हिरण्य गर्भरूपी ॥ होतां कैलासगिरिवासी ॥ मणेवसिष्ट प्रतिवर्षीं ॥ मीं सेविन नेमें केदारनाथा ॥ २ ॥ जे श्रोतयां ॥ येकसाष्टि किते तो चैत्रमासीं ॥ पाहा करोनि यात्रा निवतां यात्रेशीं ॥ प्रतिबंधक करितां सुजनीं न्यायेशी ॥ तो युक्त मानुनी चिंती देवाशी ॥ छंद ॥ स्वप्नांत वदे वचन ॥ मी पंध्रा अंशेंकडून ॥ काशींत वास करिन ॥ अस मणुनी ईश्वर दर्शन दे भक्तां ॥ ३ ॥ जे श्रोतयां ॥ पाहा पार्वतीप्रति सांगे शंकर ॥ तां गौरीतीर्थे कलपुनि सामोर ॥ अणि केलें बहु तप त्यांपाशी नरें ॥ पितृकार्यें केल्यां हर्षति पितर ॥ छंद ॥ श्रीकेदार स्मरण ॥ करितांचि तरति जन ॥ शरभेंद्र तेथ राहुन ॥ करि पूजा प्रतिदिन केदारनाथा ॥ ४ ॥ जे श्रोतयांशी लावी सत्पथा ॥

## ३३ ॥ लावणी कपर्दीश व पिशाच मोचनाची ॥

कपर्दीश अणि पिशाच मोचन तीर्थ आख्यान ॥ विनविन आतां तें एकांवें चित्त देऊन ॥ ध्रु ॥ कपर्दि नामक गणपें अपल्या नावें येक तीर्थ ॥ कल्पुनि अपल्या नांवें स्थापी शिवलिंग तेथें ॥ वाल्मिकि नामक एक शांभव त्याहो तीर्थांत ॥ स्नांन करोनी असतां कपर्दीशा पूजीत ॥ छंद ॥ अस असतां मार्गशीर्ष मासीं मध्यान्हकाळीं जीजी ॥ विमलोदकं तीर्थी स्नान करोनी पूढें न्याहाळी जीजी ॥ मग दिसतां राक्षस वाल्मीकानें अंगीं जी केली जीजी ॥ पहा पुसतां तेणें अपली कथा विप्र विनवीली जीजी ॥ पूर्वजन्मि मी गोदातीरवासी ब्राह्मण ॥ १ ॥ विनविन आतां ॥ बहुत तीर्थि म्या दुष्प्रतिग्रहधन लोभें केला ॥ त्या पापानें मरुदेशीं हा जन्म घडला ॥ स्नान संध्या सोचहीन येक्या विप्राला ॥ धरोनि आलों त्याच्या योगें काशी क्षेत्राला ॥ छंद ॥ काशी माजि रिघतां ब्राह्मण त्याला सोडून जीजी ॥ क्षेत्रापाशी मी राहिलों माझ्या पापानें जीजी ॥ भक्षुं जातां शिव-नाम गर्जे ब्राह्मण जीजी ॥ ते ऐकोंनी आलों येथें होउनि पावन जीजी ॥ अतां कैंवितरि मुक्त करावें मजला आपण ॥ २ ॥ विनविन आतां ॥ यापरि पुसतां वाल्मिकि त्यावरि सदय होऊन ॥ ह्मणे या शिवा पूजी तीर्थी स्नान करून ॥ पहा राक्षस मुक्त झाला तैसें करून ॥ यास्तव मणती त्या तीर्थाला पिसाचमोचन ॥ छंद ॥ मार्गशीर्षसित चतुर्दशी दिवसीं या तीर्थांत जीजी ॥ जे करिताती स्नान तर्पण ईश्वर पूजेत जीजी ॥ क्षाणि होती त्यांचे पितर पिशाचजन्मा विरहीत जीजी ॥ अणि होयिल तीर्थ प्रतिग्रह पातक शांत जीजी ॥ ऐकुनि ऐसें यात्रा केलीं शरभक्षमा रमणें ॥ ३ ॥ विनविन आतां तें ऐकांवें चित्तदेऊन ॥

## ३४. ॥ लावणी पार्वतीश्वर महात्म्य ॥

पार्वतीश्वर महात्म्य मी सरस विनवीन ॥ ऐकांवेंजी अतां तेचि परम पावन अख्यान ॥ ध्रु ॥ शिवपार्वती समवेततु हिमागिरिवरी ॥ असतांचि

मेनका पार्वतीशी मस्करी कारि भारी ॥ छंद ॥ तुझ्या पतीचें ठिकाण ॥ कोठे सांग बरें मणून ॥ प्रश्न करितां ते लाजून ॥ शंकराजवळि जाऊन ॥ मणे जावेंजी अपुल्या घरास येऊन ॥ १ ॥ ऐकावेंजी ॥ हे ऐकतां समजोनि सेवंच नीघाला ॥ आनंदकानना येउनि सुखें राहीला शिवभोळा ॥ छंद ॥ कारि पार्वती विचार ॥ येथे गमे कां सुख फार ॥ या प्रश्नाशी उत्तर ॥ कथि गौरीशी शंकर ॥ जेथें वर्तती शिवलिंग तेंचि सुखसदन ॥ २ ॥ ऐकावेंजी ॥ पाहा स्थापिले शिवलिंग सज्जनीं येथें ॥ मणतांचि पार्वती स्थापि अपणहीं तेथें लिंगातें ॥ छंद ॥ ह्मणे संतोषें ईश्वर ॥ हा होय पार्वतीश्वर ॥ दर्शनें करिल उद्धार ॥ ऐकोनि हाचि विस्तार ॥ करि शरभेंद्र भूपती सतत दर्शन ॥ ३ ॥ ऐकावेंजी अतां तेंचि परम पावन अख्यान ॥

## ३९. ॥ लावणी ज्येष्ठेश्वरादिकांची ॥

ज्येष्ठेश्वर अणि ज्येष्ठागौरी जैगिषव्येश्वर ॥ गुहा यांचा महिमा आतां सांगन विस्तारें ॥ ध्रु ॥ शंकर गौरी सहीत काशीक्षेत्र सोडून ॥ मंदरपर्वताप्रति गेल्या दिवसापासून ॥ जैगिषव्य ऋषी येक लिंग स्थापून ॥ गंगातीरीं गुहेंत बैसुनि करि ईशध्यान ॥ छंद ॥ हे सख्यारे येतांचि फिरूनि काशीला ॥ हे सख्यारे पहिलयान तेथ चालिला ॥ उमावर ॥ १ ॥ गुहा यांचा महि ॥ नंदिकेश्वरमुखें तयाला बोलाउनि ईश ॥ बोलें माझ्या भक्तांमाजी श्रेष्ट झालास ॥ तुवां स्थापिल्या लिंगामाजी करितों मी वास ॥ ज्येष्टश्वर मणउनि लिंगाहिं प्रगटे विशेषें ॥ छंद ॥ हे सख्यारे ज्येष्ट शुक्ल चतुर्दशीं ॥ हे सख्यारे इंदुवारिं सेवितां त्याशि ॥ जन्म सरे ॥ २ ॥ गुहा यांचा महि ॥ आणि ज्येष्टागौरी नामें प्रगटे पार्वती ॥ ज्येष्टाष्टमी दिवशी तिजला जे जन सेविती ॥ अष्टैश्वर्य लाभति गुहा दर्शन जे घेती ॥ तुझ्या लिंगा जे सेविती ते मुक्त होती ॥ छंद ॥ हे सख्यारे यापरी वर दीधला ॥ हे सख्यारे ऐकुनी तेथ चालिला ॥ शरभेंद्र ॥ ३ ॥ गुहा यांचा महिमा आतां सांगन विस्तारें ॥

## ३६. ॥ लावणी अमृतेश्वर ॥

मृत जंतूशी वांचवी अमृतेश्वर ॥ तेचिं ऐकावें महात्म्य होउनि सादर ॥ ध्रु ॥ काशीस जवळि सनारूनाम विप्राला ॥ उपजंघनी नामक पुत्र जाहला ॥ पहा सर्पानें पिडितां तो मृत झाला ॥ मग नेउनि त्याला महास्स्मशानाला ॥ स्वर्गद्वाराशी समीप टेवि भूवर ॥ १ ॥ तेचि ऐकावें ॥ मग सनारु तो करी जनीं विचार ॥ अपमृत्युनें पावल्यां अंतहीं नर ॥ त्याशि करावा कोणत्यापरी संस्कार ॥ अस असतां तो उठला सनारुपुत्र ॥ मृत मुंगींही वांचली त्या क्षितीवर ॥ २ ॥ तेचि ऐकावें ॥ अस अद्भुत पाहून खांडितां तेणें ॥ पहा घडलें त्यां ठायींच लिंग दर्शन ॥ तधिपासोनी अमृतेश्वर मणून ॥ त्याशि आलेहो अभिधान असें ऐकून ॥ करी तयाचें पूजन भूप शरभेंद्र ॥ ३ ॥ तेंचि ऐकावें महात्म्य होउनि सादर ॥

## ३७. ॥ लावणी विश्वकर्मेश्वराची ॥

विश्वकर्मेश्वराख्यान विनवितों जो मी आतां ॥ बुद्धीवंत होती अज्ञ मूढनर ऐकतां ॥ ध्रु ॥ विश्वकर्मा वेद पढती गुरूकुळीं राहून ॥ ह्मणे गुरु पर्णशाला नीट बांधी जलहीनें ॥ पुत्र गुरुचा मणे पादुका मजला देयी करून ॥ पळत जातां माझ्या पांयी असाव्या त्या चिकटून ॥ गुरुपुत्रींही मणे लौकरी करानी देई मज वस्ता ॥ १ ॥ बुद्धीवंत ॥ सहाध्याई अपुलें अपुलें अभीष्ट कथितां तयानें ॥ बरें मणौनी अंगिकारुनि आर्धी मूर्खपणानें ॥ पहा मागुती यत्न न चलतां शापाच्या हो भीतीनें ॥ आरण्यांत शिरतां आला तेथें वृद्ध ब्राह्मण ॥ म्हणे काशीक्षेत्रा जांई करूनको तूं चिंता ॥ २ ॥ बुद्धीवंत ॥ काशी क्षेत्रा जाऊनि तेंव्हां विश्वकर्मा सत्वर ॥ आपुल्या नांवें स्थापुनि येक लिंग करी तप उग्र ॥ तीनि वर्षानंनर त्याला प्रसन्न झाला ईश्वर ॥ ह्मणे तुला हे विश्व कराया शक्ति घडेवा सुंदर ॥ अन्वर्थक तूं विश्वकर्मा जनांत होशी तत्वता ॥ ३ ॥ बुद्धिवंत ॥ आणीक

तूझ्या या लिंगातें जे पूजीती केवळ ॥ क्षणही नलगतां त्यांशी बरवी बुद्धि येयील ॥ सांगोनीयां ऐसें देव गुप्त झाला तत्काळ ॥ ऐकोनीयां द्विजमुखें हा वृत्तांत सकळ ॥ पूजी त्याशी शरभेंद्र संरक्षी जो बहूतां ॥ बुद्धीवंत होती अज्ञ मूढनर ऐकतां ॥

## ३८. ॥ लावणी व्याघ्रेश्वराची ॥

अतां बापानों कथितों व्याघ्रेश्वर महिमा ऐका ॥ जेणें चित्तीं धरणें नलगे वाघाचा धोका ॥ ध्रु ॥ अगाध बळकट होउनि दुंदुभि निर्‍हाद असुर ॥ देवांचा जय चिंतुनि हृदयीं करी विचार ॥ यज्ञेंकडुनी सुर माजती ते करीती विप्र ॥ यास्तव आधीं त्या विप्रांचा करीत संव्हार ॥ छंद ॥ जळदिनिशी ॥ श्रीवाराणसी ॥ क्षेत्रांत तामशी ॥ आला तो बोका ॥ १ ॥ जेणें चित्तीं धरणें ॥ ज्येष्टस्थानीं शिवरात्रीं शिवभक्त ब्राह्मण ॥ शिव पूजूनि ध्यानें असतां त्या राक्षसानें ॥ व्याघ्र वेष घेउनि येतां भक्तपराधीन ॥ चाले शंकर त्या सामोरी माणुस होऊन ॥ छंद ॥ मगसधड ॥ ते होउनि पुढें ॥ तो असुर अडे ॥ जी टाकोनी शंका ॥ २ ॥ जेणें चित्तीं धरणें ॥ मग शंकर वधितां त्याशी अरडे असुर ॥ अमरांळीनें स्तवितां मोर्दे बोले शंकर ॥ ज्येष्टस्थानी व्याघ्रेश्वर नामें साचार ॥ शिक्षिन दुष्टां रक्षिन शिष्टा मी निरंतर ॥ छंद ॥ द्विज वदनें ॥ हें श्रवण करुन ॥ शरभ धणीनें ॥ पूजियलें देखा ॥ ३ ॥ जेणें चित्तीं धरणें नलगे वाघाचा धोका ॥

## ३९. ॥ लावणी शैलेश्वराची ॥

वरणानदि शैलेश्वराचा विस्तार ॥ अजि ऐका होइल जेणें भवभय दूर ॥ ध्रु ॥ शिवगौरी जातां हिमाचल सोडून ॥ पहा मेनकेशीं झालें गौरी स्मरण ॥ ह्मणे कन्या दिधली येकटा पाहून ॥ असो आहे कोठें तेंहीं न कळे स्थान ॥ छंद ॥ मग ममतेनें तों हिमवंत अतां हुडकीन मी

जाऊन ॥ असे मणोनी नग उंच भले घेऊन तो जळदीन ॥ बहु देश क्षणी फिरुनरे ॥ काशीस अला भागूनरे ॥ मग पाहुनि भुलला काशीचा विस्तार ॥ १ ॥ अजि ऐका ॥ मग हिमवत्पर्वत पुसे यात्रेकरिला ॥ या नगरीचा धणि कोण विनवी मजला ॥ मणे यात्रेकरी पार्वतीश भोळा ॥ सहा दिवसाखाले येथें शंकर आला ॥ छंद ॥ विश्वकर्मा तो येक सौध रचीतों थोर बहु सुंदर ॥ तुज कैसा हा नकळेचि असा विस्तार तुं पामर ॥ अस निंदिता तथानरें ॥ झालें हिमवंताला ज्ञानरे ॥ ह्मणे रात्रीं स्थापिन लिंग रचुनि मंदिर ॥ २ ॥ अजि ऐका ॥ मग करुनी तैसें जातां हिमाचल ॥ तें पाहुनि हुडमुंडहिं काशीपाळ ॥ श्रीशंकरा विनावितां भक्तवत्सल ॥ तों फिरूनि पाहुनि पार्वतीशी बोले ॥ छंद ॥ हें रचिला तो सखि तात तुझा हिमवंत ॥ पहा लिखित ॥ मज पूजी जो अवगाह करुनि वर्णेत ॥ तोमद्भक्त ॥ मी शैळेश्वर मणवीनग ॥ भवबाधे तें निरसीनग ॥ अस ऐकुनि पूजी राजा शरभेंद्र ॥ ३ ॥ अजि ऐका होईल जेणें भवभय दूर ॥

## ४०. ॥ लावणी धर्मेश्वर ॥

आतां धर्मेश्वराख्यान भावें विनविन ॥ जना धर्म बुद्धी घडे ज्याचे दर्शनें ॥ ध्रु ॥ काशी विशालाक्षी संनिधानी यमानें ॥ वट वृक्षाखाळे धर्मेश्वर स्थापून ॥ तप करितां ईश्वर त्याला प्रसन्न होऊन ॥ दक्षिण दिशा पतित्व देउनि बोले वचन ॥ छंद ॥ तां स्थापिल्या या लिंगाचें दर्शन ॥ जे घेती त्यांचें धर्मी रते मन ॥ अणि सांग इष्ट तूं तेहीं पुरविन ॥ ऐसें मणतां यमधर्म बोले विनयानें ॥ १ ॥ जना धर्मबुद्धी ॥ शुकदंपती या वृक्षीं जी होती राहिली ॥ कांहीं दिवसां दोनि पिल्लीं शुकीला झालीं ॥ पहा दैवयोगें शुकी अंत पावली ॥ ससाण्यानें शुका वधितां पिल्लीं उरलीं ॥ छंद ॥ नसे चारा तरीं आयुष्याचे बळें ॥ तें आहेतनी सजीव अजुणी बाळें ॥ त्यावरी करुणा करावी कृपाळें ॥ ऐसें मणतां ईश्वर त्याशी पाहे आणून ॥ २ ॥ जना धर्म बुद्धी ॥ पुसे शिव त्यांशी तुझा

इष्ट तें काय ॥ मणती पिर्ळी अम्हा इष्ट स्वामीचे पाय ॥ या वेगळें अमुच्या मना येकहीं नये ॥ हें ऐकतां त्याचे ठाईं होउनि सदय ॥ छंद ॥ मग ईश्वरानें विमांनी दोघांस ॥ पहा बैसवोनी नेलें कैलासास ॥ गुरुवचने पूजुनि त्या धर्मेश्वरास ॥ मुक्त झाला ईंद्र वृत्र हत्येपासून ॥ ३ ॥ जना धर्मबुद्धी ॥ आणी दुर्मद नामक राजा यौवन मदानें ॥ स्त्रीलोलुप होउनि करी राज्य अनयानें ॥ शिकारीला जातां काशी-क्षेत्रा येऊन ॥ धर्मिष्ट तो झाला धर्मेश्वर दर्शनें ॥ छंद ॥ कीं चैत्रशुक्ल तृतीयेचे दिवशीं ॥ जे पूजिंति विंशंति पूजा श्रीगौरीशी ॥ ते इष्ट पावती ऐकुनि कथा ऐशी ॥ तेथें यात्रा केली नेमें शरभेंद्रानें ॥ जना धर्म ॥

## ४१. ॥ लावणी वीरेश्वर माहात्म्य ॥

विनवितों अतां सुजनहो वीरेईश्वर कथा सुंदर परमपावनी ॥ झणि तरती श्रवणें जगीं पतित अज्ञानी ॥ ध्रु ॥ कोणि अमित्रजित मणुन येक नरदेव वीर वैष्णव नीतिनें असतां ॥ सुरमुनितो तेथें पहा अला अवचितां ॥ म्हणे भूपतिला पाताळ लोकीं प्रबळ असुर कंकाल नांदतो आतां ॥ अपहरिली तेणें मलयगंधिनी वनिता ॥ छंद ॥ अहे चम्पकावति नगरीं ॥ राजया ॥ दिला गौरीनें वरभारी ॥ राजया ॥ वैष्णवय याचा घात घात ॥ करील तुझा तो नाथ नाथ ॥ तुज नेइल वेगें धरणी ॥ १ ॥ झणि तरती ॥ मज कळउनि ऐसा विचार परम चतुर विनवि सादर वंदुनी भावें ॥ याविषयीं तुम्हीं अतां साह्य करावें ॥ ते आहेरे तुज योग्य बहुत चांगट सांगतों स्पष्ट तां अतां जावें ॥ अस मणुनी जातां जाय त्यास्थळा राव ॥ छंद ॥ मग त्याच्याच त्रिशूलानें ॥ भूपती ॥ त्या असुराला वधून ॥ भूपती ॥ धरोनि तियेचा हात हात ॥ काशीस आला नरनाथ नाथ ॥ मग राहे तेथें रिझुनी ॥ २ ॥ झणि तरती ॥ मग पतीला पुसोनि मलयगंधिनी नियम धरोनि व्हावया सुत ॥ करि गौरीस्तव अभीष्ट तृतीया व्रत ॥ सुत झाला तो पित्यास नये कामास मणउनी

त्यास टाकुनी तेथें ॥ ते जातां झाला बाळ शंकर भक्त ॥ छंद ॥ झाला ईश्वर तैं प्रसन्न ॥ झडकरी ॥ मणे वांछित मी पुरवीन ॥ झडकरी ॥ मणे देई जनांशी इष्ट इष्ट ॥ या लिंगांत असावें नीट नीट ॥ शिव बरें मणे ऐकोनी ॥ ३ ॥ झणि तरती ॥ अणि हरिखुनि बोले इश वीरवैष्णव भूप संभव जाण तूं नृमणी ॥ तुजकारितां झालों अता प्रगट मी भुवनी ॥ वीरेश्वर मणुनी भुवनि यामुळें नांवं घडे हा भत्यास कळवोनी ॥ मग बसला लिंगा माजी गुप्त होवोनी ॥ ॥ छंद ॥ जे भजती त्या लिंगातें ॥ भक्तीनें ॥ ते लाभति चौ पुरुषार्थ ॥ भक्तीनें ॥ हा ऐकोनि महिमा थोर थोर ॥ शरभेंद्र महीपती हीर हीर ॥ करि पूजा चित्ती रिझुनी ॥ ४ ॥ झणि तरती ॥

## ४२. ॥ लावणी ॐकारेश्वराची ॥

ॐकारेश्वर महिमा अद्भुत सुरवर ऋषि गाती ॥ ज्याचे दर्शनमात्रें घडते सायुज्य मुक्ति ॥ ध्रु ॥ पूर्वी काशीक्षेत्रीं ब्रह्मा तप करितां उग्र ॥ प्रगटे चटचट शब्दानंतर प्रणव साकार ॥ ज्योतीमय तो भासे त्रिगुणात्मक लिंगाकार ॥ ब्रह्मयानें तैं स्तवितां त्यांतुनि प्रगटे शंकर ॥ छंद ॥ हे सख्यारे ब्रह्मयास वरहिं देऊन ॥ हे सख्यारे मग मणे त्यास पाहुन ॥ हे सख्यारे कपिलेश्वरहिं मणुन ॥ यया मणती ॥ १ ॥ ज्याचे दर्शन ॥ प्रवाह गंगे-माजि महत्योदरिं जैं येयील ॥ तेव्हां माथां घेउनि गंगावरणा कल्लोळ ॥ पैतृकविधिते करोनि जो ओंकारेशा भजले ॥ नित्यं तृप्त होती त्याचे पितर सकळ ॥ छंद ॥ हे सख्यारे मुक्तिनें तयांचा हात ॥ हे सख्यारे गवसिला जाण निश्चित ॥ हे सख्यारे यापरी मणुनि लिंगांत ॥ करी स्थिती ॥ २ ॥ ज्याचे दर्शन ॥ अतां शाहिरा याविषयीं मी सांगन इतिहास ॥ दमन नामक ब्राह्मण होउनि विरक्त यात्रेस । जातां नर्मदेचे तीरीं गर्गयोग्यास ॥ पुसे सदेहें मुक्त व्हावया सेवूं कवणास ॥ छंद ॥ हे सख्यारे मग गर्ग वदे हा बोल ॥ हे सख्यारे काशीस अतां तूं चल ॥ हे सख्यारे ओंकार-

लिंग देयील ॥ अशी मुक्ती ॥ ३ ॥ ज्याचे दर्शन ॥ अणिक मणे येक मंडूकी त्या लिंगा भोवंतें ॥ फिरत फिरत निर्माल्यहिं भक्षित असतां तियेतें ॥ निर्माल्य स्वीकार पातकें येउनि-यां त्वरित ॥ काकानें मग उचलुनि नेतां पावली अंत ॥ छंद ॥ हे सख्यारे माधवी मणुनि चांगली ॥ हे सख्यारे ते गंधर्वी जाहली ॥ हे सख्यारे गृध्रमुखी मणुनि मानिली ॥ बहुत खंती ॥ ४ ॥ ज्याचे दर्शन ॥ मग ते ओंकारेशा सेउनि झालीरे मुक्त ॥ मणतां दमना सेउनि त्यातें द्वडला तयांस ॥ बसतां लिंगा पुढें श्रीमुखीनामक गुहेंत ॥ नागकन्यकेच्या दर्शनें शुभाशुभ कळतें ॥ छंद ॥ हे सख्यारे ऐकोनि असें पुराण ॥ हे सख्यारे ओंकारलिंग पूजन ॥ हे सख्यारे करि शरभ भूमि रमण ॥ पुण्य कीर्ती ॥ ५ ॥ ज्याचे दर्शनमात्रें घडते सायुज्य मुक्ति ॥

## ४३. ॥ लावणी रत्नेश्वराची ॥

अतां विनवितों मी रत्नेश्वर आख्यान ॥ जन मुक्त होती जे सुकथा परिसून ॥ ध्रु ॥ पहा पार्वतीला द्यावया बहुत नवरत्नें ॥ तो घेउनि वाराणसीप्रति जाऊन ॥ हिमवंत तथें गौरिचें भाग्य पाहुन ॥ तें रत्नें टाकुनि परतला तो लज्जेनें ॥ मग होतां त्या रत्नांत लिंग उत्पन्न ॥ पुसे पार्वती शंकराप्रति कारण ॥ अस पुसतां तीनें वदे ईश वचन ॥ मी पूर्वी होतों यथें लिंगरूपानें ॥ अतां ऐक तुला मी तेचि कथा सांगेन ॥ १ ॥ जन मुक्त ॥ कोणि नर्तकी सेवोनि याचि लिंगाशी ॥ मग सुकृतें त्यातें गंधर्वी जाहली खांशी ॥ शशिलेखादिक त्या तधी गडीणीशी ॥ रत्नेश्वर सेवा करितां येके दिवशीं ॥ तो रत्नेश्वर येउनी वदे तिजंशी ॥ वरि त्याला खर्मी जया वरा पाहाशी ॥ सुख भोगोनी त्यासवें मुक्ति लाभशी ॥ वर ऐसा देतां जाय निजस्थानाशी ॥ ने चौघीला पाताळिं असुर धरून ॥ २ ॥ जन मुक्त ॥ मग घेतां श्रीरत्नेश नाम मोाव्यनें ॥ अळा धांउनि तेथें रत्नचूड ऐकून ॥ मग चवघीला सोडवी त्यास वधून ॥ त्या कन्येशी

तें टांक्यांत बुडी मारून ॥ मग रत्नेश्वरकर्णी निघे वेगानें ॥ त्या चवघींची बोलणीं सांग ऐकून ॥ मग रत्नें दीधल्या वरा अठऊन ॥ या कन्या मातें वरितील असें समजून ॥ त्या रत्नेशातें सेविता रत्नचूडानें ॥ ३ ॥ जम मुक्त ॥ मग कन्येचे माउली पित्या सहीत ॥ अला तेथें नारदमुनी तशा समयांत ॥ मग कळवोनि चवघीहीं आपुलें वृत्त ॥ मग घेउनि जननी जनकाच्या आज्ञेतें ॥ सुख पावल्या वरोनि रत्नचूडातें ॥ मी गुप्त जाहलों संबंच ऐक सांप्रत ॥ तव जनकास्तव प्रगटलो सेविती मातें ॥ जें कृष्णाचतुर्दशि दिनी होति ते मुक्त ॥ हे ऐकोनी शरभेंद्र भूप करि नमन ॥ ४ ॥ जन मुक्त होती जे सुकथा परिसून ॥

## ४४. ॥ लावणी कृत्तिवासेश्वराची ॥

अतां कथितों मी सद्भावें ॥ आईका कृत्तिवासेश्वरलिंगाचा जो आविर्भाव ॥ ध्रु ॥ पूर्वीं गजाशुर वरदानें ॥ माजुनी अविमुक्त याक्षेत्रीं सुजनां हाणी मायेनें ॥ छंद ॥ लोक भले ॥ गजबजले ॥ तेंव्हां दयाळ ॥ घेउनि त्रिशूल ॥ विश्वेश्वर करि असुराचा वध तेंव्हां ॥ तो ह्मणे चर्महें स्वामीनीं घ्यावें ॥ १ ॥ आईका कृत्तिवासे ॥ अणिक कृत्तिवासेश्वर ॥ मणवि जगीं असे असुर तै मणतां सदयें करोनि अंगीकार ॥ छंद ॥ मणे पडिलें ॥ जेथ त्रिशूल ॥ तेथें होईल ॥ तीर्थ विमल ॥ करुनि बयांत स्नान भजति जे मातें लोक ॥ ते कृत कृत्यचि समजावें ॥ २ ॥ आईका कृत्तिवासेश्वर ॥ झगडुनि तीर्थीमाजि पडून ॥ काकते पाहा हंसरूप धरुनि उडाले त्या दिवसा पासून ॥ छंद ॥ हंसतीर्थ ॥ मणति जगांत ॥ अशी कथा ॥ श्रवण पथा ॥ अणुनि तया श्रीकृत्तिवासा पूजी ॥ भूपती शरभिज दृढभावें ॥ ३ ॥ आईका कृत्तिवासेश्वर लिंगाचा जो आविर्भाव ॥

## ४५. ॥ लावणी व्यासभुजस्तंभ ॥

विनविन आतां व्यास भुजस्तंभाचा विस्तार ॥ ज्याचे श्रवणें घडे शिवोत्तमतेचा निर्धार ॥ ध्रु ॥ सकळ शास्त्र पारंगत शौनकादिक ऋषि

जेथें ॥ बघुनि बोलती बहुत खुषीनें शैवसिद्धांत ॥ व्यास जाउनि तेथें मणें हा काय अनर्थ ॥ विष्णुखेरिज दैवत नाहीं जाणा यथार्थ ॥ छंद ॥ व्यासानें यापरी बोलतां ॥ मणति ऋषी तूं सकळ जाणता ॥ ऐसें विश्वेश्वरालयींतां ॥ द्यावें उत्तर ॥ १ ॥ ज्याचे श्रवणें ॥ बरे मणुनि तो व्यास तयांशीं वेगे येऊन ॥ करोनि पंचगंगा स्नानाहिं माधव पूजन ॥ विश्वेशा सामोर ऊजवा हात उभारून ॥ नाहीं विष्णु खेरिज दैवत मणतां मोठ्यानें ॥ छंद ॥ व्यासाचा तैं भुजं ही वाणीं ॥ स्तब्ध राहतां विष्णु-कांनीं ॥ सांगे विश्वेश्वर तो भुवनीं ॥ मजहूनी थोर ॥ २ ॥ ज्याचे श्रवणें ॥ व्यासे करितां अष्टश्लोकें विश्वेशस्तवन ॥ तेंव्हां झाले त्याला वाणी भुजही स्वाधीन ॥ करोनिया मग घंटाकर्णतीर्थांत स्नान ॥ अपल्या नांवें लिंग स्थापुनि केले पूजन ॥ छंद ॥ व्यासाष्टक पारायणें ॥ व्यासेश्वराचे पूजेनें ॥ मुक्ति घडेसें ऐकून ॥ सांगे शरभेंद्र ॥ ३ ॥ ज्याचे श्रवणे घडे शिवोत्तमतेचा निर्धार ॥

## ४६. ॥ लावणी श्रीव्यास शापविमोक्षणाची ॥

श्रीव्यास शापविमोक्षण अतां विनवीन ॥ तेंचि ऐकावें आख्यान चित्त देऊन ॥ ध्रु ॥ व्यास शांभव होवोनि काशीं-माझारीं ॥ निज शिष्याला माहात्म्य काशिचे भारी ॥ पाहा उपदेश करीत दोनि प्रहरी ॥ तो मधोकर मागुन भूक निवारीं ॥ छंद ॥ पहा येणें रीती असतां कोणे दिवशी ॥ श्रीव्यासाचें तैं चित्त शोधायाशी ॥ श्रीविश्वेश्वर सांगे पार्वतीशी ॥ आजि पासूनी व्यासा नमिळांवे अन्न ॥ १ ॥ तेंचि ऐकावें ॥ मग गौरीनें सकळांस तेंविं सुचवीलें ॥ मग व्यासाला लव भिक्षान्न नमिळालें ॥ पहा व्यासाला उपवास तीनि जाहलें ॥ मग आश्चर्यें तो शिष्यांस पाहुनि बोले ॥ छंद ॥ अरे येथें कोणीं कां भिक्षा न घाली ॥ काय भीक लागली राजाज्ञाकीं झाली ॥ कीं महोत्सवें त्याचीं चित्त भूलली ॥ हे सांगावें मजलागि नीट शोधून ॥ २ ॥ तेचि ऐकावें ॥ मग

व्यासाचे सात्छिप्य सर्व विशेष ॥ पहा शोधुनियां ते सांगति कीं तयांस ॥ स्वामि लक्ष्मीं या काशींत करीते वास ॥ अणि विद्या येथें आहेत अशेष ॥ छंद ॥ अणि मुक्ति क्षेत्र त्रयीरूप आहे ॥ हें ऐकुनि व्यास शापी जनां पाहे ॥ धन विद्या भक्ति तीनि पिढया नराहे ॥ असं शापोनी भिक्षेस निघाला फिरून ॥ ३ ॥ तेचि ऐकावें ॥ मग भवानी विश्वेश होउनी नर ॥ पहा मार्गीं व्यासा करोनी उपच्यार ॥ तुह्मि भोजना या अशी गोष्टि विचित्र ॥ तो ऐकुनियां आनंद पावला फार ॥ छंद ॥ निजशिष्यां सह भ्या करावें भोजन ॥ मग अंगिकारितां तेहिं गृहपतीनें ॥ निज शिष्या सह तो व्यास घरा येऊन ॥ मग बैसतां खुशाल करूनि भोजन ॥ ४ ॥ तेचि ऐकावें ॥ गृहपती तैं विचारी पहा व्यासास ॥ जी क्षेत्रीं कवणे रीतीं की जेवास ॥ मणे आहंता मात्सर्य मदादिकास ॥ परिहरुनी जे राहती सकृत तयांस ॥ छंद ॥ अस मणतां पूसे गृहपती फिरून ॥ तुजपाशीं अहे यामाजि धर्म कवण ॥ हे ऐकुनि टकमक पाहे तो भीऊन ॥ मग व्यासाला पाहुनी ह्मणे ब्राह्मण ॥ ५ ॥ तेचि ऐकावें ॥ तुज लागेल शाप तो तुझा मणून ॥ मग माझ्या क्षेत्रीं नलगेतां राहणें ॥ अस मणतां श्रीव्यास वदे नमुन ॥ जी अष्टमि आणी चतुर्दशी दो दिन ॥ छंद ॥ मज द्यावे येथें यावया मणून ॥ तो गंगा पूर्वतीरीं वास करून ॥ श्रीव्यास करी काशीचें दर्शन ॥ कथि आख्यान सकळांस श्रम भूरमण ॥ ६ ॥ तेचि ऐकावे आख्यान चित्त देऊन ॥

## ४७. ॥ लावणी नित्ययात्रेची ॥

अतां नित्य यात्रा प्रकार सांगेन ॥ तेचि ऐकावेंजी तूह्मी भक्ती कडुन ॥ ध्रु ॥ अरुणोदय समई करूनी गंगा स्नान ॥ मग संध्यादिक नित्य कर्म करुन ॥ श्री विश्वेश्वर माधव ढुंडी गण ॥ दंडपाणी भैरव काशी गुहा वदन ॥ श्रीगंगा अन्नपूर्णा मणिकर्णिका ॥ ध्या याचें दर्शन

नित्यहिं नमुनी ॥ दर मंगळवारीं भैरवा ते देखा ॥ मग सोडा तूह्मीं पातकांचा धोका ॥ व्यासोक्तीनें ॥ १ ॥ सचेल स्नान चक्रतीर्थी करून ॥ मग करूनी तर्पण देउनि विप्रां दान ॥ मग आदित्य द्रौपदी नारायण ॥ दंडपाणी महेश्वर यांलागि नमुन ॥ मग ढुंढी दर्शन ज्ञानोदस्पर्शन ॥ अणि नंदीकेश तारकेश सुगुण ॥ श्रीमहाकालेश्वर यांतें पूजून ॥ दंडपाणि दर्शनें पंचतीर्थी पूर्ण ॥ मुक्ति स्थान ॥ २ ॥ दर चतूर्थीस गणेश दर्शन ॥ बेवोंनो द्यावें विप्रां मोदक दान ॥ मग हर्ष पावतो तेणें गजानन ॥ दर रविवारीं द्वादशार्क दर्शन ॥ जी ध्यावें तेणें दूर होय विघ्न ॥ दर एकादशी दिवशी नेमें कडुन ॥ श्रीविष्णुचेंहो कीजे संदर्शन ॥ जी पुण्याची अभिवृद्धि होते तेणें ॥ क्षणक्षण ॥ ३ ॥ असा ऐका यात्रा द्विसप्तायतन ॥ त्या मत्स्योदरी माजी करुनी स्नान ॥ ओंकारेश्वर दुसरा त्रिलोचन ॥ अणि कृत्तिवासेश्वर ऐश्या क्रमानें ॥ अणि रत्नेश चंद्रेश केदारेश ॥ मग धर्मेशहिं वीरेश तो कामेश ॥ विश्वकर्मेश्वर मणिकर्णीकेश ॥ अविमुक्तेश्वर आणीक विश्वेश ॥ हे सगुण ॥ ४ ॥ कीं कृष्णपक्ष प्रतिपदे-पासून ॥ त्या चतुर्दशी पर्यंत अनुदिन ॥ जी त्याचें दर्शन ध्यावें मौनेंकडुन ॥ आणि मनोरथ सिद्धि होय तेणें ॥ दर अष्टमीचे दिवशी कीत्रेश ॥ आणि पार्वतीश पशुपतीश गंगेश ॥ अणि नर्मदेश गभस्तीशहीं सतीश ॥ वा तारकेशहीं करीं पापध्वंस ॥ निज दर्शनें ॥ ५ ॥ अणि ऐका आग्नीध्रेश ऊर्वसीश ॥ मग नकुलीश्वर तेंवि आषाढीश ॥ अणि भारभूतेश्वर लांगलीश ॥ त्रिपुरांतकं तैसा मनःप्रकामेश ॥ तो प्रीतीकेश मदालसेश्वर ॥ तिलपर्णेश्वर अकरा लिंग थोर ॥ आग्नीध्र कुंडीं स्नान करूनी नरें ॥ त्या सेविं मातेंरुद्र पद त्वरें ॥ तें लाभण ॥ ६ ॥ अणि चरणतीर्थामाजो करूनी स्नान ॥ मग ध्यावें शैलेश्वराचे दर्शन ॥ मग वरणा संगमांत स्नान करुन ॥ मग घ्यावें संगमेश्वर दर्शन ॥ स्वर्लीन तीर्थामाजि करूनि स्नान ॥ मग घ्यावें स्वर्लीनेश्वर दर्शन ॥ मग मंदाकिनी तीर्थीं करुनी स्नान ॥ मग कीजे मध्यमेश्वर दर्शन ॥ भक्ति कडुन ॥ ७ ॥ मग हिरण्यगर्भेश्वराचे दर्शन ॥

अणि करुनी मणिकर्णिकेंत स्नान ॥ मग कीजे ईशानेश्वर दर्शन ॥ मग करावे गोप्रेक्ष्याचें दर्शन ॥ अणि कपिल तीर्थामाजी करुनी स्नान ॥ मग कीजे वृषभध्वजाचें दर्शन ॥ मुक्तीछेनें ॥ ८ ॥ उपशांतेश्वर तीर्थी करुनी स्नान ॥ मग ध्यावें उपशांतेश दर्शन ॥ अणि पंचणूडाऱ्हर्दी करूनी स्नान ॥ मग करांवजी ज्येष्टेश दर्शन ॥ अणि समुद्रकूपामाजी करुन स्नान ॥ मग ध्यांवें तेथिल लिंगाचे दर्शन ॥ अणि शुक्रेश्वर तीर्थी करुनी स्नान ॥ मग कीजे शुक्रेश्वराचें दर्शन ॥ नेमे कडुन ॥ ९ ॥ आणि दंडखाततीर्थी करुनी स्नान ॥ मग कीजे व्याघ्रेश्वराचे दर्शन ॥ अणि शौनकेशतीर्थी करुनी स्नान ॥ मग कीजे जंबुकेश्वर दर्शन ॥ यारीती कृष्णप्रतिपदे पासून ॥ त्या चतुर्दशी पर्यंत अनुदिन ॥ जी ऐका यात्रा करीतां नेमानें ॥ ते तरती केवल पामरहीं जन ॥ श्रमाविणें ॥ १० ॥ गोप्रेक्ष्यतीर्थामाजी करुनी स्नान ॥ मुखनिर्माळिका गौरीचें दर्शन ॥ अणि ज्येष्टवापी माजी करुनी स्नान ॥ यग कीजे ज्येष्टागौरीचें पूजन ॥ अणि करुनी ज्ञानवांपी तीर्थस्नान ॥ मग कीजे सौभाग्यगौरी पूजन ॥ श्रृंगार-गौरी पूजन ॥ सुविधीनें ॥ ११ ॥ अणि विशाल गंगेमाजी करुनी स्नान ॥ मग कीजे विशालाक्षीचें पूजन ॥ अणि ललिता तीर्था माजि करुनी स्नान ॥ मग करावेंजी ललितेचे पूजन ॥ अणि भवानी तीर्थांत करुनी स्नान ॥ मग कीजे अन्नपूर्णेचे पूजन ॥ अणि बिंदु तीर्थामाजि करुनी स्नान ॥ मग कीजे मंगळागौरी पूजन ॥ येके दिनें ॥ १२ ॥ त्या गौरीपांशी लक्ष्मीतें पूजावें ॥ फल याशि जाणा सर्व दुःखाभाव ॥ प्रति नवमी दिवशी चंडी दर्शन ध्यावें ॥ पहा तेणें लाभे जनां शुभ सर्व ॥ दर नवमी अथवा पौर्णिमा शुभदिनी ॥ जीं कुलस्तंभ दर्शनें कडूनी ॥ झणी जाती सर्व दुःखें तें टळूनी ॥ यासाटी कीजे यात्रा नेमेंकडूनी ॥ शुद्ध मन ॥ १३ ॥ अणि गंगास्नान विश्वेश दर्शन ॥ हे करावेंजी नित्यहि नेमेकडुन ॥ या यितुकया यात्रा कथिलया व्यासानें ॥ यापैकीं कीजें नित्य येक दोनें ॥ जे येकाहिं यात्रा

न करितीं ज्या दिवशीं ॥ पहा पितर तयांचे शापितातीं त्यांशी ॥ हे ऐकुनि राजा शरमेंद्र गुणराशी ॥ प्रतिदिनी यात्रा करी विभवेंशी ॥ सत्वगुणें ॥ १४ ॥ तेंचि ऐकावेंजी तुह्मी भक्तीकडुन ॥

## ४८. ॥ लावणी अंतर्गृहयात्रेची ॥

आता ऐका यात्राकर सज्जनहो सादर ॥ सांगन तुम्हा अंतर्गृही यात्राप्रकार ॥ ध्रु ॥ करोनि गंगास्नान निजानुष्ठानाहिं सारुन ॥ माझ्या पापक्षयार्थ करितों यात्रा मणुन ॥ मणिकर्णिकेमाजि स्नानहिं करोनि नेमानें ॥ आधीं मणिकर्णिकेश दर्शन करून ॥ छंद ॥ देखा कंबळाश्वतर ॥ वासुकीश पर्वतेश्वर ॥ गंगाकेश ललिता सुंदर ॥ हा क्रम थोर ॥ १ ॥ सांगन तुह्मा ॥ जरासंधेश्वर सोमनाथेश्वर थोर ॥ वराहेश्वर ब्रम्हेश्वर अणि अगस्तीश्वर ॥ कश्यपेश्वर हरीकेश श्रीवैद्यश्वर ॥ ध्रुवेशहीं अणि गोकर्णेश हाटकेश्वर ॥ छंद ॥ कीकसेश्वर दर्शन घ्यावें ॥ भारभूतेश्वरास जावें ॥ चित्रगुप्तेश्वरा मनावें ॥ ऐका साचार ॥ २ ॥ सांगन तुह्मा ॥ चित्रघंटा पशुपतीश्वर पिता महेश्वर ॥ कलसेश्वर चंद्रेश्वर वीरेश्वर विद्येश्वर ॥ अग्नीश्वर अणि नागेश्वर मग हरिश्चंद्र ॥ चिंतामणि विनायक सेनाविनायक थोर ॥ छंद ॥ वसिष्ट वामदेवां भजा ॥ त्रिसंध्येश त्रिशालाक्षी पूजा ॥ मगधर्मेश विश्व पूजा ॥ सेवा सादर ॥ ३ ॥ सांगन तुह्मा ॥ आशा विनायक वृद्धादित्या नंतर ॥ चतुर्वक्रेश्वर ब्राह्मीश्वरेहीं सुंदर ॥ मनःकामेश्वर ईशानेश्वर चंडीश्वर ॥ भवानी मग शंकर ढुंढीराजराजेश्वर ॥ छंद ॥ लांगलीश नकुलेश पूजिजे ॥ परान्नेश परनेश सेविजे ॥ प्रतिग्रहेश्वर यात्रा कीजे ॥ ऐश्या प्रकारे ॥ ४ ॥ सांगन तुह्मा ॥ निष्कलंकेश्वर मार्कंडेयेश्वर दर्शन ॥ घेउनि अप्सरेश्वर गंगेश्वरहीं सेऊन ॥ ज्ञानवापीमाजि अनंतर करोनि स्नान ॥ नंदिकेश अणि तारकेश यात्रेशीं जाणें ॥ छंद ॥ महाकालेश्वरा जाउनी ॥ मग सेवावा दंडपाणी ॥ महेश्वरहीं मौनेकडुनी ॥ ऐका विस्तार ॥ ५ ॥ सांगन तुह्मा ॥ मग मोक्षेश्वर वीरभद्रेश्वरहीं

विख्यात ।। अविमुक्तेश्वर पंचविनायक श्रीविश्वनाथ ॥ यांचें दर्शन घेउनि सोडुनि मागुती मौनातें ॥ अंतर्गृह यात्रेनें ईश्वरे पावो मोदातें ॥ छंद ॥ मणउनि मुक्ति मंटपांत ॥ बसुनि विऱ्हाडा जावें स्वस्थ ॥ प्रगटकरी हा पुराणार्थ ॥ राजा शरभेंद्र ॥ १ ॥ सांगत तुझा अंतर्गृह यात्राप्रकार ॥

## ४९. ॥ लावणी पंचक्रोशयात्राशी ॥

अतां शाहिरा ऐक बयाणें ॥ पंचक्रोश यात्रा कथन ॥ ध्रु ॥ जेथें कवि तो मी संपूर्ण ॥ सकृत जयाचे करितां श्रवण ॥ झडकरि होती पतीत पावन ॥ असो अतां तो क्रम विनवीन ॥ मणिकर्णिका स्नान करून ॥ मुक्तीमंटपामाजि बसुन ॥ माझ्या पापक्षयाकारणें ॥ पंचक्रोश यात्रा करिन ॥ मणुनि निघावें तेथुन ॥ १ ॥ पंचक्रोश ॥ विश्वेश्वर आदित्य अनेक ॥ द्रौपदीनंतर विष्णु सुरेख ॥ दंडपाणी मग ढुंढी विनायक ॥ कालराजेश्वर पंचविनायक ॥ यांचे दर्शन करूनि नेटकें ॥ मुक्तीमंटपा यावें अणिक ॥ तेथें वसती जे सुरनायकं ॥ त्यांचे दर्शन करुनि स्मयक ॥ मणिकर्णिका तीर्थ तारक ॥ तेथें जावें परतुनि देख ॥ तयाचें करावें पूजन ॥ २ ॥ पंचक्रोश ॥ ढुंढिविनायक साक्षिविनायक ॥ सिद्धिविनायक अर्कविनायक ॥ दुर्गानायक चंडविनायक ॥ देहळि विनायक अणि लोलार्क ॥ षोडशाविनायक सिद्धिविनायक ॥ अणिकहीं उद्दंडविनायक ॥ स्थावरि पाशपाणि विनायक ॥ नंदिकेश आणि खड्गविनायक ॥ अणीक सप्तावरण विनायक ॥ कालराजहीं स्वामि कार्तिक ॥ ययांचें करावें दर्शन ॥ ३ ॥ पंचक्रोश ॥ मंगळागौरी गंगादेवी ॥ विकटाक्षी आणि ललितादेवी ॥ द्रौपदि आणी बंदीदेवी ॥ भीमचंडी दुर्गादेवी ॥ अन्नपूर्णा दुर्गादेवी ॥ दंडपाणिचा मुंडादेवी ॥ विष्णुहिं अश्वारुढादेवी ॥ ज्वालानरहरि अणि भैरवी ॥ द्वादशार्क रुद्राणीदेवी ॥ आणिक विमल दुर्गादेवी ॥ करावें तयांचें पूजन ॥ ४ ॥ पंचक्रोश ॥ गौरीकुंडहीं गंगा केशव ॥ सिंधुतीर्थ उन्मत भैरव ॥ दुर्गाकुंडहीं महादेवें ॥ रविरक्ताक्षाभिधं गंधर्व ॥ वरणासंगम आणि भैरव ॥

पिळपिल्ला अणि आदि केशव ॥ असि संगमहीं बिंदुमाधव ॥ गुरू वसिष्ट वामदेव ॥ सप्तावरणाभिध गंधर्व ॥ कर्दम तीर्थ सकळहिं देव ॥ नमावे सकळहिं भक्तिनें ॥ ५ ॥ पंचक्रोश ॥ मणिकर्णिकेश्वर सोमेश्वर ॥ जरासंधेश्वर गुळटंकेश्वर ॥ बालवद्धेश्वर सर्वेश्वर ॥ आदि वराहेश्वर संगमेश्वर ॥ केदारेश्वर हनुमदीश्वर ॥ दशाश्वमेधेश्वर मोक्षेश्वर ॥ विशालाक्षी कर्दमेश्वर ॥ अणीक विष्वक्सेनेश्वर ॥ करुणतीर्थ सोमनाथेश्वर ॥ मणिकर्णिका वीरभद्र ॥ अणीकहीं पारिसाजी स्थिरमनें ॥ ६ ॥ पंचक्रोश ॥ विरुपाक्षेश्वर करुणेश्वर ॥ दुर्गाकुंडाहिं नीलगणेश्वर ॥ नागनाथेश्वर यक्षेश्वर ॥ नीळकंटेश्वर विमलेश्वर ॥ भृंगीरिटीश्वर गणप्रियेश्वर ॥ काळकूटेश्वर अमृतेश्वर ॥ विरुपाक्षेश्वर कामेश्वर ॥ मोक्षदेश गंधर्व सागर ॥ ज्ञानदेश अवतार शिवेश्वर ॥ आणिक येकपद गणेश्वर ॥ असंख्यात लिंग पावन ॥ ७ ॥ पंचक्रोश ॥ भूतनाथेश्वर भीमेश्वर ॥ सोमनाथेश्वर रामेश्वर ॥ कपर्दीश गणनाथेश्वर ॥ चारुमुखेश्वर वीरभद्र ॥ गणेश काळनाथेश्वर ॥ असि संगम उत्कलेश्वर ॥ कपिलधारा तपोगणेश्वर ॥ पंचगंगा इंद्रियेश्वर ॥ रामनाथेश्वर भरतेश्वर ॥ लक्ष्मणेश्वर शत्रुघ्नेश्वर ॥ अणिक तुह्माळा विनविन ॥ ८ ॥ पंचक्रोश ॥ द्यावा भूमीश्वर विश्वेश्वर ॥ देवसंघेश्वर पृथ्वीश्वर ॥ वृषध्वजेश्वर मयूखेश्वर ॥ गजेंद्रेश स्वभूमीश्वर ॥ आणिक पंचपांडवेश्वर ॥ ब्रह्मेश्वर युपसर्वेश्वर ॥ प्रल्हादेश्वर संगमेश्वर ॥ त्रिलोचनेश्वर पर्वतेश्वर ॥ आणिक महेश्वर गभस्तीश्वर ॥ विश्वेश्वर इतुक्यासहि सादर ॥ करावे नमन पूजन ॥ ९ ॥ पंचक्रोश ॥ त्यात्या तीर्थी करुनि स्नान ॥ कीजे श्राद्ध अणि तर्पण ॥ यावेळीं शिवध्यान ॥ करीत जावें मार्गेकडुन ॥ शेखी करुनी यात्रार्पण ॥ सुखें करावें वरी भोजन ॥ स्थूळमार्गे यात्रा कथनें ॥ केलें म्या हें क्रमसोडून ॥ काशीनाथा करितों नमन ॥ सोसावें तें दया करून ॥ ह्मणे शरभ भूरमण ॥ पंचक्रोश यात्रा कथन ॥

## ५०. ॥ लावणी गयामाहात्म्य ॥

सरी नसे तिळभरीरे ॥ स्थळ थोर ॥ गयशीर ॥ जयाला मणती सुरनर गया मणुनि भूवटीरे ॥ ध्रु ॥ ऐकें औरस चौरस ॥ ज्याची परिमिति पंचक्रोश ॥ असे श्रीव्यास ॥ कथी सकळांस ॥ दक्षिण उत्तर मानस बौद्धगया दोकोस ॥ दोनि गिरि पाहें ॥ ज्यास्थळीं फल्गु नदि वाहे ॥ अणिक तें विष्णु पद आहें ॥ आठरा पदें शोभती धर्मशिळेवरीरे ॥ १ ॥ जयाला मणती ॥ अणीक आसे ब्रह्मकुंड वटवृक्षतो मुखंड रुतलों गाढ ॥ खुरे ऊदंड ॥ ज्याला जन गोप्रचार ॥ मणती तें कीं स्थल थोर ॥ हे अशी क्षेत्रें ॥ शोभती जेथ पवित्रें ॥ त्यास्थलीं येक विचित्र ॥ शाहीरा ऐक तें अतां भली वैखरीरे ॥ २ ॥ जयाला मणती ॥ पैतृक विधी ते करून ॥ जेथें अर्पितां पार्वण ॥ पितर चिद्धून ॥ होती तत्क्षण ॥ येकोत्तर हजार ॥ होय कुलांचा उद्धार ॥ लाभती मुक्ती ॥ अशी असे ज्यास्थळी शक्ति ॥ धरुनियां त्यास्थळीं भक्ति ॥ शरभेंद्र भूपती सदा वरी स्तुति करीरे ॥ जयाला मणती सुरनर गया ॥

## ५१. ॥ लावणी गयाची ॥

गय मणुनी होता ऐक भारी असुर ॥ अतां सांगन त्याचा पुण्य कथा विस्तार ॥ तो सव्वाशें योजनांकें उंचावला ॥ अणि साटि योजनें त्याचा घेरा पडला ॥ तप करुनी तेणें ब्रह्मा वश्य केला ॥ वश होतां ब्रह्मा वर हा मागीतीला ॥ छं ॥ प्रपंचीं असती जितुकीं तीर्थे क्षेत्रें ॥ त्याहुनी अधिक व्हावें म्या पवित्र ॥ गयवाणी ऐशी ऐकोनी विचित्र ॥ तवं बोले तो श्रीमहाविष्णुपुत्र ॥ दिधलों वर ॥ १ ॥ अतां सांगन ॥ मग त्याचा देहा पाहूं जे लागले ॥ ते लोक अवघे मुक्तीशीं झोंबले ॥ तें देव अवघे ब्रम्ह्यापाशीं आले ॥ मग जाणुनि ब्रह्मदेव त्याशीं बोलें ॥ ॥ छं ॥ काय चिंतावलां किती याचें पाड ॥ पहा करितों आतां याला

मोंयी आड ॥ तो बोलुनि ऐसें जावोनी त्या पुढें ॥ म्हणें चालवावें बारे माझें कोडें ॥ तां निर्धारें ॥ २ ॥ अतां सांगन ॥ ते ऐक आतां कींजे यज्ञ थोर ॥ तरि शुद्ध जागा नाडळे भूवर ॥ अतिपवित्र बारे तूझें हे शरीर ॥ ते ऐकुनि राक्षस निजेला विस्तार ॥ छं ॥ तंव त्याचे पृष्टी यज्ञ संपविला ॥ मग गयासुर तो हालूं लागला ॥ तै टाकिली त्या माथा धर्मशिळा ॥ अणि हलतां देव दावीती तयाला ॥ वारंवार ॥ ३ ॥ अतां सांगन ॥ मग हालतां तो आले ऋषीश्वर ॥ तैं हलतां गेली विष्णुशी खबर ॥ त्या विष्णुचा जो अर्धा अवतार ॥ तो आला वेगें तेथें गदाधर ॥ छं ॥ नावरतां त्यांशी आला लक्ष्मीकांत ॥ मग झाला भागें गयासुर शांत ॥ मग जाणोनीयां त्याच्या वंचनेंतें ॥ तो विनवी येथें राहावेंजी स्वस्त ॥ निरंतर ॥ ४ ॥ अतां सांगन ॥ तै रुद्र ब्रह्मा कार्तिकेय वसती ॥ मग सम्याग्नी अवसम्याग्नीहीं ठरती ॥ ते गार्हपत्य दक्षिणाग्नी टिकती ॥ तो आहवनीय अग्नी करी स्थिति ॥ छं ॥ अणि सूर्य चंद्र गणेशहीं इंद्र ॥ अणि ऋषी दधीची मंतग कण्व थोर ॥ तो क्रौंच अगस्त्याहिं कश्यप ऋषीश्वर ॥ तो राहे विष्णु शंखचक्रधर ॥ तयावर ॥ ५ ॥ मग ब्रह्मादिक त्याला देती वर ॥ हे पंचक्रोश होइल पुण्य क्षेत्र ॥ वडे येथें तीर्थ क्षेत्रांचा झुंमर ॥ हे तूझ्यां नावें मिरवे निरंतर ॥ छं ॥ जे येथें करि तीर्थ विधी जन ॥ ते मुक्त होती त्यांचे हो कुलीन ॥ मग गयासुर वर हा ऐकून ॥ तो निश्चळ झाला मनांत चिंतून ॥ लोकोद्धार ॥ ६ ॥ अतां सांगन ॥ मी पैतृकविधिचा क्रम तेथें सांगेन ॥ अधिं फल्गु भेटी विष्णुपद दर्शन ॥ मग फल्गु श्राद्ध करावें पहिल्यानें ॥ मग प्रेत पर्वत ब्रह्मकुंड जाण ॥ छं ॥ त्या रामपर्वतावरि प्रेतशिळा ॥ रामकुंडापाशीं बलीकावळ्याला ॥ मग तेथुनि जावें उत्तर मानसाला ॥ मग उदीचि तीर्थाहुनी कनखला ॥ जावें शीघ्र ॥ ७ ॥ अतां सांगन ॥ मग दक्षिण मानस जिव्हालोल दोनि ॥ मतंगवापी धूतकूपहीं सेउनी ॥ बोधतरूमूल ब्रह्मसरा जाऊनी ॥ मग तेथें अम्र सेचन करूनी ॥ छं ॥ मग यमबळी द्यावी श्वानबली ॥ अणि जाणा

नेमे द्यावी काकबळी ॥ अणि रुद्रादिकीं जेथें स्थिती केली ॥ पाही तेथें त्यांची पदे उमठलीं ॥ ते सुंदर ॥ ८ ॥ अतां सांगन ॥ मग करोनियां तेथें पिंडदान ॥ मग कीजे दुग्ध तर्पण दीपदान ॥ रुक्मिणीकुंड गदालोल भजन ॥ मग करावेंजी वैतरणी गोदान ॥ छं ॥ रामगया मधुस्रवा गयाशिर ॥ गयाकूप मुंड पृष्ट अनंतर ॥ आदिगया धोतपद ते सुंदर ॥ ते भीमगया आणी गोप्रचार ॥ स्थल थोर ॥ ९ ॥ अतां सांगन ॥ वटवृक्षाखाले येवोनि प्रशस्त ॥ मग संपवीतां पैतृकविधीतें ॥ मग येती वेर्ग गयावळ तेथें ॥ ते बांधीती हो मालिकेनें हात ॥ छं ॥ अणि मणती मंत्र जैसा ब्रह्मा कीये ॥ जैसा विष्णु कीये वैसा तुंबी कीये ॥ इसवास्ते तुमारे पितर सर्ग गये ॥ अस मणुनी पाठे थापटुनी सदय ॥ उकालिति कर ॥ १० ॥ अतां सांगन ॥ पाहा हजार कुलें मुक्त होती म्हणी ॥ मग शुद्ध श्राद्ध करावें दुजे दिनीं ॥ हा विधी जाणा समान चारी वर्णीं ॥ अता चित्त द्यावी विशेष विधानीं ॥ छं ॥ गये माजी आहे उद्यंत पर्वत ॥ पहा गायत्री व कुमारासहीत ॥ तो ब्रह्मदेव वासकरी तेथें ॥ उद्यंत तीर्थे आहें अगस्त्यकृत ॥ अति पवित्र ॥ ११ ॥ अतां सांगन ॥ अणि आहे तेथें गुहा ब्रह्म योनि ॥ पहा त्यांतुनि निघतां मुक्त होती प्राणी ॥ अणि भस्मकूटीं जनार्दन मणुनी ॥ भगवंत आहे त्याचे हातीं जनीं ॥ छं ॥ तिलरहीत दधि मिश्रित पिंड द्यावा ॥ तें मणिजें माझ्या अंती पिंड बरवा ॥ हा द्यावा मजला गयाशिरीं देवा ॥ अपुल्या करें ॥ १२ ॥ अतां सांगन ॥ ते मुक्त होती त्या पिंडेकडुनी ॥ हा विशेषाहिं समान सर्व वर्णीं ॥ अतां सांगन मी जें करावें विप्रानीं ॥ गायत्री तीर्थी प्रातःस्नान करूनी ॥ छं ॥ गायत्री मनीं ध्यानीं स्वस्थचित्त ॥ मग नेमें करितां गायत्री जपातें ॥ त्या पुण्यं त्याचे पितर होती मुक्त ॥ ते ब्रह्मपदीं राहती शाश्वत ॥ होऊनिअमर ॥ १३ ॥ अतां सांगन ॥ माध्यान्हस्नान सावित्री तीर्थांत ॥ जे करूनी सावित्रीचे संनिधींत ॥ गायत्री जपती त्यांची कुलेंशत ॥ ते निरंतर राहती स्वर्गांत ॥ छं ॥ यापरी सरस्वती

संन्निधीत ॥ जपकरीतां त्याचें कुलीन समस्त ॥ पहा तयेक्षणी होती ज्ञानवंत ॥ यासाटि शरभजी राजा भक्ति तेथें ॥ करी फार ॥ १४ ॥ अतां सांगन त्याचा पुण्य कथा विस्तार ॥

## ५२. ॥ लावणी बंगाळीची काळींची ॥

अतिउग्र काळिका राहिलि जे बंगाळी ॥ मी सांगन तीची उत्पत्ति येकाळीं ॥ ध्रु ॥ पूर्वि चंडिकेन अष्टमातृगणसहित ॥ शुंभनिशुंभ दोधांच्या वधार्थ ॥ प्रबळ झुंज मांडितांहो असुर सेनेंत ॥ तै मातृगणांनी वधिले असुर बहुत ॥ छंद ॥ तैं पळुंलागले कितियेक असुर जीजी ॥ तें पाहे त्यांचा तो फौजदार जीजी ॥ पहा ज्याचे रक्तें होती असुर ते थोरथोर जीजी ॥ मणउनि रक्तबीज नाम त्याशी साचार जीजी ॥ असो असा तो गदा घेउनी फिरवि चौंफेर जीजी ॥ मग ऐंद्रीनजी वज्रें त्यांतें ताडियलें त्वरे जीजी ॥ तै रक्ताचें बिंदु जितुके पडिले भूवर जीजी ॥ मग असुर जाहले तितुके येकेकाळीं ॥ १ ॥ मी सांगन ॥ मग तेहि सकळ असुर त्या मातृगणाशी ॥ आणि करूंलागले युद्ध बहू वेगेंशीं ॥ रणि सबळ हाणितां मातृगणें तयांशी ॥ निपजति रक्तें असुरें हजारानिशीं ॥ छंद ॥ मग ऐश्या असुरें पृथ्वी भरली जीजी ॥ तंव इंद्रादिकां चंडी स्तवीली जीजी ॥ मग चंडीनें तैं शक्ती निर्मीली जीजी ॥ मग तिजला ऐशी आज्ञा दीधली जीजी ॥ आतां वधितें रक्तबीजासरां त्रिशूली जीजी ॥ त्यांचें रक्त पडोंनेंदी कांही भूतळीं जीजी ॥ जीवीनें तू रक्त तयांचें चाटि तात्काळीं ॥ अणिक सकळ देहहीं भक्षि तूं येकली ॥ २ ॥ मी सांगन ॥ मग रक्तबीज असुर उद्भवना ऐक साचार ॥ बोलुनियां ऐसें भ्रमवी शूळ स्वकरें ॥ मग चंडिकेन मांडितां रक्तबीज संहार ॥ आणि रक्तते जिभीं काळी चाटी त्वर ॥ छंद ॥ मग राहितहीं त्यांच्यां शरीर जीजी ॥ आणि भक्षीयलीं त्या काळीनें अपार जीजी ॥ श्री चंडीने या उपायें वधितां आसूर जीजी ॥

तै हर्ष पावले इंद्रादिक अमर जीजी ॥ निजभक्तांला अनायासें करूं उद्धार जीजी ॥ बंगाळीं श्रीगंगातीरीं राहे सादर जीजी ॥ तेचि शरभनरवरें नमियली काळी ॥ ३ ॥ मी सांगन तीची उत्पत्ति येकाळी ॥

## ९३. ॥ लावणी झांडखंडी वैद्यनाथाची ॥

झांडीखंड वैद्यनाथ महिमा बहु अद्भुत ॥ अतां सांगन श्रोतेजनहो ऐका बैसुनि निश्चित ॥ ध्रु ॥ पार्वती प्रती सांगे शंकर भरतखंडा माझारीं ॥ वनखंड मणउनि उत्तम आहे क्षेत्र यक भारी ॥ बदरी बिल्वादिक वृक्षांची जेथें शोभते हारी ॥ व्याघ्र सुखरें गज सामरें जेथें वसती केसरी ॥ त्या आरण्या माजि भक्तानुग्रहार्थ मी गौरी ॥ भवरोगहरनामक तीर्थाचे हो शेजारीं ॥ वैद्येश्वर नामें वसतों रिझोनियां मी अंतरीं ॥ त्यातीर्थांत स्नान करोनि पूर्वी अश्विनी कुमरीं ॥ माझी पूजा करीतां प्रसन्न झालों त्यांवरी ॥ आयुर्वेद देउनि केलों देवांचें धन्वंतरी ॥ आणीक सांगे इतीहास गौरीला उमाकांत ॥ १ ॥ अतां सांगन ॥ पूर्वी तेथें होता येक भिल बैज नामक ॥ मृगांचा जो घातुक आणी सकळ जन कंटक ॥ तो त्या तीर्थी स्नान करोनी भार्येसवें नेटकं ॥ घेउनी हातीं मांस बिल्व मुखी भरुनी उदक ॥ देवपूजित निर्माल्यातें चरणें लोटु निःशंक ॥ आपण मुखीं भरिल्या तीर्थोदकें करूनी अभिषेक ॥ बिल्वपत्रें वाहुनि मजला निवेदी मांसादिक ॥ मणे जगीं मी केवल पापी परंतू तुझ्या सेवक ॥ पूजे मजला या पूजेनें जाहलेकीं तुज सुख ॥ प्रणवरूपें माझे उत्तर ऐकुनि जाय तो हरिखें ॥ येणें रीती बहुत वर्षेहो पूजा करीत ॥ २ ॥ अतां सांग ॥ आले शांभव तेथें गंगा हरिद्वारची घेऊन ॥ भक्ति त्याची कळवूं केलें वृष्टीरूपें म्या विघ्न ॥ आलयिं असतां शांभव भिल्ल येउनि मजला धरियलेंकी म्या मौन ॥ माझ्या नेत्रीं गळतां पाणी अपला डोळा उपडून ॥ मजला देतां दुज्या नयनीं पाणी वाहे तादून ॥ तेव्हां तेणें दुसरा डोळा उपडूनि करितां

अर्पण ॥ शाभव सकळाहिं करूं लागले त्या व्याधाचें स्तवन ॥ तैं मी तेथें प्रगट होउनि दिधलों त्याला नयन ॥ शेखीं त्याला दिधलो मुक्ति यास्तव कीजे दर्शन ॥ त्रिदिन राहे भूपशरळजी तेथें दर्शन करीत ॥ ३ ॥ आतां सांगन श्रोतजनहो ऐका बैसुनि निश्चित ॥

## ५४. ॥ लावणी अदासगणपतीची ॥

विदर्भदेशीं अदोषनामक आहे स्थळ थोर ॥ ज्यासि अदासा मणती त्याचा सांगन विस्तार ॥ ध्रु ॥ आधी त्याची खूण तुह्माला दाविन साचार ॥ नागपुराचे उत्तरभार्गी दो कोसावर ॥ बहुत उंच नानिच ठेंगणा आहे डोंगर ॥ अनेक वृक्षलता पक्षी मृगां आधार ॥ छंद ॥ ते वृक्ष कृतयुगीं रसाळ फळती ॥ रसहीन फळातें त्रेतायुगीं देतीं ॥ द्वापारयुगी तेहीं उणें करिती ॥ कलीयुगीं होती केवळ वृक्ष अपार ॥ १ ॥ ज्यासि अदास ॥ त्या पर्वतीं आहे येक गणेश श्रेष्ट ॥ जोकी बहु सुलक्षण अष्टांग पुष्ट ॥ दर्शनमात्रें वारोनीयां सर्वाहिं कष्ट ॥ पुरवितो झडकरी भक्ताचें इष्ट ॥ छंद ॥ तो देव कृतयुगीं जाणा रत्नयुगीं ॥ मग हेमवर्ण तो त्रेतायुगीं पूर्ण ॥ तो श्वेतवर्ण द्वापारीं निदान ॥ कलियुगीं तो रक्तवर्ण जाणा सुंदर ॥ २ ॥ ज्यासि अदासा ॥ त्याचे दर्शन मात्रें आपण होउनि पवित्र ॥ माविल अपुगीं दाहा कुळें तितुकीं होणार ॥ त्या पुण्याने या यितुक्यांची करिती उद्धार ॥ ऐसे महिमा सांगे दक्षा मुद्गलऋषि थोर ॥ छंद ॥ अणि शंकरादिक देवहिं तेथें वसती ॥ यासाटि यात्रा दरमाहे जे करीती ॥ ते भाग्य भोगुनी शेंखी मुक्त होती ॥ मणुनि शरळजीभूपें केली यात्रा आदरें ॥ ३ ॥ ज्यासि अदास मणती त्याचा सांगन विस्तार ॥

## ५५. ॥ लावणी नर्मदा महात्म्य ॥

नर्मदा नदी भुवरी परम पावन ॥ अतां ऐका सावध तेचि कथा सांगेन ॥ ध्रु ॥ शंकरासाटि नर्मदा नदीने उग्र ॥ तप करितां प्रत्यक्ष

जाहला उग्र ॥ ह्मणे केलेंतां किमर्थ तप उदग्र ॥ तूं सांग इष्ट ते देयिन मी समग्र ॥ छंद ॥ तवं बोले ते नर्मदा प्रार्थुनीं गोड ॥ तूं अहेर्शि देवा व्यापुनि चहुंकडें ॥ जें माझे गर्भी अहेत खडेधाडे ॥ त्या ठाईं तुझें सांन्निध्य असावें पूर्ण ॥ १ ॥ अतां ऐका ॥ आणि लोकी जें मन्निष्ट शिला ठेवोनि ॥ त्यावरि घालिती दूर्वा बिल्व पाणी ॥ त्या शिलाभावे पुरुषार्थ चारि भुवनि ॥ आणि व्हांवें त्यांनीं तुझे भक्त अग्रणी ॥ छंद ॥ हे नर्मदे शिवप्रिये मणूनी ॥ जे प्रातःकाळीं मातें स्मरतीं जनीं ॥ त्या नघडो दुःखहिं जाग्रत्स्वप्नी ॥ आणि भक्ति असावी त्याला तुझे चरणी ॥ तंवं मणे तो तथास्तु पार्वती रमण ॥ २ ॥ अतां ऐका ॥ जो ऐकावें तो देश बहुत पावन ॥ तो वाहे जेथें नर्मदेचा पवन ॥ जे नर्मदा तीरांत राहती जन ॥ जे काशीक्षेत्रीं ते दोघे समान ॥ छंद ॥ अहो ऐका जेथें नांदें गौरीवर ॥ ते जीवन्मुक्त जाण तेथिल नर ॥ जी नर्मदे काक्कर संवशंकर ॥ अस मणती जेथें म्लेछादिक पामर ॥ केला तेथें त्रिदिन वास शरभेंद्रानें ॥ ३ ॥ अतां ऐका सावध तेचि कथा सांगेन ॥

## ५६. ॥ लावणी नर्मदेश्वराची ॥

नर्मदेश्वराचा महिमा अतां वर्णीन ॥ ज्याचे श्रवणमात्रें तरती पातकीजन ॥ ध्रु ॥ सिंधुगामिनी नद्या उत्तम त्याहीं माझारीं ॥ गंगा यमुना सरस्वती नर्मदा च्यारीं ॥ ऋग्वेदस्वरूप गंगा ऐकावें चतुरीं ॥ यजुर्वेदरूप यमुना नर्मदा तिसरी ॥ छंद ॥ श्रीसामवेदरूप जाणा चवथी ॥ ते अथर्वणरूप सरस्वती ॥ या माझारींही गंगा उत्तम मणती ॥ नर्मदातें तपकरी ब्रह्मालागुन ॥ १ ॥ ज्याचेश्रवण ॥ नर्मदेनें गंगेसम व्हावें मणतां ॥ ब्रह्मा हांसुनि बोले ऐसें चिंतूनेंयेतां ॥ नाही ईश्वराशी तुल्य देव पाहतां ॥ पुरुषोत्तमा तुल्य जगीं नाहिं तत्वता ॥ छं ॥ श्री गौरी तुल्य जगीं नसे नारी ॥ श्रीकाशीसम क्षेत्र नसे भारी ॥ हें होतां होशी तूं

गंगेशी सरी ॥ काशी क्षेत्रा आली ऐसें वाक्य ऐकून ॥ २ ॥ ज्याचे श्रवण ॥ त्रिलोचन संन्निधानी पिप्पलातीर्थी ॥ निज नामे स्थापुनि लिंग निज इष्टार्थी ॥ तपहीं करितां श्रीशंकर येऊनी कथी ॥ तूझे मनोरथ फळती वाढेल कीर्ती ॥ छंद ॥ श्रीगंगातीरी स्नानानें जनास ॥ ते तारी यमुना वसतां सात दिवस ॥ ते सरस्वती एक दिन वासें ॥ तूझ्या दर्शनमात्रें होती पतीत पावन ॥ ३ ॥ ज्याचे श्रवण ॥ तूझे ठायीं जितुक्या शिला असती त्यांत ॥ आवाहनाविना असतें मी संनिहित ॥ याविनातां स्थापिल्या श्रीनर्मदेशातें ॥ जे पाहती ते होतील पापीहीं मुक्त ॥ छंद ॥ तो बोलुनि ऐसें नर्मदेशी वचन ॥ त्या लिंगामाजि पावें अंतर्धान ॥ हा ऐसा महिमा विस्तारें ऐकुन ॥ शरभेंद्र पूजी त्याशी दृढभक्तीनें ॥ ४ ॥ ज्याचे श्रवणमात्रें तरती पातकी जन ॥

## ५७. ॥ लावणी तापी महात्म्य ॥

स्कंदा प्रति परमेश्वर वदला तापि नदी महिमा भारी ॥ तेचि अतां इतिहास तुह्माला विनविन मीं परिसा कुमरी ॥ ध्रु ॥ तापि नदीचे तटीं वानरक मणुनि येक होता भिल्ल ॥ तेथचि पारधि खेळत असतां व्याघ्रानें त्याला वधिलें ॥ कोल्हानें ओढितां पडियलें तापि माजि अस्थि सकळ ॥ त्या सुकृतें तो भिल्ल जाहला सत्यजित राजा प्रबळ ॥ आठउनि निजवृत्त तो करी तीर्थविधी तापी तीरी ॥ १ ॥ तेचि अतां इतिहास ॥ सत्यजितानें तीर्थविधीस्तव ऋषी तेथिचे निमंत्रिले ॥ भक्षनी अह्मि अन्न सुरभिचें दुग्ध पिवूं ऐसें वदले ॥ नृप तप करितां कामधेनु मग लगबग ते येउनि बोले ॥ त्रिमूर्ति विरहित नये भूवरी गुह्य तुलां मी कळविलें ॥ ऐकुनि तपतां भूप पावले ब्रह्म रुद्रहीं भूधारी ॥ २ ॥ तेचि अतां इतिहास ॥ कामधेनुहीं वराह–देहापासुनि तें आविर्भवली ॥ पयोष्णि नामक नदी अपुल्या दुग्धभरें तीनें रचिली ॥ तापि नदी माझारी मिसळतां तीर्थ विधी भूपें केली ॥ सत्यजिताचे पितरां तेणें नित्य तृप्तता तैं जडली ॥ तापि नदी ते पयोष्णि

संगें अत्युत्तम धरणीवरी ॥ ३ ॥ तेचि अतां इतिहास ॥ तप नाहुनि आषाढ शुद्ध त्या पार्णिमेंत तापि स्त्रवली ॥ यास्तव पक्षक पर्व मणोनी त्या दिवसा अभिधा आली ॥ उभय तटीं अष्टोत्तरें शत शिवालयें आहेत भलीं ॥ विस्तारें हें कथा शंकरें स्कंदा प्रति पूर्वी कथिली ॥ सांप्रत हा शरभेंद्र भूपती श्रोतयां-प्रति सांगे सदरीं ॥ ४ ॥ तेचि अतां इतिहास तुह्माला विनविन मी परिसा कुसरी ॥

## ५८. ॥ लावणी तुंगभद्रा अलंपूर माहात्म्य ॥

तुंगाभद्रा दोनि नद्या या हरिहरात्मक मणऊन ॥ श्रीसूतानीं शौनकादिकां विनविलें हें आख्यान ॥ ध्रु ॥ दोनि नद्याहीं मिनल्या तेणें तुंगभद्रा ते झाली ॥ स्नान तर्पण करितां तेथें तरती पूर्वज तत्काळीं ॥ कार्तिक शुद्ध द्वादशीचे दिवशीं करुनीं आंघोळी ॥ पूजितां श्रीकृष्ण देती चौपुरुषार्थै करतळीं ॥ संगमी जे करिती स्नान जीवन्मुक्त ते जन ॥ १ ॥ श्रीसूतानीं शौनका ॥ ब्रह्मानें श्रीशैला दक्षिणतुंगभद्रेचें तीरीं ॥ ब्रह्मेश्वर नामें लिंग स्थापिलाभे अलंपुरीं ॥ तप करोनि तत्प्रसादें सृष्टि केली बहुपरी ॥ आगिक दुर्गा जोगुळांबा वीरभद्रहीं वास करी ॥ मस्तक विरहित भूदेवी ते आहे एक विंदाणें ॥ २ ॥ श्रीसूतानी शौनका ॥ हिमाचलानगरी असतां पूर्वी रेणुकेसह भृगऋषी ॥ बहुत संभविलें परशु-रामादिक सुत त्याशी रेणुकेनें प्रतिदिन गंगास्नान करोनि नेमेंसी ॥ वाळाच्या घागरींत पाणी घेउनि येणें घराशी ॥ सुघुम्नाभिध भूपा पाहुनि व्याकुल झाली मोहानें ॥ ३ ॥ श्रीसूताने शौनका ॥ रेणुका मग उशिर करोनी येतां चमकत घराला ॥ ताताज्ञेनें परशुरामें कंठ तियेचा छेदिला ॥ शूद्र स्त्रीच्या धडाशीं नो माथा रामें मिळवीला ॥ बोले भृगु तें यल्लमा हे पूज्य होइल सकळांला ॥ रेणुकेचें धडाहिं आलंपुरी राहे देवपणें ॥ ४ ॥ श्रीसूतानीं शौनका ॥ इच्या लज्जा स्थानीं लोणी ठेउनी जिभिनें भक्षीती ॥

काकवंध्या असल्यांहीं त्या नारी गर्भीणी होती ॥ ऐसें वरहिं दिधला भृगुनें तेंव्हां रेणुकेप्रति ॥ जाणा तूझी आलंपूरीं ते भूदेवी निश्चिती ॥ मणउनि सांगे शरभभूपती नेमें यात्रा करून ॥ ५ ॥ श्रीसूतानीं शौनकादिकां विनवीलें हें आख्यान ॥

## ५९. ॥ लावणी वेंकटाचल माहात्म्य ॥

पृथ्वीवरी सकळ क्षेत्रामाजि पवित्र ॥ कलियुगीं वेंकटाचल नामक क्षेत्र ॥ ध्रु ॥ सुवर्ण मुखरी उत्तर तीरीं आहे डोंगर ॥ तों वैकुंठा समान ज्यावरि तीर्थे अपार ॥ चतुर्युगीं ज्या मणती वृषगिरि अंजनाद्रिवर ॥ शेषाचल अणि वेंकटाद्रि मणती सुरनर ॥ छंद ॥ कृतयुगीं वृषासुर ॥ मातला त्या गिरिवर ॥ निवटिला शीघ्र मावरें ॥ यास्तव वृषगिरि मणती कृतयुगीं ऐका विस्तार ॥ १ ॥ कलियुगीं ॥ पुत्रासाटी तें अंजना करुनी तप जेथें ॥ वायुपासुनि लाभली तैं हनुमंतातें ॥ त्रेतीं यास्तव अंजनाद्रि मणती तयातें ॥ द्वापरीं हो वायू शेष तालिनि बळातें ॥ छंद ॥ शेषैं मेरुकुमरा ॥ वोढितां सदृढ कमरा ॥ त्यासहित त्या नगवरा ॥ झुगारिलें श्रीवायूनें तो शेष महीधर ॥ २ ॥ कलियुगीं ॥ कलियुगी श्रीकांचीनगरीं माधव मण्णार ॥ ब्राह्मण होता नीच स्त्रीशीं जड कामातुर ॥ अंत पावतां ते मग होउनि विरक्त तो फार ॥ याशैला तें पावुनि झाला बहुत पवित्र ॥ छंद ॥ व्ये मणिजे पापराशी ॥ कट जाळणार त्याशी ॥ मणुनि त्या डोंगराशी ॥ कलियुगीं श्रीवेंकटाचळ मणती सुरनर ॥ ३ ॥ कलियुगीं ॥ आहे स्वामि पुष्करिणि जे गंगे समान ॥ जीचे पश्चिम तीरीं राहे वराह आपण ॥ त्याचे दक्षिणभागीं आहे विष्णु निदान ॥ तेथें त्याचा साक्षात्कार घडेल मणून ॥ छंद ॥ सांगतां पद्मजानें ॥ मनि अगस्त्य हरिखून ॥ सुवर्ण मुखरि स्नानें ॥ करोनि डोंगर चढला पाहुनि नृहारि गुहाद्वार ॥ ४ ॥ कलियुगीं ॥ मग तो स्वामि पुष्करीणी पाप विनाशिनी ॥ अगस्त्यऋषी

या तीर्थांत स्नान करोनी ॥ जेथें स्नान करितां येतें कौमार फिरुनि ॥ कुमार जेथं सुटला तारक हत्ये पासुनी ॥ छंद ॥ त्या कुमार धारिकेंत ॥ करोनि स्नान त्वरित ॥ पावतां स्वामि-तीर्थ ॥ आविर्भवला शंखचक्रधारी श्रीधर ॥ ५ ॥ कलियुगीं ॥ चोळदेशिचा राजा देववल्लभ मणर ॥ पुत्रासाटी राहे तेथें वसउनि शाहार ॥ त्याचि कन्या अनसूयेनें वरिला श्रीवर ॥ ऐसें असतां सपुत्रदार आला द्विजवर ॥ छंद ॥ करोनि देव दर्शन ॥ राजयाशि विनवि वचन ॥ स्त्री पुत्र घेइं वोपून ॥ यात्रा करुनी येतों मणउनि गेला निर्धारें ॥ ६ ॥ कलियुगीं ॥ काहीं उदरा देउनि राजा असतां निश्चित ॥ अन्नाभावें मग ते दोघे गेले लयातें ॥ येउनि मग तो द्विज मागे निज भार्या पुत्रातें ॥ चिंतेनें तैं राजा प्रार्थी लक्ष्मीकांतानें ॥ छंद ॥ श्रीवरें वांचवीले ॥ विप्रासि भेटवीले ॥ राजस पुत्र दिधले ॥ त्या श्रीलक्ष्मीपतिरीं वंदी राजाशरभेंद्र ॥ ७ ॥ कलियुगीं वेंकटाचळ नामक क्षेत्र ॥

## ६०. ॥ लावणी काळहस्तीश्वराची ॥

क्षेत्र जगिं आहे पावन ॥ वास करी श्रीकाळहस्तीश्वर जेथें रिझुन ॥ ध्रु ॥ सेतूहुनि वीस योजन ॥ उत्तरभागीं द्विशत-योजनें तें काशीहुन ॥ दक्षिणदिशेस जाण ॥ सुवर्णमुखरी वाहे उत्तरवाहिनि होऊन ॥ छंद ॥ त्या नदिचे पूर्व तीरीं ॥ आहे लिंगाकार गिरी ॥ तोचि प्रत्यक्ष शूलधारी ॥ उमा रमण ॥ १ ॥ वास करी ॥ माघ व वैशाख मासीं ॥ प्रदक्षिणा जे करिती मुक्ती लाभे तयांसी ॥ कलियुगीं गोंखगैंशी ॥ तारी तेथें काळहस्तीश्वर तो भक्तांशी ॥ छंद ॥ त्यासि कोळीसर्प हती ॥ पावले पूजुनि मुक्ती ॥ मणउनि श्रीकाळहस्ती ॥ मणवि सगुण ॥ २ ॥ वास करी ॥ कोणीयेक कण्ण मणणार ॥ तेथें होता ईश्वरभक्त येक बेडर ॥ खेळुनि नित्य शिकार ॥ धनुर्बाणासहीत येउनि लिंगा समोर ॥ छंद ॥

श्रीकाळहस्तीशा पूजून ॥ करुनी मांस निवेदन ॥ जात होता तो अनुदिन ॥ नियमानें ॥ ३ ॥ वास करी ॥ कोणीयेक दिवशीं शंभूनें ॥ भक्ति पहाया खचितेसें केलें विमान ॥ ऋषीनी केलें पलायन ॥ तें लिंगावरि व्याधे केलें शरीर वित्तानें ॥ छंद ॥ तें देवीं स्वर्गाहुनी ॥ पुष्पवृष्टी केली रिझुनी ॥ झाला बेडर धन्य भुवनि ॥ शिवार्चनें ॥ ४ ॥ वास करी ॥ सरोग पाहुनि शिव नयन ॥ अपला डोळा उपडुनि त्याला दिधला व्याधानें ॥ दुज्या शिवनयनीं चरण ॥ ठेउनि दुसरा डोळा व्याधें देतां भक्तीनें ॥ छंद ॥ धरुनि त्याचा हस्त शिवानें ॥ त्याला दिधलें मुक्तिस्थान ॥ त्याचें मशास्त्र केलें दर्शन ॥ शरभजीनें ॥ ५ ॥ वास करी श्रीकाळहस्तीश्वर जेथें रिझुन ॥

## ६१. ॥ लावणी शिवकांचीचे ॥

शिवकांचीचा महिमा परिसा चित्त देऊन ॥ जेथें वसतां मुक्ति लाभे शिवतत्वज्ञानें ॥ ध्रु ॥ वसिष्टादि ऋषी नैमिष वनी वसतां मिळून ॥ वसिष्ट मणे मुक्ति लाभे तर्षे कडून ॥ कोणी धर्मे कोणी मत्यें कोणी दानानें ॥ कोणी यज्ञें कोणी मणती पुत्राकडून ॥ छंद ॥ तें सूतपुराणिक आला शुद्ध मति ॥ तो वसिष्टादिकीं पुशिला याचि अर्थी ॥ ह्मगे इतिहास सांगन तुह्माप्रती ॥ पूर्वी कथिलें सनत्कुमारा प्रति ब्रह्मयानें ॥ १ ॥ जेथें वसतां मुक्ति ॥ कामकोटी तपास साक्षिभूत सुक्षेत्र ॥ कांची मणउनि आहे जेथिल ऐका विचित्र ॥ गौरीनें झांकितां विनोदें ईश्वरनेत्र ॥ येकायेकीं व्यापलें तम जगीं सर्वत्र ॥ छंद ॥ तें फालनेत्र शिवानें उघडीलें ॥ पहा पार्वतीचे आंगीं तम ते शिरलें ॥ मग पार्वतीचे रुपकाळें झालें ॥ शिवोद्देशें आरंभीलें तें तप गौरीन ॥ २ ॥ जेथें वसतां मुक्ति ॥ येतां गंगादिक नद्या ईश्वराज्ञेनें ॥ थाकें उमा आम्रवृक्षा खाले येऊन ॥ तेथें करितां शंकराशी गाढालिंगनें ॥ प्रसन्न झाला ईश्वर तिजला त्या आनंदानें ॥ छंद ॥ त्या क्षेत्रवासें घडे तत्वज्ञान ॥ मग तेंचि जाणा मुक्तीला साधन ॥ येरीती ऐकुनि पुराणवचन ॥

श्रीशरभेंद्र तेथें केला वास त्रिदिन ॥ ३ ॥ जेथें वसतां मुक्ति लाभे शिव तत्वज्ञानें ॥

## ६२. ॥ लावणी कांची माहात्म्य ॥

श्रीकांचीपुरीचा आगम सांगेन ॥ जो श्रोतयांशी श्रवणें करी पावन ॥ ध्रु ॥ कृतयुगीं ब्रह्मा विष्णु दर्शनार्थ ॥ करि गंगातीरीं अत्युग्र तपातें ॥ अशरीरवाणी त्याशी झाली व्यक्त ॥ नसे चित्त-शुद्धि तुजला बा सांप्रत ॥ छं ॥ तें घडे सहस्राश्वमेधें येथें ॥ अणि आहे क्षेत्र नामें सत्यव्रत ॥ ज्या ठायीं केलें येकेक सुकृत ॥ तें होतें वेगें सहस्रगुणित ॥ क्षेत्र गुण ॥ १ ॥ जो श्रोतयांशो ॥ अणि आहे तेथें हस्ति नामक गिरि ॥ त्या उत्तरभागीं वारुळा माझारी ॥ श्रीशेषा पूजूनि अश्वमेध भारी ॥ तां केल्यां येकाचि भेटे चक्रधारी ॥ छं ॥ यापरीची ऐकुनि अशरीरवाणी ॥ त्या क्षेत्रा ब्रह्मा लगबगा येवोनी ॥ हरि पूजेसाटी विश्वकर्म्याकडुनी ॥ जे करविली ते नगरी कांची मणुनी ॥ मणती जन ॥ २ ॥ जो श्रोतयांशी ॥ जगिं वरिष्ट मी मी श्रेष्ट मणोनी ॥ अल्या ब्रह्मापाशीं झगडत लक्ष्मी वाणी ॥ मग तेणें लक्ष्मी श्रेष्ट मणतां भुवनीं ॥ झणि गेली तेंव्हां वाणी रागाभरूनी ॥ छं ॥ यासाटी तुष्टी पुष्टीहीं सावित्री । मग तीच्या अंशें निर्मुनि ऐशा नारी ॥ पहा त्यांशीं करितां अश्वमेध कुसरी ॥ नदिरूपें वाणी यज्ञ विघ्न करी ॥ ते रागानें ॥ ३ ॥ जो श्रोतयांशी मग ब्रह्मानें कीं करितां भगवत्ध्यान ॥ हरि झाला श्रीभू समवेत प्रसन्न ॥ मग वाणी त्या श्रीभगवंता पाहून ॥ झणि गेली कंपासूप्रा नामें-कडुन ॥ छं ॥ त्या माजि क्षीरनदी वेगवती ॥ या दोनी नद्या सिंधुमाजि रिघती ॥ मग प्रगटली जेथें सरस्वती ॥ त्या तीर्था-लागिं कुंडतीर्थ मणती ॥ ऋषीजन ॥ ४ ॥ जो श्रोतयांशी ॥ मग सरस्वतीशी मिळोनी ब्रह्मानें ॥ ऋतु अश्वमेध करितां अग्नीतून ॥ लख-लखीत तेंव्हां निघालें विमान ॥ त्या माजि शोभे श्रीभूदेवीरमण ॥ छं ॥ मग ब्रह्मादिकीं स्तवितां तो हरिखून ॥ म्हणे ब्रह्माला मीं या क्षेत्रीं राहीन ॥

कारि पूजा माझी कृतयुग संपूर्ण ॥ मग त्रेतीं पूजी गजेंद्र येऊन ॥ सत्य जाण ॥ ५ ॥ जो श्रोतयांशी ॥ सुरगुरु तो मजला पूजील द्वापारीं ॥ कलियुगीं शेष माझी पूजा करी ॥ ज्या क्षेत्रीं ब्रह्मालागी चक्रधारी ॥ या रीती झाला प्रत्यक्ष मुरारी ॥ छं ॥ सुसरीच्या व्याजें गजेंद्रा पावला ॥ सुरगुरु जेणें निजपदीं स्थापिला ॥ अणि शेषादिकां प्रत्यक्ष जो झाला ॥ तो प्रसन्न होवो शरभेंद्र भूपाला ॥ अनुदिन ॥ ६ ॥ जो श्रोतयांशी श्रवणें करी पावन ॥

## ६३. ॥ लावणी वैद्येश्वराची ॥

बहुत विनविलि शिवस्थळें आणि तीर्थें अपार ॥ श्रीवैद्येश्वर महिमा आतां परिसा सादर । ध्रु ॥ जेथें राहुनि भावें करितां वैद्येश्वर भजन ॥ पिशाच बाधा नाना व्याधि जाती तत्क्षण ॥ आणिकाहि शर्खी निरवधि चित्सुख लाभति अनुदिन ॥ स्थळ तें कावेरीस उत्तर अर्ध योजन ॥ छंद ॥ श्रीवैद्येश कारि निवास ॥ मणुनि विशेष ॥ जाणा ते क्षेत्र ॥ १ ॥ श्रीवैद्येश्वर ॥ जटायु संपाति हे पक्षि उडतां गगनी ॥ जटायु पडिला सूर्यतेजें पंख जळोनि ॥ हळुहळु सिद्धामृत तीर्थांत स्नान करोनि ॥ श्रीवैद्येश्वर दर्शन घेतां फुटले पर दोनी ॥ छंद ॥ भावमनी ॥ दृढ धरुनी ॥ शिवभजनी ॥ झाला तत्पर ॥ २ ॥ श्रीवैद्येश्वर ॥ ऐसें असतां कोणियेक दिवशीं घेउनि सीतला ॥ रावण जातां जटायु त्याशि झगडूं लागला ॥ मग त्या युद्धिं वृत्धपणानें जटायु पडिला ॥ श्रीरामानें संस्कारितां मुक्ती लाभला ॥ छंद ॥ अझुणि तदर्थ ॥ जटायु तीर्थ ॥ मणाति समस्त ॥ तेथें सुरनर ॥ ३ ॥ श्रीवैद्येश्वर ॥ चोळ देशिचा ब्राह्मण सुंदरेश्वर मणणार ॥ कुष्टरोगें पीडित होउनि फिरतां भूवर ॥ शिद्धामृतिं स्नान करोनि जोडुनि दो कर ॥ श्रीवैद्येश्वर दर्शन घेतां झाला सुंदर ॥ छंद ॥ कथा जुनि ॥ ते परिसुनी ॥ शरभ धणी ॥ शेंवी सकळत्र ॥ ४ ॥ वैद्येश्वर महिमा आत्तां परिसा सादर ॥

## ६४. ॥ लावणी सलामाची ॥

त्रिस्थळि यात्राहिं करुन ॥ शरभनृप आला परतून ॥ ध्रु ॥ चितंबर क्षेत्रा येऊन ॥ शिवाजि राजा गुण सदन ॥ करितां प्रथम नमन ॥ दीधला आशीर्वाद पूर्ण ॥ छंद ॥ जांवायिं तमाम ॥ करितां प्रणाम ॥ करुनि सलाम ॥ साशिर वचनें ॥ १ ॥ शरभनृप ॥ अणिक जे करिती खुरनीशी ॥ जिवलग त्या सोइऱ्यासि ॥ नृपानें आशीर्वादाशी ॥ मुजरा केला तयांशी ॥ छंद ॥ आणिक दूरून ॥ करिति जे नमन ॥ अशीर्वचन ॥ त्यांसहिं करून ॥ २ ॥ शरभनृप ॥ शंकराचार्य गुरूला ॥ अणिक निज सद्गुरु पत्नीला ॥ तेविं रामनाथाला ॥ करुनि गंगाभिषेक यांला ॥ छंद ॥ शरभ धरणीश ॥ वंदुनी त्यांस ॥ अनुग्रहास ॥ पात्र होऊन ॥ ३ ॥ शरभनृप ॥ पंचनद क्षेत्रा पाऊनि ॥ गंगाभिषेकातें करुनि ॥ वंदितां औसाहेब चरणी ॥ आशीर्वाद दीधला त्यानि ॥ छंद ॥ आणिक आशेष ॥ विप्रवर्गास ॥ चन्द्रमौळीस ॥ करीत नमन ॥ ४ ॥ शरभनृप आला परतून ॥

# शरभेंद्र तीर्थावळी

★

श्री शिवकृत

॥ श्री ॥

# ॥ श्री महाराज शरभेन्द्र तीर्थावळी ॥

## ॥ अध्याय ॥ १ ॥

॥ श्री गणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री गुरुभ्यो नमः ॥

वंदु श्री गणराज विघ्नहर जो सिंदूर पंकाचिया ॥
बिंदूनें विलसे कपोलयुगळीं इंदू ललाटीं जया ॥
बंधु क्रौंच विदारणासि करुणासिंधू शिवाप्रेमभू ॥
बंधूकारुण हस्तपल्लव विभू संभूत विघ्नप्रभू ॥ १ ॥

करी कमलपुस्तका धरि सुवल्लकीहीं शुका ॥
सुधांशु किरणांशुका स्थिर चरासि जे व्यापका ॥
अधिष्ठित सुहंसिका सकल शास्त्र संदेशिका ॥
अशोकवनदायका मज सरोज भूतायिका ॥ २ ॥

अज्ञान गाढतिमिरा रवि जो प्रकाशी ॥
ज्ञानोदयें सुजन हृत्कमला विकाशी ॥
सच्चक्र हर्ष करि त्या नति हे गुरूशी ॥
त्या नंतर कवि पराशरजादिकाशी ॥ ३ ॥

ओव्या :—

चोळ देशा अभ्यंतरीं ॥ पावन असे महा कावेरी ॥
जीचें वारी पाप निवारी ॥ त्या दक्षिणे तीरी पुरी तंजाख्या ॥ १ ॥

तंजेश्वर वसे उत्तर द्वारीं ॥ बृहदीश्वर दक्षिणे माझारी ॥
पूज्यमान विबुध वरो वरी ॥ जैसीं पुरी अमरावती ॥ २ ॥

यंत्रायुधें दिसती दृढप्राकारीं ॥ परिधा जीची वलयानुकारी ॥
मच्छ कच्छप अनंत सुसरी ॥ समुद्रापरी अगाधहीं ॥ ३ ॥

प्रासाद दिसतीं जेथें उन्नत ॥ श्वेत जैसे हिमवंत पर्वत ॥
नरनारीगणें शोभिवंत ॥ भाग्यवंत वर्तकहीं ॥ ४ ॥

नगरी विचित्र अलक नामक ॥ जेथें असती त्रिवक अनेक ॥
कुबेर नदिसे कोणीहीं येक ॥ धनद लोक सुंदर असति ॥ ५ ॥

जेथें शोभे सुंदर हजारी ॥ मस्तहत्ती झुलती जीच्या द्वारीं ॥
तुरंगहीं अश्वशालांतरीं ॥ परोपरी रथपदाती ॥ ६ ॥

राजश्रेष्ठ तया नगरींत ॥ वसे सर्व लोकासहीं रक्षित ॥
महावदान्य बुद्धिवंत ॥ शौर्यवंत क्षमाशीलहीं ॥ ७ ॥

पृथ्वीपती जो अनुपम ॥ सिंव्हापरी जयाचा विक्रम ॥
ह्मणूनी प्रतापसिंव्ह नाम ॥ जैसा राम दाशरथी ॥ ८ ।

भोंसलवंश क्षीरसागर ॥ तयापासुनी जो राजवर ॥
उत्पन्न जाहला कलाधर ॥ आल्हादकर कुवलयासी ॥ ९ ॥

त्याचा पुत्रहीं तयासमान ॥ तुळजेंद्र भूपती अभिधान ॥
जैसा शिवाशीं क्रौंच विदारण ॥ करी हर्षण सर्वलोकांशी ॥ १० ॥

तयाचा तनय जो सांप्रत ॥ शरभेंद्र नामा विख्यात ॥
इंद्राचा पुत्र जसा जयंत ॥ विबुधा पाळित भूपनाथ ॥ ११ ॥

नृपोत्तम जो कमलनेत्र ॥ विभूति भूषणें सुंदर गात्र ॥
शील ज्याचें महा पवित्र ॥ भक्ति विचित्र शिवपदीं ॥ १२ ॥

ज्यानें केलें कोटि बिल्वार्चन ॥ द्विजांची करविली कन्यादानें ॥
सत्पात्रीं वित्ताचें विवरण ॥ असंख्य महिमान जयाचें ॥ १३ ॥

त्या पुण्यश्लोक शरभ भूपाचे ॥ परम पावन गुणाचे साचे ॥
आनंदकर श्रोतिया जनाचे ॥ यास्तव त्याचे प्रभाव सांगतों ॥ १४ ॥

कलियुगीं शालीवाहनास ॥ शकवर्षं सत्राशें बेवीस ॥
जाहली असतां सिंव्हराशीस ॥ प्राप्त आंगिरस चांद्रमानानें ॥ १५ ॥

दुर्मती नाम संवत्सरीं ॥ मार्गशीर्ष महिन्या अंतरीं ॥
कृष्ण द्वितीया दिनीं पहिल्या पारीं ॥ भौमवासरीं धनुर्लग्नी ॥ १६ ॥

मूला तृतीय चरणीं दिनेंद्र ॥ पुनर्वसु चौथ्यापदीं चंद्र ॥
असतां शुभ योगहीं ऐंद्र ॥ सन्नद्ध नृपेंद्र तीर्थयात्रेसी ॥ १७ ॥

त्या दिनीं उदय पावतां अरुण ॥ केलें शिवगंगाजल स्नान ॥
जप तप पूजा अनुष्ठान ॥ छायादान नित्य गोदानहीं ॥ १८ ॥

भक्तीयुक्तें महा नेमानें ॥ विप्रांसी देउनीं यात्रादानें ॥
घेउनी त्यांचे आशीर्वाद वचन ॥ नम्रपणें कृतांजली ॥ १९ ॥

चंद्रमौळीश्वरासी वंदुनीं ॥ प्रदक्षिणाकार बाहेर येऊनी ॥
चतुरंग सैन्याचा धणी ॥ जैसा सेनानी विराजे ॥ २० ॥

छायादान महालापाशीं ॥ येतांचि सिद्धसंकल्प राजऋषि ॥
गडबड जाहली सर्व लोकांशी ॥ मुजरा खुर्निशी करावया ॥ २१ ॥

शीवभक्तासी सावली केल्यानें ॥ पुण्य पुरुषार्थ वडे मणून ॥
तेव्हां आले बहु जलद घन ॥ छाया मात्र करुन स्थिरावले ॥ २२ ॥

वर्षाव करणारहीं घन ॥ नृपाची शिवभक्ति पाहुन ॥
करुनये शिवदर्शना विघ्न ॥ ह्मणूनी परतोन गेले व्योमीं ॥ २३ ॥

शंभुप्रसाद घोडियावरि ॥ बसूनि विलसे राजकेसरी ॥
जैसा उच्चैश्रवामाझारीं ॥ वज्रधारी देवेंद्र ॥ २४ ॥

शिफेद दुस्त आंगी राजस ॥ रुद्राक्षमाळा कंठी नीळ भास ॥
शुभ्र विभूती भाळी सरस ॥ शंकर लोकांस हाचि निश्चय ॥ २५ ॥

प्रणत जनांच्या हरी आर्ती ॥ पातेगेलयांच्या करी इष्टपूर्ति ॥
शरभेंद्र रूपानें पुण्यकीर्त्ती ॥श्रीसांबमूर्ती अवतरला ॥ २६ ॥

हुजूरबंकी येतां भूमिपाळ ॥ मंगळ घोषें संगीत मेळ ॥
चंद्र सूर्यादी वाद्यें सकळ ॥ माघें केवळ बिरुदावळि ॥ २७ ॥

दो भागीं मोरकुंच सुंदर ॥ उडती धवळ उभय चामर ॥
जैसे गगनी मनोहर ॥ अति पांडुर राजहंस ॥ २८ ॥

पूर्णचंद्र बिंबासरिस ॥ श्वेतछत्र जयाचें विलसे ॥
दंड तयाचा प्रवाळ भास ॥ संध्यारागास अनुसरे ॥ २९ ॥

उभी खड्गें धरुनी मावळे ॥ तगटी निशानें वर्ची भाले ॥
पुढे राचेवार निघाले ॥ भाट बोलिले राजकीर्ती ॥ ३० ॥

भूपती ऐशा सन्नाहानें ॥ येतां दौलतबंकाचे ठिकाणें ॥
उठिला नौबताचा स्वन ॥ जैसें गर्जन शरन्मेघाचें ॥ ३१ ॥

मग येतां हजारीच्या बंका ॥ ढुमढुम वाजे राजडंका ॥
जो शब्द ऐकतां अरिनायका ॥ मनी धोका वागविती ॥ ३२ ॥

अघाडी निशानाचा हत्ती ॥ कोत्तवाल तेजी तुरकी धावती ॥
आश्रितांच्या वहिल्या असंख्यती ॥ ऐशी रीती प्रति मदली ॥ ३३ ॥

तीर्थयात्रेसी चालिला राजवर ॥ बलाउनी आश्रित थोर थोर ॥
जैसा काम्यकवनीं युधिष्टिर ॥ ऋपीश्वर संगें घेऊनी ॥ ३४ ॥

चतुरंग शेना वाहिनी ॥ विराजे नृपासी अनुसरुनी ॥
भगीरथा जैशी अनुगामिनी ॥ दिव्य तटिनी भागीरथी ॥ ३५ ॥

वेल्लेपिल्लारी मणउन ॥ फत्ते दर्वाज्यांत गजानन ॥
तयासी करुनी नमन ॥ केलें गमन किल्याबाहेरी ॥ ३६ ॥

मार्ग धरितां पुढे नीट ।। अवलोकिलें अयंपेठ ।।
जेथें दिसतीं कुतन्या चीटें ।। मोल अचाट तयासी ।। ३७ ।।

आणिखीहीं वोलांडुनी बहु ग्राम ।। पापनाशीस पातला गुणधाम ।।
मग केले कावेरीस्नान नित्य नेम ।। भक्ति नियमें घृत श्रात्ध ।। ३८ ।।

त्या क्षेत्री देवत्रिविक्रम ।। श्रीनिवास ज्याचें नाम ।।
कंजवल्लीदेवि परम ।। मनोरम तीर्थ पुंडरीक ।। ३९ ।।

दुसरें तीर्थ नदी कावेरी ।। स्नानकर्त्यांचें पाप निवारि ।।
दर्भ कुसुमें जीच्या तीरी ।। चामरापरी विराजती ।। ४० ।।

तेथें दान धर्म करुनि ।। त्रिपालतोरी घेतलें शिव दर्शन ।।
पर्तुनी येउनी विष्णु विलोकन ।। केलें भोजन मध्यान्हकाळीं ।। ४१ ।।

त्रिपाल तोरे गांव थोर ।। जेथें शिव क्षीरवनेश्वर ।।
देवी धवळांबा सुंदर ।। तीर्थवर ऋक्षारव्यक ४२ ।।

त्या तीर्थाचें माहात्म्य यथाश्रुत ।। सांगतों यथामती किंचित ।।
जे ऐकिल्यानें नरांचें चित्त ।। पाप करण्यांत न प्रवर्त्तेल ।। ४३ ।।

राजा एक होता पांडय ह्मणुन ।। शिखारीस जातां तयानें ।।
हत्ती घोडेस्वार घेऊन ।। श्रीमदानें येथील मार्गी ।। ४४ ।।

एक तपस्वी दीक्षा धरुनि ।। नखें दाढी मीशा वाढऊनी ।।
तप करीत होता येथें येवूनी ।। व्याघ्रासनी बसुनियां ।। ४५ ।।

त्याचें पाहोनी हे विलक्षण ॥ पांडय भूपाळें सुलक्षणें ॥
रोमाढ्य मुनीचे केलें दूषण ॥ अस्वल हो ह्मणून त्यानें शापिलें ॥ ४६ ॥

स्वपतीचा शाप ऐकुनी ॥ सत्वर आली त्याची कामिनी ॥
दयाळू मुनीतें प्रार्थुनी ॥ उश्शाप घेउनी परतली ॥ ४७ ॥

त्या मुनीनें सांगीतल्याप्रकारें ॥ या तीर्थाचे स्नान करुनी बरें ॥
शापमुक्त केला नरवर ॥ ऐसें थोर ऋक्षतीर्थ ॥ ४८ ॥

तेथें देवोनी पट्टवस्त्रें हेम ॥ पापनाशींत केलें मोकाम ॥
रुद्रापरी निर्जित काम ॥ पुर्णकाम अह्मनिहीं भूप ॥ ४९ ॥

हे तीर्थ यात्रा पावन ॥ जे करिती ईचें कीर्तन ॥
तयाहीं ते पुण्य घडे ह्मणुन ॥ करी कथन श्रीशिव ॥ ५० ॥

॥ इति श्रीशरभेंद्र तीर्थयात्रायां प्रथमोध्याय: ॥

॥ श्रीशिवकर्त्ता ॥

## ॥ अध्याय ॥ २ ॥

### ॥ श्री शिवकर्त्ता ॥

पापनाशीहूनी केली स्वारी ॥ भूपें शेविला शिवनल्लूरीं ॥
कल्याणसुंदर देवाख्या साजिरी ॥ गिरिजासुंदरी देवीचें नावें ॥

तीर्थ एक जटायु अभिधान ॥ तेथें ज्यानी केलें स्नान ॥
त्याचें गात्र होये पावन ॥ ऐसें महिमान तयाचें ॥ २ ॥

तया देवे वासिराजनायकें ॥ नक्षत्रापरीं जेथें माणिकें ॥
अनेक हिरेदीप्त पदक ॥ दिलें लखलख कांतीनें ॥ ३ ॥

चंद्रपेरमाळगुडी ग्रामी ॥ देव चंद्रशेखर स्वामी ॥
देवीहीं कोमलवल्ली नामी ॥ तेथें भूमिनाथ पातला ॥ ४ ॥

मग येउनी महाराजानें ॥ देवा देवीचें करुनी सेवन ॥
पुढें करिजेलें प्रयाणें ॥ जेथें गहन वृक्षपंक्ती ॥ ५ ॥

त्रिवंजुळींत येक दंत ॥ कपर्दीश्वर त्याचा तात ॥
देवी ब्रह्मनायिका विख्यात ॥ देउळीं दैवतें हें वसती ॥ ६ ॥

त्याचे दर्शन घेउनी त्वरें ॥ पुढें धरितां मईदान नृवरें ॥
श्रीकुंभेश्वराचें गोपुर ॥ दृष्टि गोचर जाहलें ॥ ७ ॥

ठाईं ठाईं बहु धान्य क्षेत्रें ॥ कुंटी कालवे सांकू विचित्र ॥
मंटप चावडया प्रपा सचित्र ॥ तुळजेंद्रपुत्र अवलोकी ॥ ८ ॥

ऐशा मार्गीं जातां राजवरें ॥ देखिलें जुनें धारासुर ॥
देव जेथें ऐरावतेश्वर ॥ देवी चतुरदेवनाक्षी ॥ ९ ॥

त्या सांबाच्या करुनि सेवना ॥ यमतीर्थाच्या ऐकुनी महिमाना ॥
बिदीच्या पाहुनी दीर्घपणा ॥ मग कुंभकोणा चालिला ॥ १० ॥

तेथें असे राज सदन ॥ ज्याच्या सजा विराजमान ॥
मंदाकिनीनें जैसें ऐंद्र विमान ॥ हेमपुष्करणीनें तैसेंचि ॥ ११ ॥

त्या वाड्यांत नित्यानुष्टान ॥ केलें सोमेश्वराचे दर्शन ॥
जेथें घंडामृत लवंडिले ह्मणून ॥ लिंग उत्पन्न तन्मय स्वयंभू ॥ १२ ॥

ज्याची पूजा बृहस्पतीनें ॥ जलाक्षता गंध बिल्वानें ॥
धूप दीप अन्न निवेदनें ॥ उक्त विधीनें केलीं स्तोत्रादिकें ॥ १३ ॥

पुरातनी त्या देवमंदिरीं ॥ देवी असे सोमसुंदरी ॥
सेवकजनाचें पापहारी ॥ नाति दूरी सोमतीर्थहीं ॥ १४ ॥

त्याचें सेवन करुनी राजानें ॥ रामस्वामीच्या देवळा येउन ॥
वंदिले राम सीता लक्ष्मण ॥ जेथें हनुमान उभा शिष्यापरी ॥ १५ ॥

जो रामहीं मंद ऋपीसी प्रत्यक्ष ॥ हनुमंतानें वीणा घेउनी त्या समक्ष ॥
गायन केलें मधुर जैसा द्राक्ष ॥ नव्हती परोक्ष नारद तुंबुरहीं ॥ १६ ॥

लाजहीं असूया आली दोघांला ॥ ह्मणूनी परीक्षा दाखवूं याला ॥
ऐश्या भावें आंजनेय भला ॥ गिरि विदारिला गुंडक्रिया रागें ॥ १७ ॥

गुंड ह्मणजे थोर पाषाण ॥ त्याचि क्रिया त्याचे भेदन ॥
ते होयिजे ज्या रागानें ॥ त्यासि ह्मणनें गुंडक्रिया ॥ १८ ॥

आपली वीणा घातली तयांत ॥ काहडा मणाला नारद तुंबरातें ॥
यत्न नसे दोघांचा तेथें ॥ पुन्हा हनुमंत गायिजेलें ॥ १९ ॥

नष्टद्रव्य लाभे ज्या रागानें ॥ तयानें केलें रम्य गायनें ॥
वीणा निघाला तयापासून ॥ केलें क्षमापण त्यानीहीं ॥ २० ॥

ऐसें तेथील रामस्थान ॥ करुनी तयाचें वंदन ॥
आदि कुंभेश्वराचें दर्शन ॥ भूपनंदन केलें उपरि ॥ २१ ॥

नउखण ज्याचें गोपुर ॥ रात्री देखील दिसे दूर ॥
दीपप्रकाशें चिन्ह सुंदर ॥ वृषभ थोरी प्राकारी जयाचे ॥ २२ ॥

मंगळनायिकाहिं वदूनी ॥ वस्त्रें बहु होनी पदकें देउनी ॥
उभयतांचा प्रसाद घेउनी ॥ चंडीश ठिकाणी पातला ॥ २३ ॥

भूप बाहेरी येताना ॥ देवळाचे स्थानीक नाना ॥
घेउनी आले काळांजी सुमना ॥ तयासी सन्माना करविलें ॥ २४ ॥

देवाचें महात्म्य यथोदित ॥ म्या कांहीं कांहीं सांगिजेत ॥
जे ऐकिल्यानें सर्व दुरित ॥ पलायित होय दूर दूर ॥ २५ ॥

पूर्वि प्रळयकाळी दारुणी ॥ ब्रह्मादिकीं योचना करुनी ॥
त्रैलोक्य जळीं बुडे ह्मणोनी ॥ मेरु शिरस्थानीं सकळिक ॥ २६ ॥

अमृतघटी प्रपंच ठेऊन ॥ असतां प्रळयकाळीं घन ॥
येउनी केलें महा वर्षण ॥ तेथेंहीं उंचीनें प्रवाह आला ॥ २७ ॥

त्या प्रवाहीं दैवेंकङ्गनी ॥ अमृतघट आला वाहूनी ॥
त्या कुंमकोणाख्य स्थानी ॥ ताकयावाणी तरंगत ॥ २८ ॥

तेथें प्रवाह फांकला ॥ सुधा कलश स्थिरावला ॥
किरातरुपी ईश्वर आला ॥ शोधावयला त्या घटासी ॥ २९ ॥

मध्यार्जुन सुमारी येऊन ॥ किरातानें सोडिला बाण ॥
त्या घटाचा गळा फुटून ॥ अमृत सांडून गेलें तेव्हां ॥ ३० ॥

तेथें येउनी त्या किरातरुपें ॥ अमृताचें केलें लिंगरुप ॥
स्वयमेव पुजूनी अमूप ॥ आपुलें रुप त्यांत ठेविलें ॥ ३१ ॥

ते स्वयंभूलिंग कुंभेश्वर ॥ ज्याच्या दर्शनमात्र नर ॥
ऐहिका मुष्मिकें लाभतीं बरें ॥ तीर्थ त्या समोर येक असे ॥ ३२ ॥

ज्याचें नाम हेमपुष्करणि ॥ जेथें स्नानादि करितां नरानी ॥
अपार पुण्याची खाणि ॥ निधीवाणी लाभिजे ॥ ३३ ॥

ऐशा त्या पुण्य ठिकाणीं ॥ शरभ भूपें कुंभकोणीं ॥
तीर्थश्रात्ध(द्ध)हीं करुनी ॥ कावेरी तटिनी तीरीहीं ॥ ३४ ॥

मग मांडवांतुनी निघाला ॥ श्रीशंकराचार्य मठासि आला ॥
वंदिलें तयाच्या पदकमळा ॥ त्यानी रुद्राक्षमाला दिली प्रसाद ॥३५॥

ज्ञानांबायुक्त काळहस्तीस्वर वंदिला ॥ चक्रपाणीच्या देउळा आला ॥
देवदेवी सेउनी भला ॥ नृपानें दिला पूजोपहार ॥ ३६ ॥

देवाचें नाम चक्रपाणी ॥ त्याला देवी दोघी जणी ॥
श्रीदेवी भूदेवी ह्मणूनी ॥ या त्रिभूर्ती प्रसिद्ध ॥ ३७ ॥

चक्रतीर्थ नाम सरोवर ॥ तेथें जो स्नान करी नर ॥
त्याचें पातक जाउनी दूर ॥ कांपे थर थर निराधारी ॥ ३८ ॥

त्याचेंहीं माहात्म्य यथोदित ॥ सांगतो मी प्रसंगोचित ॥
ऐकतांचि जे लोकांत ॥ होती पुनीत सर्वनर ॥ ३९ ॥

जलंधर ह्मणूनी दैत्य होता ॥ त्याचि भार्या वृंदा पतिव्रता ॥
रुपानें जणूं रंभाकांता ॥ दैत्यानें स्वता तप आरंभिलें ॥ ४० ॥

ब्रह्मयानें दिली अमरता ॥ शिव मात्र करुनी परता ॥
त्याविना सर्वांहीं देवता ॥ जींकावेंया शक्ता न जाहल्या ॥ ४१ ॥

तेव्हां युद्ध केलें विष्णुनें ॥ त्यालाहीं जिंकिले दैत्यानें ॥
त्यांतें किल्यासी द्वारस्थ करुन ॥ करी रक्षणें ऐसें ह्मणाला ॥ ४२ ॥

जलधरी आणि महादेवीं ॥ नारदानें केली लावा लावी ॥
तेणें दैत्य युद्धासि बलावी ॥ गिरिजा देवी नायकासि ॥ ४३ ॥

तेव्हां युद्ध मांडले परस्परीं ॥ कपटी विष्णु त्या अवसरी ॥
जलंधर दैत्याचें रुपधारी ॥ भोगी परोपरी वृंदेसी ॥ ४४ ॥

ऐसें करितां बहु दिनमान ।। मग स्वरुप दाविलें विष्णुनें ।।
तीनें शापिलें त्या कारणे ।। महा क्रोधानें तये वेळे ।। ४५ ।।

यास्तव वनी हिंडणें ।। रावणें भार्यापहरण ।।
दुःख प्रलापहिं करणें ।। रामे अनुभोगूनें राज्य लाभला ।। ४६ ।।

बृंदेनें तरीं अग्निपतन केलें ।। विष्णुनें तद्वत मीस आचरिलें ।।
तेथें बृंदावन जाहलें ।। जें पूजिलें सर्वलोकीं ।। ४७ ।।

ज्याच्या घरी असें बृंदावन ।। मंडित बृंदारुप तुळसीनें ।।
तेथें वसे लक्ष्मीनारायण ।। यास्तव पूजन करिती लोक ।। ४८ ।।

युद्धांगणीं तरी महादेवानें ।। दैत्य संव्हारात्रयां केला यत्नें ।।
तोहिं व्यर्थ गेला त्याच्या तपानें ।। जैसा कृतघ्न कृतोपकारासी ।। ४९ ।।

तेव्हां ब्रह्मविष्णुरुद्रानी ।। आपुली आपुली कळा काढुनी ।।
त्यांचें चक्रायुध करुनी ।। पाडिला रणी दैत्य तो शिवानें ।। ५० ।।

तेथें विष्णूनें रुप प्रगट केलें ।। चक्रपाणि नाव गाजविलें ।।
त्यास दक्षिणेकडं विमल ।। तीर्थ जाहलें चक्राख्यक ।। ५१ ।।

ऐशा चक्रपाणीसी सेऊनी ।। शार्ङ्गपाणीच्या देउळा येऊनीं ।।
तेथेंहिं देव देवि वंदुनी ।। राज शिरोमणी विराजला ।। ५२ ।।

ज्याचें नाव शार्ङ्गपाणी ।। श्रीदेवी भूदेवी रमणी ।।
अणिखीं कोमलवल्ली अभिधानी ।। जैश्या सौदामिनी मूर्तिमंत ।। ५३ ।।

विष्णुतो असे घननीळांग ।। महालक्ष्मीचे हृदयांतरंग ।।
ज्याचे हाती शोभे रथांग ।। चरणी गांग उदकहीं ।। ५४ ।।

तयाचेंहीं दर्शन घेऊनी ।। अनेक होन्नी पदक देउनी ।।
संतोषविलें पट्ट वस्त्रादीकरूनी ।। बाहेर येउनी प्रसाद घेतला ।। ५५ ।।

त्याचें महात्म्य असे अति ।। म्या पामरि सांगीजेल किती ।।
तथापि वदतों यथामती ।। तुह्मी श्रोती ऐकावें ।। ५६ ।।

पूर्वी हेम नामक ऋपी होता ।। त्यानें तप केलें मोक्षा करितां ।।
बहु दिवस ऐसें असतां ।। प्रत्यक्ष होता जाहला विष्णु ।। ५७ ।।

ऋपीस ह्मणे मोक्ष येथें येइना ।। तुवां जावें कुंभकोणस्थाना ।।
तेथें येईल वैकुंठराणा ।। विवाहकारणा माझा अंशीं ।। ५८ ।।

तप करि तेथें जाउन ।। तुला मोक्ष देईल नारायण ।।
ऐसें ऐकूनी त्याचें वचन ।। तैसेंचि त्यानें करीत असतां ।। ५९ ।।

कोणी येक्या अवसरीं ।। मिळूनि सर्व सुरासुरी ।।
मथन करितां क्षीरसागरीं ।। अमृत उपरि उडालें ।। ६० ।।

पडिलें हेमपुष्करणींत ।। उद्भवलें स्वर्णपद्म तेथें ।।
कन्या येक होती त्यांत ।। घेतिलें तियेतें त्या ऋषीनें ।। ६१ ।।

अधोदरी बोलिलें ते वचन ।। सत्य करांवें मणून विष्णूनें ।।
त्यास्थळीं शार्ङ्गपाणी रुपानें ।। अवतरण केलें भक्तार्थ ।। ६२ ।।

त्या ऋषिपोषित कन्येचें लग्न ।। करुनी घेउनी आपणें ।।
त्यानें केली पूजा अंगिकारुन ।। दिली मुकुंदानें मुक्ती तया ।। ६३ ।।

तेचि जाण कोमलवल्ली ।। लक्ष्मी अंश तेथें अवतरली ।।
तीतें वंदितां विपदा पळाली ।। संपदा आली होईल जी । ६४ ।।

ऐशा देवीशीं सहवर्त्तमान ।। करुनी त्या शार्ङ्गपाणीचें दर्शन ।।
मग नागेश्वरायतन ।। लोकरंजन पाविजेलें ।। ६५ ।।

मग आला नागेश देउळा ।। तेथें देव नागेश्वर भला ।।
बृहन्नायकी समेत तयाला ।। उपहार दिला नरेश्वरानें ।। ६६ ।। .

जेथें शेष श्रमला भूभारें ।। मणूनी गेला ब्रह्मया समोर ।।
सांगीतला स्वभार समाचार ।। येरु उत्तर बोलिलें ऐसें ।। ६७ ।।

तुंवां कुंभकोणासी जावें ।। शिवलिंग भावें पूजावें ।।
तेणें तुष्ट होउनी शिव ।। श्रमभाव परिहरील ।। ६८ ।।

ऐसें ऐकोनी ब्रह्मवचन ।। त्यानें पाविजेलें कुंभकोण ।।
तेथें करुनी शिवार्चन ।। श्रमहरणें सुखें केलें ।। ६९ ।।

तेथेंचि ब्रह्मादि त्रिमूर्तिंन ।। नाट्य करितां सभापतीनें ।।
अवलोकिलें आनंदानें ।। यास्तव स्थान ब्रह्मयाचें असें ।। ७० ।।

तीर्थ एक सिंव्ह नामधारी ।। पाप गजासी ते विदारी ।।
निर्मल असे ज्याचें वारी ।। मानसापरी सज्जनाच्या ।। ७१ ।।

कायारोहणेश्वरहीं उपरी ॥ देवी नामें मदनसुंदरी ॥
त्या सांभाची शेवाहीं बरी ॥ वस्त्रोपहारी केली नृपें ॥ ७२ ॥

त्या नंतर काशी विश्वेश्वर ॥ देवी विशालाक्षी सुंदर ॥
त्या देवाचें दर्शन बरें ॥ केलें नृवरें वितरणहीं ॥ ७३

तीर्थाभिधान आत्महित ॥ मणूनी असे महापूत ॥
तेथें असती जे स्नात ॥ आत्महित तया घडे ॥ ७४ ॥

तयाचें महात्म्य अपार ॥ असतांहीं सविस्तार ॥
मी सांगतों किंचितर ॥ दुरित फार अपहरी ॥ ७५ ॥

नवकन्या तीर्थ वासिनी ॥ त्यानीं बोलिजेला शूलपाणी ॥
पापी अमुच्या तीर्थी येउनी ॥ महा पावनी स्नान करितां ॥ ७६ ॥

त्याचें पाप आह्मा येईल ॥ आमुच्यानें काय करिजेल ॥
हें सांगावें स्वामि दयाळें ॥ ऐसें विचारिलें तयासी ॥ ७७ ॥

तेव्हां बोले परमेश्वर ॥ कुंभकोणीं आहे सरोवर ॥
तेथें तुह्मी जावें येकंदर ॥ येकदात्वरे बारा वर्षास ॥ ७८ ॥

त्या तीरीं करा तुह्मीवास ॥ सर्व पापाचा होईल नास(श) ॥
ऐसें बोलिला कृतिवास ॥ त्याहीं निवास तेथें करिती ॥ ७९ ॥

ऐसें थोर तीर्थ तेथील ॥ शिवासीं पुंडरीकाक्षें पुजिलें ॥
काशी समान ते स्थल ॥ मणूनी आलें दुजें नाव देवा ॥ ८० ॥

शिवकाशीविश्वेश्वरा ।। देवी विशालाक्षी सुंदरा ।।
त्या देवाचें दर्शन बरा ।। केलें नरवरें वित्तदारहीं ।। ८१ ।।

तैसाचि देव अभिमुक्तेश्वर ।। देवी अमृतवल्लि रुचिर ।।
त्याशीहीं सेउनी वस्त्रोपहारें ।। गौतमेश्वर देउळा चालिला ।। ८२ ।।

देव गौतमेश्वर नामा ।। देवीहीं तेथें असे गौतमा ।।
काय सांगू त्याची महिमा ।। सांगूनी सीमा आहे थोर ।। ८३ ।।

ऋषि येक गौतम मणून ।। त्यानें कृषि कष्ट फार जाणून ।।
अन्नाचें पीक करुन ।। करी जीवन शिवप्रसादें ।। ८४ ।।

पूर्वीं अहेल्येच्या निमित्तें ।। शापग्रस्त होता पुरुहूत ।।
त्याचें सूड ध्यावया त्वरित ।। गाय निर्मित केली मायेन ।। ८५ ।।

तिला जा मणे देवनाथ ।। त्या गौतमाचें भक्षांवे शेत ।।
त्यानें टाळीनेंहीं हकिल्या तूतें ।। होईं मारित मिसानें ।। ८६ ।।

गौतम गोहत्या करणार ।। ऐसा गाजेल जरी समाचार ।।
तेव्हां निवल माझा ताप भार ।। ऐसें उत्तर ऐकोनी तीनें ।। ८७ ।।

धेनूतें तैसेंचि केल्यावरि ।। तेणें जावया अभिशाप वैखरी ।।
माहात्म्यें पाहोनीहीं चारीं ।। चिदंबरी पूजिला शिव ।। ८८ ।।

सभापती ह्मणे त्या ऋषीतें ।। तुंवां जावोनी मायोरांत ।।
पुजावा देव मायूरनाथ ।। तेणें त्वरित पाप जायील ।। ८९ ।।

ऐसें ऐकूनी त्याचे वचन ॥ त्यानेंहीं केलें तेणप्रमाण ॥
त्या देवानेंहीं बोलिलें वचन ॥ ऐका पावन श्रोते तुंह्मी ॥ ९० ॥

तुवां कुंभकोणस्थानी ॥ तीर्थही येक खाणूनी ॥
तेथें स्नानातें करूनी ॥ लिंग स्थापुनी शिवाचें ॥ ९१ ॥

पूजिल्यानें परमेश्वर ॥ पाप जाईल दूरतर ॥
तें जैसा तूल निकर ॥ दिगंतर पाविजेकीं ॥ ९२ ॥

ऐशी ऐकोनी देवाची वाणीं ॥ खाणिलें कुंडें त्या ठिकाणी ॥
गौतमाभिधानी ॥ तीर्थतें ॥ ९३ ॥

देवानें सांगीतल्याप्रमाणें ॥ केलें शिवलिंग स्थापन ॥
जाहलें त्याचें अभिशाप मोचन ॥ ऐसा पावन गौतमेश ॥ ९४ ॥

त्या देवादेवीस पाहुनी ॥ उपहार वस्त्रें देउनी ॥
बाणात्तोरेस येउनी ॥ शिव भवानी अवलोकिले ॥ ९५ ॥

बाणपुरेश्वर बाणपुरेश्वरी ॥ नावेंकडूनी असती शिवगौरी ॥
त्यांचीहीं पूजा तैशाप्रकारीं ॥ वस्त्रोपहारी केली नृपानें ॥ ९६ ॥

मग येउनी नूतन धारासुरी ॥ देव धारासुरेश त्रिपुरारी ॥
देवी असे धारासुरेश्वरी ॥ त्यांचीहीं शेवा बरी तैशीच केली ॥ ९७ ॥

ऐशें देवदेवी बहुत ॥ स्व स्व तीर्थीं शोभिवंत ॥
त्या स्थानीं असतीं अगणित ॥ महा दुरित प्रक्षालितीं ॥ ९८ ॥

ऐसें कुंभकोणाचें महिमान ।। जे करिती धन्य श्रवण ।।
पाप जाईल त्यांचें मणून ।। करी कथन श्रीशिव ।। ९९ ।।

।। इति श्रीशरभेंद्र तीर्थयात्रायां द्वितीयोध्यायः ।।

## ॥ अध्याय ॥ ३ ॥

### ॥ श्रीशिवकर्त्ता ॥

कुंभकोणीचे देव पाहिल्यावरी ॥ पंचमी शुक्रवारी चौथ्याप्रहरीं ॥
शरभराज सेनासह परिवारी ॥ आला पट्टेश्वरी शिवदर्शना ॥ १ ॥

तेथें देव धेनुपुरेश्वर ॥ देवी धेनुनायिका सुंदर ॥
त्यांशी वंदुनी दिली चादर ॥ पदकहीं रुचिर बहु मोलाचें ॥ २ ॥

पट्टवस्त्रें पूजोपहारीं ॥ देवाची शेवा करूनी वरी ॥
पर्तउनी पूर्वेंकडें स्वारी ॥ महा कावेरी वोलांडिली ॥ ३ ॥

केळी नारळीं जीच्या तीरी ॥ मोह आम्रवृक्ष परोपरी ॥
तिये कावेरीच्या उत्तर तीरीं ॥ मेलकावेरी गांव असे ॥ ४ ॥

विष्णुच्या देउळी महाराजें ॥ देव अभीष्ट वरदराज ॥
देवी परदेवी जेथें विराजे ॥ तेहीं सहज सेविले ॥ ५ ॥

देव शिवाच्या आयतनी ॥ कैलासनाथस्वामी मणूनी ॥
देवी कल्पनायकी अभिधानी ॥ तेहीं पाहूनि पूजिले ॥ ६ ॥

हेरंड मणूनी त्रिवंजुळींत ॥ ऋपी येक होता तप करीत ॥
कावेरी प्रवाह त्या स्थलांत ॥ बिळीं गुप्त होत असे ॥ ७ ॥

ऐसें असतां कनक चोळानें ॥ यासी काय करावे ह्मणून ॥
ऋपीस विचारिलें त्यानें ॥ येरुहीं वचन बोलिले ऐसें ॥ ८ ॥

बत्तीस लक्षणी पुरुषास ॥ बळी दिधली जरी यास ॥
तरी कावेरीच्या प्रवाहास ॥ समुद्रास संगम होयील ॥ ९ ॥

ऐसें ऐकतां कनक चोळानें ॥ आपणची करावें पतन ॥
मणूनिया निश्चयानें ॥ अस्तां हेरंडानें बोलिजेल ॥ १० ॥

मीच पडतो बिळीभिकारी ॥ तूं परोपकारी राज्य करी ॥
मणूनी त्या बिळांतरीं ॥ तया सामोरी पडला तो ॥ ११ ॥

मग योगबळें ऋषीनें ॥ पाताळीचा प्रवाह घेउन ॥
उठिला मेलकावेरींतून ॥ तेथें पूजन केलें शिवाचें ॥ १२ ॥

देवानें दिला हेरंडास ॥ अनिर्वर्त्तन कैलास वास ॥
यास्तव तया देवास ॥ नाव असे कैलासनाथ ॥ १३ ॥

त्या देवादेवीसी वंदूनी ॥ वस्त्रादिकी पूजा देउनी ॥
गांवीं कोड्डूर नामी तेथूनी ॥ नृपालाग्रणी प्रवेशला ॥ १४ ॥

देव कोट्टेश्वर त्या स्थळीं ॥ देवी असे कौतुकवल्ली ॥
त्यांसहीं नृपें पूजा दिली ॥ मग चालिकेली स्वामेल्ला ॥ १५ ॥

ज्ञानस्कंद सुब्रह्मण्य ॥ स्वामीनाथ बाल सुब्रह्मण्य ॥
ऐशी च्यारी नावें महा पुण्य ॥ महा कारुण्यमूर्ति तेथें ॥ १६ ॥

ऋषी येक होता नामें पिंगळ ॥ त्यानें तेथें तप आरंभिलें ॥
अशक्य दुसरियास केवळ ॥ बोलिजेलें त्यानें तये वेळे ॥ १७ ॥

माझे तप भग्न जो करील ॥ त्याला स्व माहात्म्य न कळेल ॥
मणूनी ऐसें अति वेळ ॥ योगे प्रबल तप करितां ॥ १८ ॥

श्वासनिरोध कपाल फुटून ॥ अग्नि निघाला त्यापासून
त्यानें व्यापिलें त्रिभुवन ॥ देव भिऊन पळाले ॥ १९ ॥

इंद्रादिकी केलें विज्ञापन ॥ महादेवासी त्या दयाळून ॥
पिंगळऋषीचें मूर्धान ॥ करपद्मानें झांकिलें ॥ २० ॥

पिंगळानें डोळे उघडूनी ॥ पाहिला साक्षात शूलपाणी ॥
तुझें माहात्म्य तुझ्याचेनी ॥ जाणवेना वाणी ऐशी वदली ॥ २१ ॥

रुद्रानें यासि कैसें मोचन ॥ होईल अह्मास मणून ॥
विचारिलें ऋपीस मातव्यानें ॥ हरासी वचन बोलिलें ऐसें ॥ २२ ॥

तुजला ज्ञानस्कंद मणून ॥ होयील येक पुत्र रत्न ॥
उपदेश घेतिल्यां त्याकडून ॥ शाप मोचन होईल तेव्हां ॥ २३ ॥

ऐसें ऋपीनें बोलिल्यावरी ॥ ज्ञानस्कंदाकडें पंचाक्षरी ॥
उपदेश करुं घेवूनी वरी ॥ शापवैखरी रुद्रें परिहिरिली ॥ २४ ॥

तेथूनि देव पार्वतीपती ॥ मध्यार्जुनीं येऊनी सांबमूर्ति ॥
जाहला श्रीमहालिंग मूर्ति ॥ माहात्म्य अति जयाचें ऐसें ॥ २५ ॥

मधरेंतूनि मीनाक्षीसुंदरेश ॥ ज्ञानस्कंद मूर्ती पाहावयास ॥
येउनी भास्करक्षेत्र स्वामिह्वास ॥ केला प्रवेश जेथें पूर्वी ॥ २६ ॥

कोणी येकया कारणानें ॥ गंगेशी आलें शापवचन ॥
त्याचें झालें जेथें मोचन ॥ अैसें महिमान जयाचें ॥ २७ ॥

तैसेंचि धरणी देवीस ॥ शाप मोचन गंगेस ॥
आणिखीहीं महादेवीस ॥ गर्वभंग ब्रह्मयास वेड्या घालूनी ॥ २८ ॥

स्वामीपुष्करणी मणूनी तीर्थ ॥ कुमारधारा कावेरी पुनीत ॥
तिसरें शूलतीर्थ तेथें ॥ शरवणतीर्थ चौथेंही ॥ २९ ॥

पांचवेहीं ब्रह्मतीर्थ ॥ ब्रह्मयासी मुक्ति दिली जेथें ॥
जे स्नान करिती तयातें ॥ करतलांत मुक्ति तया असे ॥ ३० ॥

अैशा सुब्रह्मण्याचे दर्शन ॥ घेउनी शरभेंद्राभिधानें ॥
दिलें पदक उज्वलरत्नानें ॥ उंच मोल्यानें अति दीप्त ॥ ३१ ॥

ते दिवशीहीं कुंभकोण मोकाम ॥ करूनियां त्या गुणधामें ॥
शनिवारी सखवारांबाग्राम ॥ अपार महिमा पाविजेला ॥ ३२ ॥

तेथें देव सप्तऋषीश्वर ॥ देवी धर्मवर्धनी चतुर ॥
त्यासहीं वंदूनि पूर्वप्रकारें ॥ सोवळें चादर दिली भूपें ॥ ३३ ॥

पाताळ स्वर्ग गमनाविणें ॥ भूमीवरी चांगले असून ॥
पाहाची मणे तीनि भुवनें ॥ त्यानें येउन पाहावे येथें ॥ ३४ ॥

पदक दिलं त्या देवाप्रती ॥ सूर्यासमान जयाची कांती ॥
सोवळें चादर देउनी भूपती ॥ नाच्यारगुडीप्रती चालिला ॥ ३५ ॥

मग तया विष्णुस्थलास ॥ येऊनी पाहिला श्रीनिवास ॥
देवी नाचारुअंबा राजस ॥ नृपें सेविविलें त्यास तैसेंचि ॥ ३६ ॥

उपरि आला मध्यार्जुनांत ॥ पूर्वेकडे शोभती पांच रथ ॥
तोरणें अंब्याची विलसित ॥ विदी शोभित असती तेथें ॥ ३७ ॥

जो देव महालिंगमूर्ति ॥ भक्ताच्या हरी सकळ आर्ती ॥
करी मनोरथाच्या पूर्ती ॥ तो सांबमूर्ति असे जेथें ॥ ३८ ॥

देवीचें नाव बृहत्कुचांबा ॥ देवाच्या आग्नेयी जगदंबा ॥
पूर्ण करी कामना कदंबा ॥ पापकळंबा छेदीतसे ॥ ३९ ॥

देव माहात्म्य अपरिमित ॥ म्या कांहीं कांहीं सांगिजेतें ॥
श्रोते ऐकावें येकाग्रचित्तें ॥ बहु दुरित दूरी करि जे ॥ ४० ॥

पूर्वी येक राजकुमारी ॥ तप करीत होती या क्षेत्रीं ॥
तीचा अभिप्राय अंतरी ॥ शिव नोवरी होईन मी ऐसा ॥ ४१ ॥

असें असतां महेश्वरानें ॥ कोणी येक्या दिवसी येऊन ॥
म्या वर दिलें तू घे मणून ॥ बहूत वरदानें बोलिजेल ॥ ४२ ॥

तेव्हां कन्या मणे देवासी ॥ नाही मला वराची असोसी ॥
त्वांच पती व्हावें पुण्यरासी ॥ तियेची ऐशी गोष्टी ऐकूनी ॥ ४३ ॥

अभीष्ट फलदाता ईशान ॥ तैसेंचि असो वरें ह्मणून ॥
करुनी घेऊनी तीचें लग्न ॥ वामभागीं ठाणें केलें तीचें ॥ ४४ ॥